# १. पसायदान

**– संत ज्ञानेश्वर**

**परिचय** : संत ज्ञानेश्वर (१२७५–१२९६) संत ज्ञानेश्वरांनी भागवतधर्माचा पाया घातला. सर्व सामान्य समाजाला अध्यात्माची पाऊल वाट दाखविली. ज्यावेळी समाजात संस्कृत भाषेचा पगडा होता, सर्व अध्यात्मिक साहित्य संस्कृतमध्ये होते. सर्व सामान्य लोक संस्कृत भाषेपासून वंचित होते. त्यांना संस्कृताचे अध्ययन करण्याचा हक्क नव्हता. अशा काळात संत ज्ञानेश्वराने देशी भाषेचा वापर करून संत ज्ञानेश्वरी लिहिली. ही ज्ञानेश्वरी भागवद्गीतेवरील भाष्य आहे. त्यामुळे सर्व समाजातील लोकांना भक्तीमार्ग दाखविला. त्या परंपरेतील पुढील संतानी वाटचाल केलेली दिसून येते. त्यांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्ठी ग्रंथ व अभंगरचना केलेली आहे. संत ज्ञानेश्वर हे योगी, तत्वज्ञ संत, भाष्यकार व अलौकिक प्रतिभा ही त्यांच्या व्यक्तिमत्वातील पैलू आहेत.

या ''पसायदानात'' या कवितेत संत ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक परमेश्वराला, विश्वाचे कल्याण, मानवता, बंधुभाव, विश्वबंधुत्व, प्रेम संताचा सहवास विविध मूल्ये समाजात रुजावी म्हणून यासाठी त्यांनी केलेली प्रार्थना आहे.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जें जो वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु या भूतां ।।
चलां कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।
चंद्रमे जें अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।
येथ म्हणे विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।

**कठीण शब्दार्थ : पसायदान–**प्रसाद दान, कृपादान; **विश्वात्मके देवे–**विश्वव्यापी ईश्वर; **वागयज्ञ –** विद्यादेवता; **तोषावे–**संतुष्ट व्हावे; **खंळाची व्यंकटी सांडो–**दुष्टांचा दुष्टपणा नाहिसा होवो; **सत्कर्मी–**चांगले कार्य; **रतो–**आसक्ती; **भूता परस्परे पडो–**भूतजातामध्ये जीवाभावाची मैत्री; **दुरितांचे–**दुःखी कष्टी लोक; **तिमिर–**अंधार; **स्वधर्म सूर्ये–**स्वधर्म रूपी सूर्याचा उदय; **मांदियाळी–**समुदाय; **अनवरत–**निरंतर; **अरव–**अंकूर, कोभं; **अर्णव–**समुद्र;

**तिन्हीलोकी–**त्रिलोकात; **भजिजो आदिपुरूखी–**आदि पुरुषाचे अखंड भजन करावे, **विश्वेशरावो–**विश्वाचे प्रभू. **पीयुषाचे–**अमृताचे; **अलांछन–**निष्कलंक; **तापहीन–**तापविहिन; **सोयरे–**ईष्टमित्र.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) ज्ञानेश्वरांनी कोणाकडे पसायदान मागितले आहे ?

२) संत ज्ञानेश्वरांने दुष्टपणा जाऊन कोणत्या गुणांची वाढ व्हावी असे म्हणतात ?

३) 'पसायदान' कोणासाठी मागितले आहे ?

४) विश्वात कोणाची मांदियाळि आहे ?

५) संत ज्ञानेश्वरांनी कोणता यज्ञ केला आहे ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) संत ज्ञानेश्वरांनी कोणते 'पसायदान' मागितले आहे ?

२) 'पसायदान' याचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

**क) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूये पाहो ।
जो जें वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।

२) येथ म्हणे विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणे बरे ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।

**ड) टीप लिहा.**

१) पसायदानातील उपमाचे विश्लेषण

**उपक्रम** : ''माझा आवडता संत'' या विषयावर निबंध लिहा.

* * *

# बसवेश्वरांचे वचनामृत

**– संत बसवेश्वर**

**परिचय** : संत बसवरस मादिराजा मंडिगे (११३४–११९६) बाराव्या शतकात असलेल्या समाजामध्ये जातीभेद, लिंगभेद, वर्ण–वर्गभेद, सामाजिक विषमता, कर्मकांड, अज्ञान, बहुदेवोपासना, पुरोहितशाही यांच्याविरुध्द बसवेश्वरांनी चळवळ उभारली. समाजात समानता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्त्व रुजविले. एक देवोपासनेसाठी इष्टलिंगाची परिकल्पना देवून सर्व मानवामध्ये धर्माची स्थापना केली. संचयप्रवृत्ती नष्ट करून श्रमाचे (कायकाचे) महत्त्व समाजाला पटवून दिले. स्त्री ही माया नसून, मनातील आशा ही माया असे सांगून स्त्री समानतेमुळे मानवीजीवनाचे कल्याण साधता येते हे त्यांनी पटवून दिले.

बसवसमितीचे अध्यक्ष श्री. अरविंद जत्ती आणि कर्नाटक सरकार यांच्या संयुक्तरित्या बसवेश्वरांची आणि त्यांच्या शरण अनुयायींची वचने २३ भाषेतून अनुवादित करण्याचे कार्य केले. त्यामध्ये डॉ. विजया तेलंग यांनी काही वचनांचा मराठी अनुवाद ‘वचन’ या ग्रंथात केला आहे. त्यातील काही वचने येथे घेतली आहेत. त्या वचनात देवाविषयीच्या भ्रामक कल्पना आणि मानवी वर्तन, शरणांचे व्यक्तीत्त्व आणि त्यांनी दिलेली सप्तसुत्रे, स्थावर मालमत्ता नाशवंत असून परमेश्वर हाच अविनाशी सत्य आहे. जीवन पवित्र–शुध्द करण्यासाठीचा सरळ–सोपा मार्ग म्हणजे सप्तसुत्रे आहे हे स्पष्ट केले आहे.

---

१) लाखेचा वितळणारा देव कसा योग्य म्हणू ?
आगीचा स्पर्श होताच सुरकुतणारा देव कसा योग्य म्हणू ?
प्रसंग पडल्यास विकला जाणारा देव कसा योग्य म्हणू ?
हल्ल्याच्या भीतीने पुरला जाणारा देव कसा योग्य म्हणू
सहजभावाचा, आत्मैक्य कूडलसंगमदेव एकच देव ! ............

२) अर्थरेषा असून काय उपयोग, आयुष्यरेषा नसेल तर ?
भ्याडाच्या हाती चंद्रायुध असून काय उपयोग ?
आंधळ्याच्या हाती आरसा असून काय उपयोग ?
माकडाच्या हाती माणिक असून काय उपायेग ?
आमच्या कूडलसंगाच्या शरणांना न जाणणाऱ्यांच्या
हाती लिंग असून काय उपयोग ?
शिवपथाची ओळख नसेल तर ............

३) धनवान बांधिती शिवालय
करु मी काय असे गरीब,
मम पायच खांब, देहच देऊळ,
शिर पहा सुवर्णकळस.
कूडलसंगमदेवा ऐका हो,
स्थावरास असे नाश, परि जंगम असे अविनाशी ............

४) चोरी करु नको, हत्या करु नको, खोटे बोलू नको,
कोप करु नको, इतरांचा तिरस्कार नको,
आत्मप्रौढी नको, उलट हेटाळणी नको,
हीच अंतरंग शुध्दी, हीच बहिरंग शुध्दी
हीच आमच्या कूडलसंगमदेवास प्रसन्न करण्याची रीत. ............

---

**कठीण शब्दार्थ : लाख**–वड–पिंपळ झाडापासून तयार केलेला वितळणारा पदार्थ; **आत्मैक्य**–सर्व आत्म्यातील चैतन्य एकच; **अर्थरेषा**–भरपूर संपत्ती असणारे धनिक; **आयुष्यरेषा**–जीवनरेषा; **चंद्रायुध**–युध्दातील तिक्ष्ण तलवार; **स्थावर**–स्थिर मालमत्ता, पण कधीतरी नाशवंत होणारी; **जंगम**–चैतन्य; **आत्मप्रौढी**–आत्मप्रशंसा; **हेटाळणी**–निंदा.

**टीप–१) शरण –** संत बसवेश्वरांचे अनुयायी, बसवतत्त्वांचे आचरण करणारे कोणीही. **२) वचन –** १) वाचेने वदलेले शब्द, २) दुसऱ्यांना दिलेले आश्वासन, ३) स्वतः आत्मसाक्षीने घेतलेली शपथ, ४) गद्य – पद्य मिश्रीत मुक्त काव्य आणि गेय काव्य, ५) दृष्टांत आणि उपमा यांच्या सहाय्याने स्पष्ट केलेले सत्य, ६) बोलल्याप्रमाणे वागण्याची दिलेली हमी. **३) शिवपथ –** सद्वर्तन, दया, मानवी कल्याणासाठी प्रयत्नशील. लिंग हे समानतेचे प्रतिक आहे. शिवयोग साधण्याचे साधन आहे असे समजून बोलतो आणि बोलल्याप्रमाणे वागतो अशी व्यक्ती शिवपथावर चालत असते. अशा व्यक्तीलाच शरण असे संबोधतात. ८) कूडलसंगमदेव – सृष्टीतील चैतन्य, परमेश्वर, वचनांकित.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) अर्थरेषा अर्थहीन केव्हा होते ?

२) चंद्रायुध कोणाच्या हाती असू नये ?

३) आरसा कोणासाठी उपयोगी नाही ?

४) शिवालय कोण बांधतात ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) बसवेश्वरांनी देव ही संकल्पना कशी स्पष्ट केली आहे ?

२) कूडलसंगमदेव केव्हा प्रसन्न होईल असे बसवेश्वर सांगतात ?

**क) टिपा लिहा.**

१) शिवपथाची ओळख स्पष्ट करा.

२) स्थावर आणि अविनाशी कल्पना स्पष्ट करा.

**ड) संदर्भ स्पष्ट करा.**

१) सहजभावाचा, आत्मैक्य, कूडलसंगमदेव एकच देव.

२) अर्थरेषा असून काय उपयोग, आयुष्यरेषा नसेल तर ?

३) हीच अंतरंगशुध्दी, हीच बहिरंग शुध्दी.

**उपक्रम :**

१) बसवेश्वर आणि त्यांच्या शरणांची वचने मिळवून वाचा.

२) 'क्रांतीसुर्य बसवेश्वर' या विषयावर निबंध लिहा.

* * *

# संतवाणी

## अ) किती हे सुख मानिती संसाराचे — संत सोयराबाई

**परिचय** : संत सोयराबाई ही संत चोखामेळा यांची पत्नी होय. हे दांपत्य जातीने महार होते. कर्ममेळा हा मुलगा तर बंका हा सोयराबाईचा भाऊ. हे कुटुंब मंगळवेढ्यास राहात असे. सोयराबाईचा जन्मकाळ व निधनकाळ यांची माहिती उपलब्ध नाही. चोखोबाचा निधनकाळ इ. स. १३३८ हा आहे. त्यामुळे सोयराबाई यांचा कालखंड तेरावे शतक हा मानता येतो. चोखोबांच्या सहवासाने सोयराबाईच्या उपजत प्रतिभेला बहार आला आणि त्यांनीही विपुल अभंगरचना केली. मात्र तिचे आता बासष्टच अभंग उपलब्ध आहेत. पांडुरंग दर्शन, समाजव्यवस्था, कर्ममेळाच्या जन्मोत्सव इत्यादी विषय व काही उपदेशपर अभंग त्यांनी लिहिले आहेत.

प्रस्तुत अभंग हा उपदेशपर असून त्यात संसारिकांना मार्गदर्शन केले आहे. संसार हे मृगजळ आहे. मी माझे, स्त्री, पुत्र या मोहातच माणूस गुरफटतो. या षड्विकारातून स्वतःची सुटका केली नाही तर जन्मोजन्मी फजिती होईल असे सांगितले आहे.

---

किती हे सुख मानिती संसाराचे । काय हें साचें मृगजळ ।।  
अभ्रीची छाया काय साच खरी । तैसीच हे परी संसाराची ।।  
मी आणि माझें वागविती भार । पुढील विचार न करता ।।  
कां हे गुंतले स्त्रीपुत्रधना । कां ही वासना न सुटे यांची ।।  
सोयरा म्हणे अंती कोण सोडवील । फजिती होईल जन्मोजन्मीं ।।

---

**कठीण शब्दार्थ : साच**–सत्य, **मृगजळ**–सुर्यकिरणांच्या परिवर्तनाने वाळवंटासारख्या ठिकाणी होणारा जलाचा भास; **अभ्री**–आभाळ; **तैसा**–त्याप्रमाणे; **परी**–पध्दत; **त**–हा; **अंती**–अंतसमय.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) मानवाने सुख कशात मानले आहे ?

२) संसाराला कशाची उपमा दिली आहे ?

३) संसारिक माणुस कोणत्या मोहात गुरफटतो ?

४) माणसाने षड्विकारातून स्वतःची सुटका केली नाही तर काय होईल ?

५) संत सोयराबाईच्या पतीचे नाव काय ?

**ब) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) संत सोयराबाईंनी संसारिकांना केलेले मार्गदर्शन तुमच्या शब्दात लिहा.

**क) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) का हे गुंतले स्त्रीपुत्रधना । कां ही वासना न सुटे यांची ।।

**क) टीप लिहा** १) अभंगाचा भावार्थ

**उपक्रम :–** संत सोयराबाईचा, सुखाचे हे नाम आवडीने गावे – हा पंडित भीमसेन जोशी यांनी गायिलेला अभंग मिळवून ऐका.

* * *

# ब) घेता नाम विठोबाचे

**– संत सेना न्हावी**

**परिचय** : संत सेना न्हावी हे मूळचे मध्यप्रदेशातील जबलपूर जवळील बांदुगडचे. तीर्थाटन करता करता ते महाराष्ट्रात आले. ते ज्ञानदेव व नामदेवांना समकालीन होते. निवृत्तीनाथ व ज्ञानेश्वरांना त्यांनी गुरु मानले. भजन, कीर्तन, प्रवचन आणि वाचन यातून त्यांची ज्ञानसाधना सुरु झाली. त्यांनी अभंगातून लोकांना उपदेश केला. अभंग, गौळण, इत्यादी भक्तिपर रचना प्रसिध्द आहेत. सामाजिक नीतिपर अभंगातून तत्कालीन साधूसंतांच्या ढोंगीपणावर त्यांनी प्रहार केले आहेत. आम्ही वारीक वारीक । करु हजामत बारीक । हा प्रसिध्द अभंग त्यांचाच आहे.

प्रस्तुत अभंगातून त्यांनी विठ्ठलाच्या नामस्मरणाचे महत्त्व सांगितले आहे.

---

घेता नाम विठोबाचे । पर्वत जळती पापाचे ।।१।।
ऐसा नामाचा महिमा । वेद शिणला झाली सीमा ।।२।।
नामें तारिले अपार । महा पापी दुराचार ।।३।।
वाल्हा कोळी ब्रह्महत्यारी । नामें तारिला निर्धारी ।।४।।
सेना बैसला निवांत । विठ्ठल नाम उच्चारीत ।।५।।

---

**कठीण शब्दार्थ : महिमा**–महत्व; **शिणला**–थकला; **सीमा**–मर्यादा; **तारले**–रक्षण केले ; **दुराचार**–वाईट वर्तन.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) संत सेनान्हावी यांचे मुळ गाव कोणते ?

२) संत सेनान्हावी यांनी कोणाला आपले गुरु मानले ?

३) या अभंगात कोणाच्या नामस्मरणाचे महत्व सांगितले आहे ?

४) विठ्ठलाच्या नामस्मरणाने कशाचे पर्वत जळतील ?

५) नामस्मरणाने कोणाचे रक्षण केले ?

**ब) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) संत सेना न्हावी यांनी नामस्मरणाचे महत्व उदाहरण देऊन कसे सांगितले आहे ?

**क) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) वाल्हा कोळी ब्रह्महत्यारी । नामें तारिला निर्धारी ।।

**क) टीप लिहा** १) अभंगाचा भावार्थ

**उपक्रम :–** संतांची माहिती मिळवून त्यांच्या अभंगातील व्यवसायाचे चित्रण कसे आले आहे ते शोधा.

* * *

# क) सत्वर पाव गे मला

**– संत एकनाथ**

**परिचय** : संत एकनाथ (१५२८ – १५९९) हे पैठणचे रहिवाशी. जनार्दन स्वामी हे त्यांचे गुरु असून त्यांच्यावर भागवत संप्रदायाचा प्रभाव होता. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय नाथांच्या जीवनात आढळतो. ज्ञानेश्वरीच्या प्रतींचे शोधन, संपादन व ज्ञानेश्वरांच्या समाधीचा पुनरुद्धार केला. एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर या त्यांच्या प्रमुख ग्रंथ रचना होत. या शिवाय त्यांनी अध्यात्मिक स्फुट अभंग रचना केल्या तसेच अभंग, पदे, गौळणी, भारुडे अशी विपुल व विविध प्रकारची रचना केली. त्यांची भारुडे सर्वाधिक लोकप्रिय असून मनोरंजनातून त्यांनी अध्यात्मिक व सामाजिक प्रबोधन केले.

प्रस्तुत भारुड नाथांचे प्रसिध्द भारुड असून त्यात त्यांनी सासुरवाशिणीचे रुपक वापरले आहे. संसाराच्या जाचाला कंटाळून सासुरवाशीण भवानी आईला प्रसन्न होऊन संसारातून मुक्ती दे असे मागणे मागत आहे. येथे सुनरुपी जीव हा आनंदी निर्गुण अशा मायेला विनंती करून जीवाचा उध्दार कर असे सांगत आहे. सुनेने केलेली सासरच्या जाचाची तक्रार आणि तिचे अध्यात्माशी जोडलेले नाते यातून रंजकता, पारमार्थिक मार्गदर्शन या दोन्ही गोष्टी नाथांनी या भारुडातून साधल्या आहेत.

---

सत्वर पाव गे मला । भवानी आई रोडगा वाहीन तुला ।।
सासरा माझा गांवी गेला । तिकडेच खपवी त्याला ।।
सासू माझी जाच करती । लवकर निर्दाळी तिला ।।
जाऊ माझी फडफड बोलती । बोडकी कर गे तिला ।।
नणंदेचे पोर किरकीर करितें । खरुज होऊं दे त्याला ।।
दादला मारुन आहुती देईन । मोकळी कर गे मला ।।
एका जनार्दनी सगळेंचि जाऊं दे । एकटीच राहूं दे मला ।।

---

**कठीण शब्दार्थ : सत्वर**–ताबडतोब; **रोडगा**–देवीला वहावयाचा विशिष्ट रोट; **निर्दाळी**–नष्ट कर; **बोडकी**–विधवा.

**भारुडात वापरलेली रुपके : १) सासुरवाशिण**–जीव (सुन–जीव) **२) सासरा**–अहंकार **३) सासू**–लोभ **४) जाऊ**–क्रोध **५) नणंदेचं पोर**–मोह **६) नणंद**–मत्सर **७) दादला**–काम व सर्व विकार.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) संसाराच्या जाचाला कोण कंटाळले आहे ?
२) या भारुडातील सासुरवाशिणीला कोण जाच करत आहे ?
३) एकनाथानी आपल्या भारुडात सासुसाठी कोणते रुपक वापरले आहे ?
४) सासुरवाशिणीला फडफड कोण बोलते ?
५) जीवरुपी सुन भवानी आईला काय वाहू इच्छिते ?

**ब) खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१) संत एकनाथांच्या भारुडातून प्रकटणारे रुपकं उलघडून दाखवा.

**क) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) सासू माझी जाच करती । लवकर निर्दाळी तिला ।।
२) दादला मारुन आहुती देईन । मोकळी कर गे मला ।।

**क) टीप लिहा** १) भारुडाचा भावार्थ

**उपक्रम :–** भारुडांच्या चित्रफितीच्या सी.डी. मिळवून भारुडांचे सादरीकरण कसे केले जाते ते पहा.

* * *

# ४. तू थोर दयासिंधू

**– रघुनाथपंडित**

**परिचय** : रघुनाथपंडित (सतरावे शतक) यांचा जन्म व मृत्युकाल अनिश्चित आहे. संस्कृत आणि फार्शी अशा दोन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. रामदासवर्णन, गजेंद्रमोक्ष, दमयंती स्वयंवर ही त्यांची काव्यसंपदा. दमयंती स्वयंवराची कथा ही महाभारतातली गोड कथा असून रघुनाथपंडितांनी रस, अलंकार, छंद या तिन्हीचा वापर करून ती रमणीय बनवली आहे.

नलराजा उद्यानात गेल्यावर त्याला राजहंसाचा थवा जलविहार करताना दिसला. त्यातील एका हंसाला पकडल्यावर हंसाने विनंती करून चातुर्याने आपली सुटका करून घेतली. त्या संवादाचे वर्णन या काव्यात आले आहे.

---

न सोडी हा नळ भूमिपाळ माते ।
असे जाणोनी हंस वदे त्यातें ।।
''हंस–हिंसा नच घडो तुझ्या हातें ।
स्व–स्थळातें पावेन पक्षपातें ।।१।।

पदोपदीं आहेत वीरकोटी ।
भले झुंझार हि शक्ति जयां मोठी ।।
तयां माराया धैर्य धरीं पोटी ।
पांखरुं हें मारणे बुध्दी खोटी ।।२।।

बघुनि माझी ही कनकरुप काया ।
कटक–मुकुटादी भूषणें कराया ।।
कशी आशा उपजली तूज राया ।
बहुत औदार्य थोर दया माया ।।३।।

म्हातारी उडतां नयेचि तिजला माता मदीया अशी ।
कांता काय वदों नव–प्रसव ते सातां दिसांची तशी ।।
पाता त्या उभयांस मी, मज विधी घातास योजीतसे ।
हातामाजि नृपा तुझ्या गवसलों आतां करावें कसे ।।४।।

स–दय हृदय याचे भूप हा ताप–हारी ।
म्हणुनि परिसतों मी होय येथें विहारी ।
मजहि वध कराया पातकी पातला जो ।
वरुनि पति तसा ही भूमि कैसी न लाजो '' ।।५।।

येणेंपरी परिसतां अति दीन वाचा
हेलावला नळ पयोधि दया–रसाचा ।।
सोडी, म्हणे, ''विहार जा अथवा फिराया ।
राहें यथा–निज–मनोरथ हंस–राया'' ।।६।।

सुटुनि खग पळाला बैसला शाल–शाखे ।।
क्षणभरि निज–देहीं मुक्ति–विश्रांति चाखे ।।
स्वजन तंव तयाचे भोवताले मिळाले ।
कवळिति निजबंधू बाष्पबिंदू गळाले ।।७।।

विसावा घे कांही उडुनि लवलाही परतला ।
नृपाळाचे स्कंधी बसुनि मणि–बंधी उतरला ।।
म्हणे हंस क्षोणी–पतिस ‘तुज कोणी सम नसे ।
दयेचाही ठेवा तुजजवळि देवा बहु वसे ।।८।।

ऐक राया तू थोर दया–सिंधू ।
नीति–सागरही तूंचि दीन–बंधू ।।
निखंदूनि बोलिलों नको निंदूं ।
सकल वदसी जरि पाय तुझे वंदू ।।९।।

---

**कठीण शब्दार्थ : भूमिपाळ**–राजा; **पक्षपांते**–पंख हलवत, पंखाच्या सहाय्याने; **पदोपदी**–पावलोपावली; **बुध्दीखोटी**–विचार आयोग्य; **कनक**–सोनेरी; **कटक**–कडे; **मुकुट**–किरीट, टोप; **भूषण**–दागिना, अलंकार; **राया**–राजा; **मदीया**–माझी; **कांता**–पत्नी; **नवप्रसव**–बाळंतीण; **पाता**–पोसणारा; **विधी**–नशीब; **घात**–नाश; **स–दय**–दयाळू; **भुप**–राजा; **तापहारी**–दुःख नाहीसे करतो; **परिसतों**–ऐकतो; **विहारी**–क्रिडा करण्यास; **परिसतां**–ऐकता; **हेलावला**–उचंबळला; **पयोधि**–सागर, समुद्र; **यथानिजमनोरथ**–तुझ्या इच्छेप्रमाणे; **खग**–पक्षी; **शालशाखे**–शालवृक्षाच्या फांदीवर; **कवळिती**–मिठी मारली; **बाष्पबिंदू**–आनंदाश्रु; **लवलाही**–लगेच; **क्षोणीपती**–राजा; **निखंदूनि बोलिलो**–टाकून बाललो.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) कवितेतील संवाद कोणाकोणात आहे ?
२) हंसपक्षी कोणाच्या हातात सापडतो ?
३) कोणाचे शरीर सोनेरी आहे ?
४) हंसाच्या दीनवाण्या बोलण्याचा राजावर काय परिणाम झाला ?
५) राजाच्या हातून सुटका झाल्यानंतर हंसपक्षी कोठे जाऊन बसतो ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) हंसपक्षाने नलराजाला कोणता सल्ला देवून त्याच्या लोभाचे वर्णन कसे केले आहे ?
२) हंसाने आपल्या गृहस्थितीबद्दल काय सांगितले व त्याचा राजावर कोणता परिणाम झाला ?

**क) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) न सोडी हा नळ भूमिपाळ मातें । असें जाणोनी हंस पदे त्यातें ।।
हंस – हिंसा नच घडो तुझ्या हातें । स्व–स्थळातें पावेन पक्ष–पातें ।।
२) सुटुनि खग पळाला बैसला शाल–शाखे । क्षणभरि निज–देहीं मुक्ति–विश्रांती चाखे ।।
स्वजन तंव तयाचे भोंवताले मिळाले । कवळिति निजबंधू बाष्पबिंदू गळाले ।।

**क) टिपा लिहा**

१) हंसपक्षाने केलेली नलराजाची स्तुती    २) हंसपक्षी व नलराजा संवाद

**उपक्रम :–** रघुनाथपंडितांची नल–दमयंती स्वयंवराची कथा मिळवून वाचन करा.

* * *

# ५. सुंदर हिरवे माळ

– गिरीश

**परिचय :** शंकर केशव कानेटकर (१८९३–१९७३) रविकिरण मंडळातील प्रसिध्द कवी. मराठी कविता सर्वसामान्यापर्यंत लोकप्रिय करण्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. काचनगंगा, मानसमेघ, अभागी कमल, आंबराई इ. काव्यसंपदा. ग्रामीण संस्कृतीप्रमाणेच निसर्गाचेही उत्कृष्ट चित्रण त्यांच्या अनेक कवितामधून आले आहे.

ही कविता ग. भा. निरंतर यांनी संपादित केलेल्या 'मधुघट' या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे. या कवितेत पावसाच्या आगमनाने निसर्गाला आलेले नव रुप, नवचैतन्य, आनंद व्यक्त झालेला आहे. अशा आनंदाच्या क्षणीसुध्दा शेतकऱ्याच्या पोटामधला जाळ कधी निवेल असा प्रश्न या कवितेत व्यक्त झालेला आहे.

---

सुंदर हिरवे माळ ! चहुंकडे सुंदर हिरवें माळ ! ध्रु.
जमली काळी वर घनमाला,
झिम् झिम् पाउस खाली आला,
ग्रीष्मर्तूचा ताप निवाला,
कोंभ येउनी दूर दूरवर पालवलें खडकाळ !
बोरवनाची सुकली पानें,
तरतरलीं या नवजलपानें;
विरळ बाभळी चैतन्यानें,
स्वानंदानें डुलूं लागल्या सकाळसायंकाळ.
सुकलीं गवतें गोट्यांखालुन, –
हिरवळुनी बघती डोकावुन,
रसरसलेल्या तेजें न्हाउन –
मराठमोळा तरुण कुमारी लाजति कीं लडिवाळ ?
समोर इकडे तिकडे भंवती –
हलू लागली हिरवी नवती,
ओलसरीनें पानें दंवतीं,
माळावरल्या वनराणीला नजराणाच सुरेख.
सुकल्या ओढ्यांतुन ही खळखळ –
मुरमाडांतुन करी धावपळ;
गीतमोहिनी घालुन मंजुळ
हळुच नर्तनीं वाजवि अपुले पायांमधले चाळ ?
जोगवलेली गुरें कुणाचीं –
दूरावरुनी जात सांजचीं –
अडवित तेजें मावळतींची ?
काळ्या छाया सरती एकामागुन एक विशाळ–

क्षितिजीं निळसर वाफाऱ्यांचे –
तरंगती ढग नव रंगाचे;
शिखर न कोठे सह्याद्रीचे;
मात्र एकला जवळ उभा हा ऐटिंत राजमहाल !
निवलीं रानें, गुरें–वासरें;
निवलीं झाडें रानपांखरें;
धनी अंतरी निवले सारे;
शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधिं पण जाळ ?

---

**कठीण शब्दार्थ : माळ**–रान; **नवती**–नवी पालवी; **सुडाळ**–सुरेख; **जोगवलेली**–चांगली पोसलेली; **निवाला**–शांत होणे; **विरल**–कमी; **स्वानंदाने**–स्वआनंदात; **सुकती**–मावळलेली; **लडिवाळ**–फार प्रेमाने; **नजराणा**–भेट; **नर्तन**–नाच,नृत्य; **सांज**–सायंकाळ; **क्षितिज**–आकाश; **जाळ**–दुःख; **मुरमाड**–मुरमाचा, खडक; **विशाल**–भव्य; **शिखर**–पर्वत.

**स्वाध्याय :**

**प्रश्न १ला अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) चहुकडे सुंदर व कसले माळ पसरले आहे ?
२) पावसानंतर कोणत्या ऋतुचा ताप निवला आहे ?
३) बोरवनाची सुकलेली पाने कशानी तरतरली ?
४) माळावरल्या कोणाला सुरेख नजराणा मिळाला ?
५) राजमहाल कसा उभा राहिलेला आहे ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) पावसाच्या आगमनाने निसर्गाला आलेले नवरुप, नवचैतन्य वर्णन करा.
२) 'सुंदर हिरवे माळ' या कवितेचा भावार्थ लिहा.

**क) संदर्भासह स्पष्ट करा.**

१) समोर इकडे तिकडे भवती । हलू लागली हिरवी नवती,
ओलसरीने पाने दंवती । माळावरल्या वनराणीला नजराणाच सुढाळ
२) निवली राने गुरे–वासरे । निवली झाडे रानपाखरे
धनी अंतरी निवली सारे । शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधिं पण जाळ ?

**क) टीप लिहा**

१) सुंदर हिरवे माळ मधील निसर्ग चित्रण.

**उपक्रम :**

तुमच्या महाविद्यालयाची शैक्षणिक सहल निसर्गरम्य परीसराला जाण्यासाठी आयोजित करा.

* * *

# ६. गोफ

**– गोविंदाग्रज**

**परिचय** : राम गणेश गडकरी (१८८५–१९१९) असामान्य प्रतिभेचे कवी. नाटककार, विनोदी लेखक या तिन्ही वाङ्मय प्रकारात लेखन. गोविंदाग्रज – काव्यलेखन, तर राम गणेश गडकरी या नावाने नाट्य लेखन, तर विनोदी लेखन बाळकराम या नावाने केले आहे. त्यांना उत्तुंग कल्पनाशक्ती व अभिजात भाषेची मिळालेली देणगी. कल्पना आणि वास्तव यांचा सुरेख संगम. हळुवार भावना, संवेदनशिलता, संयमशिल भाषाशैली, भाषेचे नाविन्य या सर्व वैशिष्ट्यामुळे गोफ कविता माणसाला भूरळ पाडते. त्यांनी एकच प्याला, भावबंधन, प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव इ. नाटके लिहिली. ठकिचे लग्न, व इतर विनोदी लेखन केले. त्यांचा वाग्वैजयंती हा काव्यसंग्रह प्रसिध्द आहे.

प्रस्तुत कवितेत सखा–सखी प्रेमात पडणे, गोफ गुंफणे, प्रेमात धुंद होणे, जगाचा विसर पडणे शेवटी प्रेम भंग होणे, आणि प्रेमाचा गोफ उलघडण्याचे अवघड कार्य करताना दिसतात. गोफ ही कविता वाग्वैजयंती या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

पदर अणिले तुझे कांही तूं, माझें आणीं मीहि तसा
हांसत खेळत गोफ गुंफिला, कळलें नाही कधीं कसा
एकामेकांभंवतीं फिरतां, गिरकी जीवांना आली
चढत चालला खेळ जसा तो, नजरहि धुंद तशी झाली

कुणीं निंदिलें कुणी वंदिलें, कुणि हंसलें रडलेंहि कुणी
नाहिं पाहिलें आम्ही तिकडे, विश्व बुडालें प्रेमगुणी
परि दैवाचा खेळ निराळा – खेळ नकोसा तुज झाला
ज्या खेळानें जीव रंगला, त्याचा कंटाळा आला

गोफ गुंफिला उलगडण्याचा कठिण काळ येउनि थडके
हाय, वदावें काय, जिवलगे, ऊर केवढा हा धडके
हळूहळू ओढणें हळु जरा, ओढायाची कां–घाई
भलता धागा ओढितांच तूं, जीव, जिवलगे, हा जाई

थांब, उलगडूं गोफ कठिण हा शान्त बुध्दिने सखे असा
कीं न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा
ना तरि होइल हानि आपुली आणि जगाचे हसें तसें
एक्या ठायीं आलों कां वद दूर व्हावया सखे असें

कठिण असे, तरि उलगडणें हा गोफ असे आतां भाग
ना तरि त्याचा पीळ राहुनी छळील तो जागोजाग
मनापासुनी जें केलें, जें मान्य जिवांनाही झालें
विमनस्कपणें परी आज तें निस्तरणें नशिबी आलें

कठिण जोडणें, परी तोंडणें सुकर वाटतें जनांप्रती
उलटा अनुभव आला आम्हां, गुंग जाहली इथें मती

खेळतां गुंफिला गोफ, जीव त्यालागिं वाहिला
'गोविन्दाग्रज' सांगेना – कीं त्याचा पीळ राहिला

---

**कठीण शब्दार्थ : गोफ**–पीळ घातलेला दोरा; **विमनस्क**–उदास; **निंदा**–चेष्टा करणे; **वंदन**–नमस्कार; **उर**–अंतःकरण; **सखी**–मैत्रिण; **सुकर**–सोपी; **जन**–लोक; **मती**–बुध्दी.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) व्यवहारी जगाचा सिध्दांत कोणता ?
२) 'गोफ' हे कशाचे प्रतिक आहे ?
३) प्रेमाचा खेळ कोणाला नकोसा झाला आहे ?
४) कविच्या मते काय उलघडणे कठीण आहे ?
५) कविला या कवितेत कोणता अनुभव आहे ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) गोफ या कवितेचा भावार्थ लिहा.
२) गोफ या कवितेतील विचार स्पष्ट करा.

**क) संदर्भासह स्पष्ट करा.**

१) कुणीं निंदिलें कुणीं वंदिलें, कुणि हंसले रडले हि कुणी
नाही पाहिलें आम्ही तिकडे, विश्व बुडालें प्रेमगुणी
२) थांव, उलगडूं गोफ कठिण हा शान्त बुध्दिनें सखे असा –
कीं न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा.

**ड) टिपा लिहा.**

१) गोफ कवितेतील विरह.
२) गोफ कवितेतील नायक नायिकेच्या प्रेमाची अवस्था.

**उपक्रम :–** १) मानवी जीवनातील प्रेमाचे महत्व स्पष्ट करा.

* * *

# ७. रात्र आहे वैऱ्याची

**– शाहीर अमरशेख**

**परिचय** : महिबुब हुसेन पटेल (१९१६–१९६९) शेतकरी, कामकरी, बहुजनवर्गाला सुखासमाधानाने आयुष्य लाभावे म्हणून जीवाचे रान करणाऱ्यामध्ये अमरशेख यांचा उल्लेख करावा लागेल. साम्यवादी जीवनदृष्टीच्या शेख यांना अत्यंत सुरेल, भरदार व पहाडी आवाजाची देणगी लाभली. तसेच प्रपंच, ज्योतिबा फुलें ह्या चित्रपटात व झगडा या नाटकात त्यांनी भूमिका केल्या. प्रपंच मधील भूमिकेला राष्ट्रपती पदक मिळाले. त्याचबरोबर 'कलश', 'धरतीमाता', हे कवितासंग्रह, 'अमरगीत–गीतसंग्रह', 'पहिला बळी', नाटक, उधमसिंगाचा, 'छत्रपती शिवराय', 'मल्हारराव होळकर', यांचे पोवाडे. गीतांची अनेक पुस्तके प्रसिध्द. मासिकांचे व गीतसंग्रहाचे संपादन. त्यांनी तुरुंगवास भोगला, महाराष्ट्र अंदोलन, गोवा मुक्ती लढा, चिनी, पाकिस्थानी आक्रमणाविरुध्द युध्दनिधी दहा लाख रुपये मिळवून दिले. सामान्यांच्या जीवनातील विषयांना सरळ भिडणारे शब्द अशी लेखनाची वैशिष्ट्ये (आग, रग, धुंदी, बेहोषी यांची जीवंत बेरीज म्हणजे अमरशेख असे मूल्यमापन अत्रे यांनी केले आहे.)

प्रस्तूत कवितेत ज्यांनी हुतात्म्य पत्करून मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून दिले. तेच आज धोक्यात आहे. कांही भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्यांना ते नको आहे. जातीय दंगली घडवून वातावरण बिघडविण्याचे विनाशकारी कार्य करणाऱ्या लोकांच्या तावडीतून वतन, एकात्मता, तिरंगा याचे अस्तित्व जपावयाचे आहे. तेव्हा जागे रहा असा इशारा या पोवाड्यातून देण्यात आला आहे.

---

रात्र आहे वैऱ्याची जागा रहा – जागा रहा
काल लाल किल्ल्यावर आपुला तू रोविला तिरंगा
हुतात्म्यांनिशी झुंज दिली रक्ताची वाहूनी गंगा
तो जळाया आज पेटवी शत्रू जातीय दंगा
संघराज्य धोक्यात आहे रे तुझी दिल्लीची गुहा – जागा रहा

झेंड्याची काठी पोखरण्या शिरले काही किडे
विजयध्वजा गगनांत डोलता तळमळुनी तडफडे
पिसाळले सूर्याजी तेही संधी शोधण्याकडे
अब्रु लागली पणास जनता जनार्दना तू पहा, जागा रहा

कंसानेही कपट योजिलें कृष्ण जन्मण्या आधी
कारागारी बहिण देवकी, तिच्या भोवती प्यादी
पुतना लोळूनि सरंजामदारीची शोभवी गादी
नवस्वतंत्रता कृष्ण मारण्या शत्रू सजला पहा, जागा रहा

साम्राज्याच्या छुप्या दलालां अन् जातीयवाद्यांना
कोटी हातांनी मूठ बांधूनी काढ झोडपुन त्याला
स्वैर लहरू दे ध्वजा दिल्लीवर साद घाल दिल्लीला.
संघराज्या जनशक्ती पाठिशी तुझ्या उभी ही पहा; जागा रहा.

**कठीण शब्दार्थ : वैरी–**दुश्मन, **हुतात्मे–**ज्यांनी मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी प्राणाची आहुती देणारे;; **गुहा–**गुंफा, घर; **पोखरणे–**कुरतडणे; **अब्रु–**पत; **सजने–**तयार, **छुपे–**आतुन काम करणारे; **दलाल–**मध्यस्थ; **सम्राज्यवाद–**दुसरी छोटी राष्ट्रे आपल्या पंखाखाली आणण्याचे बलिष्ट राष्ट्राचे तत्वज्ञान.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) शाहिराने जनतेला कोणते आव्हान केले आहे ?

२) कोणत्या किल्ल्यावर तिरंगा रोवला असे कवि म्हणतो ?

३) हुतात्म्यानिशी दिलेल्या झुंजीने कशाची गंगा वहात आहे ?

४) झेंड्याची काठी पोखरण्याचा प्रयत्न कोण करत आहे ?

५) शाहिराच्या मते संघराज्याच्या पाठीशी कोणती शक्ती उभी आहे ?

६) शाहीराने काय पणास लागले असे म्हटले आहे ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) 'रात्र आहे वैऱ्याची' यातून शाहिरांना काय सुचवायचे आहे ?

२) शाहिराच्या संदेशातून जनतेला कोणत्या सूचना केल्या आहेत ?

**क) संदर्भासह स्पष्ट करा.**

१) विजयध्वजा गगनात डोलता तळमळुनी तडफडे
पिसाळले सुर्याजी तेही संधी शोधण्याकडे

२) कंसानेही कपट योजिले कृष्ण जन्मण्या आधी
कारागारी बहिण देवकी, तिच्या भोवती प्यादी.

**क) टिपा लिहा.**

१) झेंड्याची काठी पोखरणारे किडे.

२) कोटी हातानी मूठ बांधण्याचा दिलेला संदेश.

**उपक्रम :–** १) राष्ट्रीय एकात्मतेवर २५ ओळी निबंध लिहा.

* * *

# ८. विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर

**– वामन निंबाळकर**

**परिचय :** वामन सुदाम निंबाळकर (१९४३) यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले आहे. त्यांचे 'गावकुसाबाहेरील कविता' व 'महायुध्द' हे काव्यसंग्रह प्रसिध्द. 'महायुध्द' या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र राज्याचा उत्कृष्ट वाङ्मयाचा पुरस्कार. 'दलित साहित्य : स्वरुप व भूमिका', 'आस्मितादर्शची नऊ वर्ष', 'दलित साहित्य एक वाङ्मयीन चळवळ', 'आंबेडकरी विचारांची दिशा', वैचारिक व समीक्षात्मक इत्यादी लेखन प्रसिध्द. नवव्या अ. भा. दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. अनेक वाङ्मयीन व सामाजिक संस्थामध्ये सक्रिय सहभाग.

प्रस्तुत कविता तीन टप्प्यात आहे. एक ते चार कडव्यात कविने आपल्या जीवनात आलेला संघर्ष व संघर्षावर केलेली मात. संघर्षात भेटलेले मित्र. आणि त्यांनी कधीच पराभव स्वीकारला नाही. तर सहाव्या आणि सातव्या कडव्यात समाजातील विषमता, दारिद्र्य, दास्य व स्वार्थीपणा यावर प्रकाश टाकला आहे. तर शेवटच्या दोन कडव्यातून दारिद्र्यात दास्यात राहणाऱ्या समाजाचे अज्ञान नाहीसे करून – मानवतेचा धर्म प्रस्थापित करण्याचे चित्र समोर ठेवले आहे. हे या कवितेतून व्यक्त झाले आहे. ही कविता स्वातंत्र्योत्तर मराठी १९६१–८० या काव्य संग्रहातून घेतली आहे.

---

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर
मी आज उभा आहे.
भोवती सारेच कसे पेटलेले
गर्जत असलेला उफाळणारा सागर
मी मात्र अविचल, निर्भय
हजारो वर्षाचा प्रवास करून
आज येथवर आलोय्

रस्त्यात लागणाऱ्या खाचखळग्यांना,
काट्यागोट्यांना, मी आलिंगन दिले
तेव्हा ते माझ्या परिचयाचे झाले
नव्हे माझे मित्रत्वच त्यांनी पत्करले
कारण त्यांनाही माझ्यासारखा
जिवलग मित्र भेटलाच नव्हता

मध्ये डोंगर लागला
तेव्हा चढण चढताना
मी थकलो नाही
डोंगरच बिचारा हैराण झाला
दरीत कोसळताना
माझे पाय लटपटले नाहीत
दरी मात्र कोसळत राहिली

मला थंडी वाऱ्याचे कापरे भरत नाही
माझ्या नावाने वादळ मात्र थरथरते
वावटळीत गरगरणाऱ्या
वाळलेल्या पानासारखा असा मी

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर उभा आहे
भोवती पेटलेले आहे
सागरही उसळत आहेत
आणि मी पाहतो आहे येथून
माणसे माणसांची हाडे चघळणारी
एक दुसऱ्याचे रक्त पिणारी
चिरगुट नसलेल्यांना नग्न करणारी
सावली नसलेल्यांना उन्हा पावसात फरफटणारी

अशी माणसे मात्र धूर्त, कावेबाज असतात
ती नेहमीच कोषात बसतात
तोंड द्यावयास कधीच तयार नसतात
अशा माणसांचे शरीर असणाऱ्या
जनावरांना मी पाहतो आहे.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर उभा राहून
एका हातात सूर्य, दुसऱ्या हातात चंद्र घेऊन
मला माझ्या संकल्पाचे भान आहे
एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील
रक्ताचे मोल आहे
तेच माझे इमान आहे
मी माझा शब्द गहाण टाकणार नाही

मोडेन पण कधी वाकणार नाही
तुम्ही माझ्या पावलावर पाऊल टाका
दिसणार नाही तेव्हा मला मारा हाका
आभाळ डोळ्यात साठवून
मी नजर पुढे केली
तशीच ती थेट तथागताजवळ नेली
आता मी उभारीन क्षितिजावर

मानवतेची इन्द्रधनुषी कमान
मला माझ्या संकल्पाचे आहे भान
एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील
रक्ताचे मोल आहे
तेच माझे इमान मी माझा शब्द टाकणार नाही गहाण
मी माझा शब्द टाकणार नाही गहाण

**कठीण शब्दार्थ : गर्जत**–गर्जना करत; **अविचल**–स्थिर; **निर्भय**–न भिता; **हैराण**–बेजार; **थरथरते**–घाबरते; **चिरगुट**–फाटके वस्त्र;. **फरफटणारी** –घसरत नेणारी; **धुर्त** – कपटी; **संकल्पना**–योजना.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) कवी कोणत्या शतकाच्या शेवटच्या टोकावर उभा आहे असे म्हणत आहे ?
२) गर्जत असलेला उफाळणारा कोण आहे ?
३) कविने रस्त्यात लागणाऱ्या कशा–कशांना अलिंगन दिले ?
४) कविला कोणती चढण चढतांना थकवा आला नाही ?
५) कविच्या नावाने काय थरथरते ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) कविने विसाव्या शतकाच्या टोकावर उभा राहून समाजातील कोणते वास्तवरुप पाहिले आहे ?
२) कवी माणसाचे शरीर असणाऱ्या जनावरांना मी पाहिले आहे असे का म्हणतात ?

**क) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) एका हातात सूर्य, दुसऱ्या हातात चंद्र घेऊन
मला माझ्या संकल्पाचे भान आहे.
२) आभाळ डोळ्यात साठवून,
मी नजर पुढे केली,
तशीच ती थेट तथागताजवळ नेली

**क) टिपा लिहा**

१) कवीचे इमान
२) एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील रक्ताचे मोल.

**वाक्प्रचार :–**

**अलिंगन देणे**–कवेत घेणे; **हैराण होणे**–त्रासून जाणे; **कापरे भरणे**–भीती वाटणे; **कावेबाज असणे**– कपटाने, काव्याने आपला हेतू साध्य करून घेणे; **पावलावर पाऊल टाकणे**–पहिल्याने केलेल्या कार्याचाच कित्ता गिरविणे; **आभाळ डोळ्यात साठवणे**–दूर दृष्टीने पाहणे.

* * *

# १. आई

– फ. मुं. शिंदे

**परिचय** : फकिरराव मुंजाजी शिंदे (१९४८) एम.ए. मराठी प्रथम श्रेणीत, मायदेव पारितोषकाचे मानकरी, 'जुलूस', 'सार्वमत', 'वृंदगान', 'फकिराचे अभंग' इ. काव्यसंग्रह प्रसिध्द. 'आदिम' या काव्यसंग्रहास महाराष्ट्र राज्य पुरस्कार. कवि संमेलनाचे कुशल सुत्रसंचालन म्हणून प्रसिध्द सासवड येथील २०१४व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

प्रस्तुत कविता 'आई आणि इतर कविता' या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे. या कवितेत आईचे, असणारे महत्त्व, तिचे वात्सल्य–प्रेम व तिचे असणारं अस्तित्त्व, मुलाबाळांना दिला जाणारा आधार, तिच्यामुळे घराला येणारं घरपण या सर्वातून आईची थोरवी या कवितेत व्यक्त केली आहे.

---

आई एक
नाव असतं
घरातल्या घरात
गजबजलेलं
गाव असतं !

सर्वांत असते
तेव्हा जाणवत नाही
आता नसली
कुठंच
तरीही
नाही म्हणवत नाही.

जत्रा पांगते
पालं उठतात
पोरक्या
जमिनीत
उमाळे
दाटतात

आई मनामनात
तशीच
जाते ठेवून काही
जिवाचं जिवालाच
कळावं
असं जाते देऊन काही

आई असतो
एक धागा
वातीला अजेड दावणारी
समईतली जागा

घर उजळतं
तेव्हा
तिचं नसतं भान
विझून गेली
अंधारात
की
सैरावैरा धावायलाही
कमी पडतं रान !

पिकं येतात
जातात
माती मात्र व्याकुळच
तिची कधीच भागत नाही
तहान
दिसत काहीच नसलं
डोळ्यांना
तरी
खोदत गेलो
खोल खोल
की
सापडतेच अंतःकरणातली
खाण

याहून का निराळी
असते आई ?
ती घरात नाही
तर मग
कुणाशी बोलतात
गोठ्यात
हंबरणाऱ्या गायी ?

आई खरंच
काय असते ?
लेकराची
माय असते
वासराची
गाय असते
दुधाची
साय असते

लंगड्याचा
पाय असते धरणीची
ठाय असते !

आई असते
जन्माची शिदोरी
सरतही नाही
उरतही नाही !

आई एक
नाव असतं
नसते तेव्हा
घरातल्या घरात
गलबललेलं गाव असतं !

---

**कठीण शब्दार्थ : पाल**–एक प्रकारचा लहानसा तंबू; **शिदोरी**–खाण्यासाठी बांधून घेतलेलं अन्न.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) घरातल्या घरात गजबजलेलं गाव कोणतं ?
२) पोरक्या जमिनीत कशाचे उमाळे दाटतात ?
३) सैरावैरा धावायला काय कमी पडते ?
४) गोठ्यातील वासरे कोणासाठी हंबरतात ?
५) कविच्या मते आई कशाची शिदोरी असते ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) आईचे अस्तित्त्व कविने कसे दाखवून दिले आहे ?
२) कविने कोणकोणत्या उपमानी आईचे महत्त्व विषद केले आहे ?

**क) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) ''आई एक नाव असतं.
घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं''
२) आई असतो एक धागा.
वातीला उजेड दावणारी समईतली जागा.''

**क) टिपा लिहा.**

१) आईचे महात्म्य　　२) आईविना पोरकेपणाच्या व्यथा

**उपक्रम :–** आईसारखे दैवत नाही या विषयावर २० ते २५ ओळी निबंध लिहा.

* * *

# १०. सखी

**– हिरा बनसोडे**

**परिचय** : हिरा गुलाबराव बनसोडे (१९३९) माहेरी व सासरच्या घरी फारसे कुणी शिकलेले नसल्याने शिक्षणाची आनास्था. गाण्याची आवड नवव्या वर्गात असतानाच वयाच्या १४व्या वर्षी लग्न झाले. शिक्षणात खंड पडला. शिक्षणाची आवड म्हणून पती व सासऱ्याच्या परवानगीने खाजगी क्लासमधून एस.एस.सी. पास. रेल्वेत नोकरी मिळाली. पुन्हा शिक्षणात खंड पडला. तेरा वर्षांनी नोकरी व घर सांभाळून एम.ए. पूर्ण. त्यांनी लिहिलेले पौर्णिमा, फिर्याद, कवितासंग्रह. काही कवितांना पारितोषिके मिळाली. आत्मलेखन भाषांतरित. मुंबई दलित स्त्री साहित्य मंचच्या अध्यक्षा. त्यांच्या कवितेतून दलित स्त्रीवर होणारा अन्याय, परवड, सोशिकता, संयम या सर्व भावनांचे तरल व प्रत्ययकारी अविष्कार घडविते. ही त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये.

प्रस्तुत कवितेत समाजात असणारी जात कशी मुळे घट्ट रोवून उभी आहे. ती आजही मोडलेली नाही. हे सांगण्यासाठी त्यांनी सवर्ण जातीतील आलेली स्त्री आणि जेवायला वाढायला येत नाही म्हणून परत जातीवर जाणाऱ्या स्त्रीचे ढोंगीपण व्यक्त केले आहे. ही कविता 'विद्रोही कविता' यातून घेण्यात आली आहे.

---

सखी,
आज प्रथमच तू माझ्याकडे जेवायला आलीस,
नुसतीच आली नाहीस तर तुझी जात विसरून आलीस.
सहसा बायका परंपरेची विषमता विसरत नाहीत.
परंतु तू आभाळाचे मन घेऊन आलीस,
माझ्या वीतभर झोपडीत,
वाटलं, जातीयतेचा तू कंठच छेदला आहेस,
माणसाला दुभंगणाऱ्या दऱ्या तू जोडीत आली आहेस.

खरंच सखे, फार फार आनंदले मी,
शबरीच्या भोळ्या भक्तीनेच मी तुझं ताट सजविलं,
किती धन्य वाटलं मला !
पण... पण ताट बघताच तुझा चेहरा वेडावाकडा झाला,
कुत्सित हसून तू म्हणालीस,
''इश्श ! चटण्या, कोशिंबिरी अशा वाढतात का ?
अजून पान वाढायलाही तुला येत नाही
खरंच, तुमची जात कधीच सुधारणार नाही !''

माझा जीव शरमून गेला...
मघाशी आभाळाला टेकलेले माझे हात
चटकन कुणीतरी छाटल्यासारखे वाटले,
मी गप्प झाले.

जेवण संपता संपता तू मला पुन्हा विचारलेस,
''हे गं काय ? मागच्या भातावर दही, ताक काहीच कसं नाही ?
बाई गं, त्याशिवाय आमचं नाही हो चालत... ?''
माझं उरलंसुरलं अवसानही गळालं
तुटलेल्या उल्केसारखं,
मन खिन्न झालं, सुन्न झालं पण...
पण दुसऱ्याच क्षणी मन पुन्हा उसळून आलं
पाण्यात दगड मारल्यावर जसा तळाचा गाळ वर येतो,
तसं सारं पूर्वायुष्य हिंदकळून समोर आलं,
सखे, दही–ताकाचं विचारतेस मला !
... कसं गं सांगू तुला ?
अगं, लहानपणी आम्हाला चहालासुध्दा दूध मिळत नव्हतं,
तिथं कुठलं दही आणि कुठलं ताक ?
लाकडांच्या वखारीतून आणलेल्या टोपलीभर भुश्शावर –
माझी आई डोळ्यांतला धूर सारीत स्वैपाक करायची
मक्याच्या भाकरीवर लसणाची चटणी असायची कधीमधी,
नाहीतर भाकरी कालवणाच्या पाण्यात चुरून खायची आम्ही,
सखी, श्रीखंड हा शब्द आमच्या डिक्शनरीत नव्हता तेव्हा,
लोणकढी तुपाचा सुगंध घेतला नव्हता माझ्या नाकाने,
हलवा, बासुंदी चाखली नव्हती कधी या जिभेने,
सखी, तुझी परंपरा तू सोडली नाहीस
तर तिची घट्ट मुळे तुझ्या मनात रुजलेलीच आहेत
हेच त्रिवार सत्य आहे.

मैत्रिणी, मागच्या भातावर दही नाही
म्हणून रागावू नकोस गं...!
तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थांचा क्रम चुकला
यात माझा काय दोष हे मला सांगशील का ?
माझा काय दोष हे मला सांगशील का ?

---

**कठीण शब्दार्थ : शिमा–**मर्यादा; **छेदने–**पार करणे; **दुभंगणे–**एकमेकापासून वेगळे होणे; **शबरी–**रामायणातील प्रेमापोटी रामाला उष्टी बोरे देणारी स्त्री; **कुत्सित–**हीन लेखने; **छाटणे–**कापणे; **अवसान–** ताकत, **उल्का–** अवकाशातील एक तारा, **खिन्न**–उदास, **सुन्न**–बेभान; **हिंदकळून**–उचंबळून, **चाखणे**–चव घेणे, **लोणकढी**–ताकाला तुपाची फोडणी देऊन केलेला पदार्थ.

**स्वाध्याय –**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) कवयित्रीच्या घरी कोण जेवायला आले आहे ?

२) सहसा बायका काय विसरत नाहीत ?

३) सखीला जेवताना मागच्या भातावर काय पाहिजे होते ?

४) कवयित्रीच्या जीभेने लहानपणी कोणते पदार्थ चाखले नव्हते ?

५) कवयित्री लहानपणी कालवणाच्या पाण्यात काय चुरुन खात असे ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) कवयित्रीने बालपणात भोगलेल्या दुःखद प्रसंगाचे वर्णन करा.

२) सवर्ण मैत्रीण घरी जेवायला आल्याचा आनंद व त्यातून झालेला भ्रमनिरास यावर सविस्तर लिहा.

**क) संदर्भासह स्पष्ट करा.**

१) वाटलं, जातीयतेचा तू कंठच छेदला आहेस,
माणसाला दुभंगणाऱ्या दऱ्या तू जोडीत आली आहेस.

२) अगं, लहानपणी आम्हाला चहालासुध्दा दूध मिळत नव्हतं,
तिथं कुठलं दही आणि कुठलं ताक ?

३) तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थाचा क्रम चुकला
यात माझा काय दोष हे मला सांगशील का ?

**क) टिपा लिहा**

१) कवितेतील जातीय जाणिवा.

२) दारिद्र्यातील जीवन अनुभव.

**वाक्प्रचार :**

**आभाळाचे मन असणे–**मनाची विशालता असलेला; **कंठ छेदणे–**सिमा पार करणे; **कुत्सीत हसणे–**हीन लेखणे; **हात आभाळाला टेकणे–**अतिशय आनंद होणे; **अवसान गाळणे–**दुःख होणे; **मन खिन्न होणे–**उदास होणे; **सुन्न होणे–**बधिर होणे; **हिंदकळून येणे–**गत जीवनातील आठवणे.

**उपक्रम :–** जातीयता मानवतेवरील कलंक आहे यावर निबंध लिहा.

* * *

# ११. निष्ठा

**– प्रदीप पाटील**

**परिचय** : प्रदीप यशवंत पाटील (१९६३) १९९० नंतर काव्यलेखन करणारे प्रसिध्द कवी – आत्म संवाद, अंतरीचा भेद हे प्रसिध्द काव्यसंग्रह. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा राज्य पुरस्कार प्राप्त. तसेच यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार, कोकण मराठी साहित्य परिषदेचा मराठी कविता राजधानी पुरस्कार.

प्रस्तुत कविता 'अंतरीचा भेद' या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे. प्रस्तुत कवितेतून अहोरात्र कष्ट करणाऱ्या शेतकरी बापाचे वर्णन आले आहे. शेतकऱ्याची काळ्या मातीवर अपार निष्ठा आहे. आजचा माणूस मात्र स्वार्थी झाला आहे व माणूसकीला पारखा झाला आहे अशी खंत कवीने या कवितेत व्यक्त केली आहे.

---

वारकऱ्याचा नेम चुकंल वारीचा
पण माझ्याबापाचा नेम चुकत नाही
रानात जायचा
गाव पहाटेचं स्वप्नात असतं
तेव्हा बाप असतो रानात
व्यवहारी जगातल्या प्रश्नांपासून
आटिंग्यावनासारखा तो शेकडो मैल दूर
'उगवतं ते माझं आणि
सापडतं ते दुसऱ्याचं' अशी त्याची नीती
जगणं मातीमोल व्हायची वेळ आली तरी.
कधीच कमी झाली नाही
त्याची मातीवरची निष्ठा
परिस्थितीला रेड्यासारखी टक्कर द्यायचं बळ
मातीनंच दिलं असावं त्याला
'पेरायला आणि दारं मोडायला आलं की
सगळं बैजवार होतं' अशी त्याची शिकवण
मी रानाबरोबर माणसं पेरायला शिकलो
आता रानात पीक मावता मावत नाही
पण माणुसकी मात्र
उगवता उगवत नाही.

---

**कठीण शब्दार्थ : नेम–**नियम; **मैल–**अंतर मोजण्याचे पूर्वीचे माप; **नीती–**न्याय (वर्तन); **निष्ठा–**दृढ विश्वास; **बळ–**ताकद, शक्ती; **बैजवार–**व्यवस्थित, उत्तम; **दोर मोडणे–**पाण्याला शेतात वाट काढून देणे.

**टीप :**

**१) वारी–**पंढरपूरची यात्रा; **२) वारकरी–**नित्यनेमाने पंढरपूरची वारी करणारा विठ्ठलभक्त; **३) आंटिग्यावन–**खूप खूप दूर असलेले घनदाट जंगल.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :-**

१) रानात जायचा कोणाचा नेम चुकत नाही ?

२) बापाला परिस्थितीशी टक्कर घ्यायचे बळ कोणी दिले ?

३) कवी रानाबरोबर काय पेरायला शिकला ?

४) बापाची कशावरची निष्ठा कधीच कमी झाली नाही ?

५) शेतात काय उगवता उगवत नाही ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) कष्टकरी शेतकऱ्याची निष्ठा व नीती कशी आहे ?

२) 'निष्ठा' या कवितेचा भावार्थ लिहा.

३) 'माणूसकी उगवता उगवत नाही' अशी खंत कवी का व्यक्त करतो ?

**क) संदर्भासह स्पष्ट करा.**

१) वारकऱ्याचा नेम चुकलं वारीचा
पण माझ्या बापाचा नेम चुकत नाही
रानात जायचा

२) गाव पहाटेच स्वप्नात असत
तेव्हा बाप असतो रानात.

**ड) टिपा लिहा :**

१) बापाची शिकवण

२) निष्ठा - कवीची खंत

**व्याकरण :**

**वाक्प्रचार :**

१) **मातीमोल होणे**-नाहीसे होणे

२) **नेम चुकणे**-नित्य रिवाज चूकणे

३) **टक्कर देणे**-सामना करणे

४) **बैजवार होणे**-सर्व व्यवस्थित होणे.

* * *

# १२. जीव माझा गुतलाय

**– वंदना किणीकर**

**परिचय** : वंदना शशीकांत किणीकर (१९४५) शिक्षण सोलापूर, एम्.ए.बी.एड् आणि हिंदी पंडित, अध्यापनाचे कार्य, अरुणोदय, क्षितिजरंग हे काव्यसंग्रह प्रसिध्द, कविता स्पर्धेत परिक्षकाचे कार्य, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पणजी, बेळगाव, हरियाणा, दिल्ली, गुलबर्गा, सोलापूर इ. ठिकाणी काव्यवाचन अनेक दैनिक आणि अनुबंध त्रैमासिकातून कविता प्रसिध्द, जागृती हा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित, अनुबंध या त्रैमासिकाच्या संपादक मंडळात कार्य करीत आहेत.

ही कविता 'अरुणोदय' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. आई कामात मग्न असली तरी तिचे लक्ष मन मुलीत गुंतलेले असते. ती क्षणभरही मुलीला विसरु शकत नाही. मुलीच्या बरोबर तिचा पती, सासरचेही ती कौतुक करते. मुलगी मोठी होऊन सासरी गेली तरी तिचे मन मुलीत गुंतलेले आहे. आईचे प्रेम या कवितेतून व्यक्त झालेले आहे.

---

वाकळ शिवता दोऱ्यासंगे
मन माझं बाई वढाय वढाय
माझ्या बाळीत जीव माझा गुतलाय ।।धृ.।।

राजस केळी सोनसावळी
घडीघडीला समोर येती
जोत आंगण दिंडीदरवाजा
पाऊलखुणांनी सजला हाय
माझ्या बाळीत जीव माझा गुतलाय ।।१।।

विहिरीवरती पाणी भरता
ओढ्याच्या काठी धुणं धुता
गावचं राघू फडफड करता
नदर पायांवर खिळून ऱ्हाय
माझ्या बाळीत जीव माझा गुतलाय ।।२।।

तिच्या रूपानं तिच्या गुणानं
शिवार अजून डुलतंय ग
सायंकाळी पिंपळपारही
तिला आठवून फुलतोय गं
साऱ्या गावाची ती तर लेकच हाय
माझ्या बाळीत जीव माझा गुतलाय ।।३।।

साता समिंदरा पल्याडला बाई
गुणवंता कुणी आला ग
अंगणातली तुळस मंजिरी
अलगद खुडून गेला ग
राम–सीतेची बघून जोडी
डोळ्याचं पारणं फिटलं हाय
माझ्या बाळीत जीव माझा गुतलाय ।।४।।

जावई माझा भला चांगला
तळहातावर झेलतो तिजला
दहाजणांचं दहा गुणांचं
खटलंच लई तिचं मोठं हाय
माझ्या बाळीत जीव माझा गुंतलाय ।।५।।

---

**कठीण शब्दार्थ : गुतलाय**–लळा लागणे; **वाकळ**–जुन्या कपड्यापासून शिवून तयार केलेले मोठे वस्त्र; **वढाय**–ओढ लागणे; **जोत**–वाड्याच्या आतील बाजूस असलेली बैठक व्यवस्था; **दिंडी दरवाजा**–घराचे प्रवेशद्वार; **शिवार**–शेत; **समिंदर**–समुद्र; **खटल**–जास्त व्यक्ती असलेले कुटुंब.

**स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा :–**

१) कवयित्रीचा जीव कोठे गुंतला आहे ?
२) बाई धुणं धुण्यास कोठे गेली आहे ?
३) वाकळ कोण शिवत आहे ?
४) राम–सीतेची उपमा कोणाला दिली आहे ?

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) आई आणि बाळी यांच्यातील मायलेकीचे नाते कवयत्रीने कोणत्या शब्दातून व्यक्त केले आहे ?
२) बाळीचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

**क) टिपा लिहा**

१) आईच्या मुलीविषयीच्या संवेदना.
२) बाळीचे सासर

**ड) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) राजस केळी सोनसावळी घडीघडीला समोर येती
२) दहाजणांचं दहा गुणांचं खटलंच तिचं मोठं हाय.

**उपक्रम :–** 'स्त्री भ्रुणहत्या – ज्वलंत समस्या' यावर निबंध लिहा.

* * *

# स्थूल वाचन विभाग

# १. पाझर

**– राजन गवस**

**परिचय** : प्रा. राजन गणपती गवस (१९५९) समकालीन समाजातील असणाऱ्या वृत्ती–प्रवृत्ती, मानवी स्वभाव, बदलते समाजमन याचे कांगोरे अत्यंत संवेदनशीलतेने मांडणारे, ग्रामीण जीवन व संस्कृतीचे वास्तव व परखडपणे लेखन करणारे असे हे लेखक 'चौंडक' 'भंडारभोग', धिंगाणा', 'कळप', 'तणकट', 'ब–बळीचा' इत्यादी कादंबऱ्या 'रिवणावायली मुंगी' 'आपण माणसात जमा नाही' हे कथासंग्रह 'काचाकवड्या', 'कैफियत' हे ललित लेखसंग्रह. 'हुंदका' काव्यसंग्रह 'सीमाभागातील मराठी बोली' 'देवदासी चळवळीचा इतिहास' इ. सं संशोधनपर लेखन.

त्याना साहित्य अकादमी, 'भैरुरतन दमाणी' वि. स. खांडेकर ह. ना. आपटे' 'ग. ल. ठोकळ इ. पुरस्काराने सन्मानित केले.

'आपण माणसात जमा नाही' या त्यांच्या कथासंग्रहातून ही कथा घेतलेली आहे. या कथेत देशात घडलेली घटना त्या घटनेचा गावातली मुलांच्यावर झालेला परिणाम त्यातून निर्माण झालेला संघर्ष पण त्यातून 'माणुसकीचा वाहणारा पाझर या कथेतून व्यक्त होतो.

---

''ताऽऽ जेऽऽ गरमऽऽ पाऽऽ वऽऽ'' बाबलच्या आरोळीनं गल्ली भरून गेली. आपोआप अंथरुणात झोपलेली पोरंही खडबडून जागी झाली. कोणी पसा दोन पसा भात, कोणी शेंगा, कोणी मिरच्या, कोणी पैसे घेऊन बाबलच्या सायकलकडे धावणार. ही गेल्या पाच–सहा वर्षांची नेहमीचीच गोष्ट. बाबलची धांदल, शेंगा, भात, मिरचीसाठी वेगवेगळ्या पिशव्या. त्यात पोरांची पसामूठ ओतायची. त्यांच्या हातावर बनपाव ठेवायचे. गडी दोन हातानं दहा हातांचं काम झटक्यात करायचा. हेही नेहमीचंच. बाबलची सायकल तिकटीवर थांबली. शिंद्याच्या गल्लीतनं तीन–चार पोरं धावत आली. त्याची धावपळ सुरू झाली. मात्र तोंड सुरूच ''ताजेऽऽ गरऽऽमऽ पाऽवऽऽ'' त्यातच पोरांच्या हातातलं पिशवीत ओतणं. बनपाव हातावर ठेवणं. पोरं गडबडीनं घराकडं पळत होती. अशातच जना न्हावीण दारातनंच तणतणत आली. बाबलच्या सायकलच्या हँडलला धरून एकदम ओरडतच म्हणाली, ''बाबल्या, दिसत न्हाई व्हय रंऽऽ भाड्याऽऽ'' बाबल एकदम दचकला. त्यानं भोवतीच्या पोरांना थांबवलं. जना न्हाविणीचा अवतार बघून जरा घाबरतच म्हणाला, ''झालं काय काकूऽऽ''

''व्हतंय तुजं डोंबाल. मुडद्याऽऽ पोरगं घटकाभर हातात पैसं घिऊन थांबलंय, त्याच्याकडं बगशील तरी का न्हाईऽऽ'' जना न्हाविणीचा नातू सायकलच्या पुढच्या चाकाला टेकलेला. भोकाड पसरलेलं. बाबलनं त्याला अलगद उचलून बनपावाच्या पेटीवरच बसवलं. म्हणाला, ''घेऽऽ लेकराऽऽ तुझ्या हाताला येतील तेवढं पाव घेऽऽ तुजी आज्जी लई चवताळलीयाऽऽ'' जना न्हाविणीलाही एकदम हसू फुटलं. राग कुठच्या कुठं गेला. बाकीची पोरं जोरानं हसाय लागली. हळूहळू गर्दी पांगत गेली. एकाच तिकीटावर एक डबा निम्मा–अर्धा खल्लास झाला. बाबलनं हुऽऽशऽऽ केलं. त्यानं सायकल स्टँडवरनं काढली. ढकलाय सुरुवात करतच पुन्हा आरोळी दिली, ''ताजेऽऽ गरमऽऽ पाऽऽ वऽऽ'' मिसाळाच्या दारात तुका मोठ्या बैलांच्या खांद्यावर खंदाडी ठेवत होता. सायकलला बैलं बुजतील म्हणून बाबलनं सायकल थांबवली. पाठीमागं कोण पोरगं येतंय काय बघायला गल्लीच्या तळापर्यंत नजर टाकली. अशात गणू मिसाळ दारात येतच म्हणाला, ''बाबल, झाला का न्हाई डबा रिकामा ?''

''कुठला तात्या ! आता तर आलोय. वरच्या गल्लीपत्तो व्हईल रिकामा.''

''त्या आमच्या भोसडीच्यालाबी आसं काय तरी कराय लाव की रंऽऽ'', तुका मोट्या खंदाडी जुपून खांद्यावर चाबूक टाकतच त्याच्याजवळ आला.

''काका, माज्या नशिबाला लागलंय तेवढं बास झालं की ! त्ये तुमी आनी का मागून घेता ?'' म्हणतच बाबलनं हेरलं, बाप–लेकाचं सकाळी सकाळी वाजलंय.

''तुझ्या नशिबाला काय झालंय ? राबून, घाम गाळून मिळवितोस. चोऱ्यामोऱ्या तर करत न्हाईस ?'' गणू मिसाळनं मध्येच तोंड घातलं.

''त्येच म्हणतो गाऽ मी. न्हाय तर आमचा भाड्या. ह्येच्याच वारगीचा. आजून हातरुणात झोपलाय.'' तुका मोट्याची जखम भळभळाय लागली. बाबलनं सायकल हलवली. त्याला विषय वाढवायचा नव्हता. त्यानं पुन्हा आरोळी दिली. चढावाला सायकल रेटताना त्याचा आवाज आपोआप चिरका झाला.

जैतुनबीनं पवाराच्या लग्गीवर काकणांची बुट्टी उतरवली. पहिलं तांब्याभर पाणी मागून घेतलं. चांगली दोन गावं पालथी घालून आली होती; पण एकदा का उंबऱ्याच्या आत पाय टाकला की बाहेर निघणं कठीण. 'त्यापेक्षा सरळ पवाराच्या बाळंतिनीला काकणं भरूनच घर गाठावं. म्हणजे त्यांचाही खुळांबा नाही.' म्हणून तशीच ती पवाराच्या उंबऱ्याला थडकली होती. घटाघट अर्धा तांब्या पाणी पिल्यावर तिला थोडं थंड वाटाय लागलं.

पवाराच्या म्हातारीनं लांबलचक घोंगडं अंथरलं. भिंतीला टेकून जैतुनबीनं काकणांची बुट्टी जवळ ओढली. मग गडबडीनं म्हणाली, ''आत्यासाब, ताईसाबास्नी बलवा. सांज झाली.''

''व्हय लेकी, तुजंबी जेवाण–पाणी. बलीवतोच,'' म्हणत आत गेली. जैतुनबीनं हिरव्यागार काकणांच्या सरी बुट्टीतनं अलगद बाजूला काढल्या. पवाराची म्हातारी आतनं तिच्याजवळ येऊन टेकतच म्हणाली, ''आली हंऽऽ पोराला पाजतियाऽ आलीच.''

''येऊ द्यात घे.'' म्हणतच जैतुनबीनं बुट्टीची उलथापालथ सुरू ठेवली. सगळ्या लग्गीभर काकणांचा आवाज. अशात कसाळ्यांची गुणा लगबगीनं आत आली.

''बरं झालं बाईऽऽ हितंच गावलीसऽ न्हाईतर घराकडं हेलपाटा झाला अस्ता.'' जैतुनबीच्या पुढ्यात टेकतच म्हणाली, ''सकाळी सकाळी म्हशीनं शिंगाचा व्हडांगा मारला आणि हातच मोकळा झाला.'' गुणानं पदराखालचा भुंढा हात जैतुनबीसमोर धरला. ''म्हशीनं व्हडांगा मारला का नारबानं फोकलली ?'' पवाराची म्हातारी तोंडाला पदर लावतच म्हणाली, तशी जैतुनबीही मन लावून हसली.

''झालं की आत्यासाब आता निम्मं वय. आता कशाला मार खाईन त्येंचा ?'' म्हणतच काकणांच्या रंगात ती हरवून गेली. अशातच पवाराची बाळंतीन शेजारी येऊन टेकली. जैतुनबीनं गडबडीनं गुणा कसाळनीला काकणं भरली. बाळंतिनीचा हात हातात घेतला. थंडगार स्पर्श तिच्या अंगभर पसरला. मेणाची वडी, सेज बाळंतिनीच्या हाताला घासली. हिरव्या काकणांची जोडी हातात घेऊन हळूच सरकवायला सुरुवात केली. मध्येच कटकन आवाज झाला. तिनं फुटकं कांकण बाजूला केलं.

''आता हासन कुठं आस्तोय गंऽऽ ?'' म्हातारीनं एकाएकी विषय काढला. ''आस्तोय न्हवं कोलापुरात.'' जैतुनबीला तो विषय नको होता.

''बायका–पोरंबी तिकडंच ?''

''हंऽऽ'' ती काकणांची जोडी अलगद सरकवतच हुंकारली.

''तुझ्याजवळ ऱ्हाला आस्ता तर तेवढाच आधार झाला अस्ता.''

''कशाचा आधार ? गेला त्येच बरं झालं. आता ही मायलेकरं मिळवून खात्यात त्येबी खाऊ दिलं नस्तं. व्हतंय त्ये, म्हणायचं.'' गुणा कसाळनीनं मध्येच तोंड घातलं.

''त्येबी खरंच. पोरीनं हिमतीनं दिवस काढलीन. हिला म्हणायची भाद्दरीन. न्हवरा मेला तवा रांगतबी न्हवता बाबल. हसन्या टुकटुकु बघत बसलंतं मढ्याकडं. आजून जसंच्या तसं नदरंसमोर येतंय. भाद्दरीन डगमगली नाही. न्हानाची मोठं केली पोरं. गावच्या पोरांबरबर शिकीवलीन भाद्दरनीनं.'' जैतुनबी काहीच बोलत नव्हती. तिनं गडबडीनं बाळंतिनीला हात भरून काकणं भरली. फुटक्या काकणांच्या काचा गडबडीनं गोळा केल्या. घोंगडं उचलून गल्लीच्या सारणीनं झाडून आणलं. गुणाला काकणांच्या बुट्टीला हात लावायला लावून ती उंबऱ्याच्या बाहेर आली. ''जातो आत्यासाब,'' म्हणत रस्त्याला लागली.

''माझं काय चुकलं व्हयगंऽ गुणा ?'' पवारची म्हातारी एकदम काळजीत पडली.

''मलाबी त्येच काय कळेना आत्यासाब. धडाधडा बोलणारी जैतुनबी एकाएकी गप्प झाली. चकारबी बोलली न्हाई.'' गुणानं म्हातारीची काळजीच वाढवली आणि आपल्या घराकडं वळली.

जैतुनबी दारात पोहोचली. बाबलची सायकल भिंतीला दिसत नव्हती. तिनं एकदम सुस्कारा सोडला. गडबडीनं दाराचं कुलूप काढलं. काकणांची बुट्टी आत घेतली. बलप लावला. एवढ्यात सुताराची इटी ''भाभीऽ भाभीऽ'' करतच आत घुसली. म्हणाली, ''बाबलदादा आला आणि गडबडीनं गेला.''

''काय सांगून गेला ?''

''काय बी न्हाईऽऽ''

जैतुनबीनं न्हाणीत हातपाय खळखळून धुतलं. पदरानं तोंड पुसलं. गडबडीनं चूल पेटवावी म्हणून ती चुलीकडं वळली. अशात बाहेरनं हाक, ''भाभीऽ बाबल आलाय काय ?' आवाज गोंदा पाटलासारखा वाटल्यानं ती तशीच दाराला आली. तर गोंदा पाटील दारात. गावातल्या म्हाताऱ्याकोताऱ्या पुरुष माणसाची ती भाभीच. ''न्हाईबा आला. आत तरी येवा मामासाब.'' म्हणत ती आत वळली.

''आत न्हाई ईत. जरा सकाळी सवड काढ म्हणावं बाबलला. म्हसोबाला कोंबडा द्यायचा म्हणत्यात. त्यो धंद्याला भाईर पडायच्या आत मोकळं करतो म्हणावं. खुळांबा नको करू म्हणावं.'' म्हणतच गोंदा पाटील वळला. चालायला लागला. जैतुनबी तशीच उभी राहिली.

गावात एकच मुलाण्याचं घर. मोठी करणा... देवाचं करायचं. घरात बाबलला बोलावणं आलेलं. हाक मारली की बाबलही हातातला धंदा सोडून निघाला. निम्म्याच्या वर घरं सल्ला घातल्याशिवाय खातच नव्हती. त्यामुळं बाबललाही कोणाचं मन मोडवायचं नाही. आपलं पोरगं आपोआप कसं समंजस होत गेलं, याचंच जैतुनबीलाही कोडं वाटायचं.

ती परत आत वळली. चुलीपुढं तिचं काय–बाय सुरू झालं. आबा मास्तरच्या लग्गीवर टी.व्ही.समोर पाचपन्नास पोरं. सगळी डोळं टी.व्ही.वर रुतवून बातम्या बघत होती. संसदेवरच्या हल्ल्याचं सचित्र वर्णन चाललेलं. पुनःपुन्हा तीच चित्रं. तेच वर्णन...

''च्या आयला घुसली आस्ती आत म्हणजे पाचपन्नास उडीवली अस्ती.'' मध्येच एक आवाज.

''भलती खतरनाक जात गड्या. जिवावर उदार.'' दुसरा आवाज. पुन्हा सगळी शांतता. फक्त टी.व्ही.वरच्या निवेदकाचा आवाज. बातम्या संपल्या. पोरांचा लोंढा आबा मास्तरच्या घरातून गल्लीत आला.

''एका झटक्याला मिल्ट्री घुसवून हाणून टाकाय पायजेत सगळी.'' एक आवाज. ''आपल्याच नेत्यांची

फूस हाय त्यास्नी. मग ती काय गा गप्प बसत्यात ?'' दुसरा. नंतर आवाज एकमेकांत मिसळत गेले. तिकटीतिकटीवर थांबून चर्चा सुरू झाली. ''आपल्या तालुक्यातली ह्या अतिरेक्यातलं कोणकोण इथून जातंय म्हणं.''

''छट्, उगाच मारू नगो बाता. हिकडं कशाला येत्यात ती ? आनि हितं कोन त्यास्नी थारा देणार ?''

''आसं म्हणू नगो गड्या. त्या फिरगावच्या मशिदीत आठवड्याला भाईर देशाच्या मुसलमानाची गर्दीचगर्दी आस्ती.''

''आरंऽ ती भाईर देशाची न्हवंत, हितलीच आस्त्यात कुटलीकुटली. त्येंच्या जमातीचा ड्रेस घालत्यात म्हणून वाटतंय तुला.''

''खरं येत्यात काय न्हाई सांग ?''

''ईत आस्तील गाऽऽ त्येंच्या धर्माचं काय काय मशिदीत चालल्यालं आस्तंय, त्यासाठी येत्यात. येऊन काय काय करायचं ठरवीत आसत्यात.''

''आस्तील बाबा, काय नेम न्हाई. कर्नाळ्याच्या हायस्कुलातला त्यो बागवान मास्तर ह्येच्या आदी आपल्यासारखाच असायचा. आता गडी पार बदललाय. डोक्यावर मुसलमान टोपी. दाढी वाढवलीया इजारीशिवाय नस्तोयच आता. मला तर वळखलाच न्हाई पहिल्यांदा.''

''काय सांगतोस ?''

''आता काय खोटं सांगतोय. आरं आता त्येंच्यात लई एकजूट चाललीय.''

रात्र वाढत चालली तशी आपोआपच चर्चा थंड पडत गेली. नंतर तिकटीतिकटीवर फक्त शांतता.

बाबल नेहमीसारखा सकाळी गावातून सायकल फिरवत, आरोळ्या देत आपल्या दारात आला. जैतुनबी काकणांची बुट्टी घेऊन कधीच घराबाहेर पडलेली. त्यानं सायकल भिंतीला टेकवून पिसव्या आत घेतल्या. रिकाम्या केल्या. डब्यात पुन्हा बनपाव भरले. पिशव्या अडकवल्या. थोडंसं खाऊन घेतलं. एक भाकरी आणि झुणका फडक्यात बांधून पिशवीत टाकला. शेजारचं एखादं गाव करावं म्हणून त्यानं सायकल रस्त्याला लावली.

मारुतीच्या देवळाजवळ नेहमीची गँग बसलेली. त्यानं जाता जाताच हाक मारायची म्हणून विचारलं,

''घेता का बनपाव ?''

''ये बाबल, जरा इकडं तर ये.'' पारावर बसलेल्या मान्याच्या पोरानं हाक दिली. ''गड्यानु टाईम व्हतोय'' म्हणत बाबल पुढं चालला. तर मान्याच्या पोरानं पळत पळत येऊन सायकलच धरली. बाबल उतरला. पाराजवळ सायकल घेऊन गेला. पाटलाच्या पोरानं विषय काढला.

''बाबल, तुझ्या भाऊबंदांनी काय केलं बघितल्यास ?''

''च्या आयलाऽ'' बाबलला काय कळालंच नाही. तो फक्त हसला.

''हसंतोय बघ कसाऽऽ ह्याबी बरंच वाटलंय.'' –एकटा.

''वडा की रंऽऽ'' – दुसरा.

एवढ्यात, बसलेल्या दोन–तीन पोरांनी पारावरून उड्या टाकत त्याची सायकल अलगद उचलली. बाबलला काही कळायच्या आत आपटायला सुरुवात केली, तर दुसरे दोघे–तिघे त्याच्या अंगावरच धावले.

''हाणा रंऽऽ'' दोघा–तिघांचे आवाज.

बाबल एकदम दचकला. जिवाच्या करारावर पळाला. त्यानं थेट गोंदा पाटलाचं घर गाठलं. एकदम

चुलीच्या खोप्यात जाऊन तो मटकन खाली बसला. त्याची एकदम दातखिळीच बसली. गोंदा पाटलाची बायको शांताबाई एकदम किंचाळलीच. शेजारीपाजारी गपापा जमा झाले. कोण बाबलच्या तोंडावर पाणी माराय लागलं. कोणी चप्पलचा वास दिला. शेवटी उलथन्यानं पेचकटून दातखिळी काढली. बाबलनं डोळं उघडलं. सगळ्या बायाबापड्यांचा घुपला. तो उठून बसला. त्याला काहीच बोलता येत नव्हतं.

गोंदा पाटलानं बाबलला लग्गीवर घेतलं. ती पोरं कोण कोण व्हती, हे फांगसून–फांगसून विचारायला सुरुवात केली. बाबलचं हूं नाही का चूं नाही. गप्प गुडघ्यात मान घालून बसलेला. शेवटी गोंदा पाटलानं स्वतःच मारुतीच्या देवळाकडं चक्कर टाकली. पारावर चिटपाखरू नाही. शेवटी गल्लीतल्या बारक्या पोरांना गोळा करून गोंदा पाटलानं एक–एक नाव काढलं. मग घर–घर गाठून पोरांना हुडकायला सुरुवात केली, तर सगळी पोरं पसार. गोंदा पाटील घराकडं परतला. त्याचं डोकं भिरभिरल्यागत झालं होतं. आल्या–आल्या त्यानं तांब्याभर पाण्यानं डोकं भिजवून घेतलं. मग बाबलसमोर बसतच म्हणाला, ''पोराऽऽ तू जरासुध्दा भिवू नगं. तुज्या केसाला धक्का तर माज्या जिवाला धक्का.''

''कुणाकुणाची व्हती गाऽऽ ती कार्टी ?'' तानू सुतारणीनं न राहवून विचारलं.

''आसू द्या कुणाची बी. संध्याकाळी बघूया. आता पळाली. कुठं गाव सोडून जात्यात काय बघू या.'' गोंदा पाटलाचा आवाज चढला. बाबल एकदम गुडघ्यातनं मान वर काढत म्हणाला, ''तात्या, आमाला वाकड्यात न्हाई शिरायचं. गावात मी एकटा गडी. पोट भरून खायाचं. कुणाचं कशाला वैर ? त्यास्नी काय कळतंय ? सोडून द्यायचं.''

''तू म्हणशील तस्सं करू या. तू कोरभर भाकरी खा. इथंच बसून न्हा.'' म्हणत गोंदा पाटलानं पायात चप्पल चढवली. बाहेर पडला. गोंदा पाटील बाहेर पडल्या पडल्या पुन्हा बायकांनी घर भरलं.

''कुणाची व्हती गा ती कार्टी ?'' पुन्हा तोच प्रश्न.

''तुज–त्येंचं काय तोंडातोंडी झाल्लं ?'' दुसरा प्रश्न.

''अगऽऽ बाबल्या कधी कुणाला तोडून बोलल्याला बघितला हाईस ? शेंबड्या पोरांनाबी दादा–मामाशिवाय बोलत न्हाई. मग त्येचंत्येंचं तोंडातोंडी व्हईलच कसं ?'' एकटी.

''घीरणी, उंडगी फिरणारी कुत्री. त्यास्नी ह्यो पोट भरून मिळवून खातोय ह्ये कसं बगवंल ? पोटात वायगोळा उठणारच की !'' – दुसरी.

''आमी डोळ्यानं बघितलंय बाईऽऽ जैतुनबीचा न्हवरा मेला तवा एवढी एवढी बच्ची व्हती दोनी पोरं. बाईचा ढळ फुटला. सगळं गाव हाळहाळलं. रातभर जैतुनबीचा उंबरा राकला लोकांनी. बाईबी भाद्दरीन निघाली. काकणांचा येपार सुरू केला. हसन्या चालतंबोलतं व्हईपतोर गावात बकरं कापलं न्हाई कुणी. हसन्याचा बा मरून सात वर्स झाल्यावर हसन्यानं कापलं पयलं बकरं. आबा पाटलानं शपथ घातलीती गावाला. गावानंबी पाळली. परगावास्नं कापून आणायची मुलाण्याकडनं, खरं गावात न्हाई कापलं. जैतुनबी आजून आठवून डोळ्यातनं टिपं गाळत म्हणती, 'सगळं गाव माझ्या गोतावळ्याचं हाय. मी ल्येक हाय गावाची. मला काय कमी.' वस्तादीन कुणाच्या समोर हात–पाय पसरत आली न्हाई. हसन्या गाव सोडून गेला, तर धाय मोकलून रडली. नवरा मेला तवाबी एवढी रडाय नव्हती. लगोलग इसरली. बाबलला तयार केलं. ह्येला म्हणत्यात बाई.''

''म्हणूनच भाड्यांच्या डोळ्यांत माती पडाली आसंल. आता चांगलं कुणाचं कुणाला बगावतंय ? गेलं पयलं दिवस.''

बाबल सगळ्या बायकांचं बोलणं मन देऊन ऐकत होता. आपोआप त्याचं डोळं पाण्यानं डबडबून जात होतं.

गोंदा पाटलानं चावडीत सगळ्या पंचमंडळींना जमा केलं. गावच्या म्होरक्या पुढाऱ्यांना गोळा घातलं. गावात बाबलला मारलं म्हटल्यावर पाचपन्नास घरची मंडळी, 'काय ठरवल्यात बघू या' म्हणून जमा झाली. गावातल्या म्हाताऱ्याकोताऱ्या बायकाबी कधी नव्हं ते चावडीच्या पायरीला थडकल्या. पारावरच्या पोरांचा घोळकाही एका बाजूला थांबलेला. बाबलला मारणाऱ्या पोरांना सगळ्यांसमोर आणून बसललेलं. गोंदा पाटलानं सगळ्यांसमोर पोरांना विचारायला सुरुवात केली,

''बाबानू, बाबलला का मारला तुमी ? त्येचंतुमचं काय वाकडं व्हतं ?''

कोण बोलायलाच तयार नाही. एवढ्यात चवताळलेली तानू सुतारीण पदर खेचून पुढं येतच म्हणाली,

''भाड्यांच्या तोंडात चेपलीनं श्यान घाला, बोलत न्हाईत तर.''

''काकू, तुजा नातूबी हाय ह्येच्यात.'' शिंद्यानं आवाज काढला.

''पयलं मी घालतो त्येच्या तोंडात श्यान, मग बाकीच्यांच्या.'' म्हणत तानू सुतारीन सरसावलीच. तसा सगळ्या बायकांना चेव चढला. सगळ्यांसमोरची पोरं घाबरली. पाटलाचा पोरगा मान्याच्या पोराकडं बोट करत म्हणाला,

''त्येनंच लावलं करायला. बाबल मुसलमान हाय, हानू या म्हणालं,''

''खरं, त्येनं तुमचं काय बिघडलंतं ?'' सरपंचाचा आवाज.

''कायच न्हाई.'' मान्याचं पोरगं.

''मऽऽग'' – सरपंच.

''चुकलं आमचं.''

''चुकल्यात, हाणा रांडंच्यास्नी ! हाडं मोडून ठेवा म्हणजे आसं काय सुचायचं न्हाई. टीवी बघत्यात टीवी.'' फडकरी बाबूदानं आवाज टाकला. तसं गोंदा पाटलानं सगळ्यांना गप्प केलं. मग पुढं होत सगळ्यांकडं बघत म्हणाला, ''गड्यांनू, तुमाला दक्कल नसंल, बाबलच्या खापर पणज्याला आपल्या गावच्या लोकांनी जाऊन, 'आमच्या गावात मुलाणी न्हाई, तू ये बाबा आमच्या गावात', म्हणून बलावून आणलंतं. आबा पाटलाच्या सब्दाखातर तो गडी तिथलं घरदार सोडून आला. बाबलचं घर हाय का न्हाई, ते घर गावानं त्येला बांधून दिलं. का, तर मुलाणी गावाला पायजे म्हणून. तवापास्नं ह्ये घर गावात ऱ्हायलंय. या बाबलचा बा आजारी पडला, गावानं पैसं घालून दवाखाना केला. न्हाई वाचला. जैतुनबी पोरं घेऊन चालली. आमी पाय धरलं तिचं. तवा हे घर ऱ्हायलंय. बाबलनंबी गावाचा मान राकलाय. त्येला आसा डोस्क्यात राक घालून पळवून लावू नगा. त्ये आपलंच लेकरू हाय,'' गोंदा पाटील मागं होऊन पोरांना म्हणाला, ''तुमची चुकी तुमी मान्य केलीय. आता जैतुनबीच्या पायावर डोकं ठिऊन माफी मागा. तरच तुमची सुटका.''

पोरं धडपडून उठली. कोपऱ्यात बसलेल्या जैतुनबीकडं वळली, तर तिच्या गळ्यातला आवंढा एकाएकी बाहेर पडला. तिला समजावता समजावता अख्ख्या गावाच्या डोळ्यांना पाझर फुटला...

**स्वाध्याय –**

**अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :–**

१) बाबलविषयी थोडक्यात माहिती लिहा.

२) जैतुनबीची व्यक्तिरेखा तुमच्या शब्दात लिहा.

३) गोंदा पाटलानं बाबलला कसा न्याय मिळवून दिला ते लिहा.

४) गावातील पोरांनी बाबलला का मारले ? त्याची अवस्था कशी झाली ?

* * *

# २. होरपळ

**– योगीराज वाघमारे**

**परिचय** : योगीराज देवराज वाघमारे (१९४३) दलित जीवनाचे अनेक अंगानी चित्रण करणारे कथाकार दलितांच्या वेदना दुःख प्रश्न आणि भूक याचे वास्तव अनुभव त्यांच्या कथेतून व्यक्त होते. 'उद्रेक' 'बेगड' इ. कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

'गुडदाणी' या कथासंग्रहातून ही कथा घेतलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत निस्वार्थीपणे सामाजिक कार्य करणारा आणि नंतरच्या कालावधीत बदलत्या राजकारणामुळे आणि माणसांच्या प्रवृत्तीमुळं कार्यकर्त्यांची कशी होरपळ होते हे या कथेतून व्यक्त होते.

---

खूप दिवसांनंतर गावाकडे निघालो होतो. आज, उद्या गावी जाईन म्हणता म्हणता दोन वर्ष निघून गेली. गावच्या आठवणीनं अस्वस्थ व्हायचं. पण ऑफिसच्या कामातून मुळीच सवड मिळायची नाही. शेवटी गावाकडे नातलगातलं कुणी तरी अत्यंत आजारी असल्याबद्दलची तार करायला लावली तेव्हा कुठं सवड मिळाली. आठवड्याची रजा घेऊन निघालो. मन हरणासारखं उड्या मारीत होतं. मनात खूप खूप ठरवून निघालो. वाटल्यास अजून दोन–चार दिवस रजा वाढविता येईल असाही विचार केला.

गाडीत बसल्यावर कितीतरी हलकं वाटत होतं. झाडे, डोंगर, शेते मागे पळत होती. एक एक गाव दूर जात होतं. माझं मन मात्र माझं गाव जवळ करीत होतं. अखेर गाडी मला आमच्या स्टेशनवर सोडून निघून गेली.

मी क्षण दोन क्षण फलाटावर रेंगाळलो. जास्त काळ थांबणं शक्यच नव्हतं. सरळ घरचा रस्ता पकडला. अलीकडं पांद सुरू झाली. ती ओलांडून शाळेच्या पटांगणात आलो. पुढच्या बाजूला बाजार चौक. तीनचार पिंपरिणीची झाडं आहेत. तेथेच दोन झोपडीवजा हॉटेल्स. एक पानाचं दुकान. गावात जायला वेशीतून रस्ता. आत पोस्ट ऑफिस, ग्राम पंचायत, सरकारी धान्याचं दुकान. पारावर दहापाच माणसं टेकलेली. हे नेहमीचं दृश्य बघितलं, पण त्याकडे लक्ष न देताच डाव्या बाजूने भीमनगरमध्ये जाणाऱ्या रस्त्याने निघालो. वाटेत कुणी ओळखीचं भेटेल ही अपेक्षा... पण अजून कुणीच दिसत नव्हतं. खरंच मी येण्याबद्दल काही कळविलं नव्हतं. मग कोण माझी वाट बघणार ? आणि कोण स्टेशनवर येणार ?...

ओळखीच्या रस्त्याने झपझप निघालो. अलीकडचं हॉटेल ओलांडलं. तेथून आमच्या चावडीचीही इमारत दिसत होती. अन तिच्या पलीकडे माझं घर. आलं म्हणोस्तर आलं... मनात सारखी अधिरता होती. मला उचंबळल्यासारखं होत होतं. अन् पावलं झपापत पुढं जात होती.एवढ्यात कुठूनतरी हाक ऐकू आली.

''जयभीम... साहेब ...''

मी एकदम थबकलो. मी ब्रेक लागल्यागत गर्रकन माघारी बघितलं. माझ्या गावी मला ''जयभीम' म्हणणारे कोण ?... आवाज तर माझ्या परिचयाचा नव्हता. पण सवयीनुसार 'जयभीम' करायसाठी एक हात उचललेला. सुटकेस दुसऱ्या हातात घेऊन मी ती व्यक्ती कोण याचा शोध घेऊ लागलो.

झोपडीवजा हॉटेलमधून एक कळकट मळकट व्यक्ती बाहेर आली. तिने डोईचे केस मागे पाडलेले. दात पान खाऊन रंगविलेले. चेहरा काळपट. पायात काहीच नाही. अंगावरचा सदरा खांद्यावर फाटलेला ... अशी व्यक्ती लांबून ओळखायला काहीच साधन नव्हतं; पण ती व्यक्ती मात्र हसत हसत माझ्याकडे येतेय ... मला त्या माणसाची किळसच आली आणि जसजशी ती व्यक्ती जवळ येऊ लागली तसतसे मनात नाही ते विचार येऊ लागले.

'कुठून ही ब्याद आली ! ... कोण तुम्ही ? ... काय हवंय ... ?'' नाराजीची आठी कपाळावर उमटलीच होती. तरीही ती व्यक्ती अजून हसतच होती. मी जरा न्याहाळलं. परिचयाच्या खुणा स्पष्ट होऊ लागल्या आणि एकदम माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले,

'तात्या !'

तात्यांना पाहताच माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. तसाच मी दोन पावलं माघारी आलो. तात्यांना कडकडून भेटलो. आनंदाने शब्दच बाहेर पडेनात. तात्याला खूप हसू फुटले.

'असं कसं अवचित येणं ?' पत्र नाही की चिठ्ठी नाही...'

मला आनंदातिशयानं काहीच बोलता येईना. तात्यांचे शब्दसुध्दा थोडे ओले झाले होते. आम्ही दोघे एकमेकांकडे सारखं बघतच होतो. दुसरं काही विचारण्याचं भान मला राहिलं नव्हतं.

'चला. तात्यांनी माझी सुटकेस हातात घेण्याचा प्रयत्न करीत म्हटलं, तसा मी शुध्दीवर आलो. आपल्याला घरी जायचंय हे मी विसरूनच गेलो होतो.

'छे, छे ! नको...' मी सुटकेस तात्यांच्या हातात न देता म्हटलं. दोघेही निघालो. तात्यांचा आवाज मोठा झाला होता. शेवटच्या घरापर्यन्त ऐकू जाईल अशा बेताने बोलत होते. त्यात माझ्या आगमनाने त्यांना आनंद झाल्याचं जाणवत होतं.

'तरी मला वाटलंच, तुम्ही येणार म्हणून ... कालच मी भावजींना म्हटलं होतं. आक्कालासुध्दा सांगितलं होतं... माझं खोटंच केलं त्यांनी...'

'हं. हं.' बोलण्यासारखं असूनही मी एवढेच बोलू शकलो.

चावडीजवळ आल्यावर तात्यांनी दादांच्या नावाने मोठ्यानं हाक मारली. चावडीतली माणसं आम्हाला बघून उठली. पोरं पळाली.' नाना आले रे ऽऽ' आमच्या घराकडे ओरडत पोरं धम्माट झाली.

'कधी आलायसा ?' ... चावडीतल्या माणसांनी मला विचारलं.

'हे काय, आताच ...' माझ्या अगोदरच तात्या उत्तरले.

'बरं झालं बाबा ... खुशाल हायीस न्हवं ? .. माझ्या नजरेला नजर देत आपुलकीची क्षितिजं रुंदावीत मोठी माणसं विचारीत होती. माझा चेहरा फुलून गेला. ही सगळी माझी माणसं माझ्यामुळे टवटवीत झालेली होती. त्यांना माझ्या आगमनामुळे आनंद झालेला होता. कुणीतरी थोराड पोरानं माझ्या हातातली सुटकेस घेतली व लगालगा घराकडे पळत गेला. सगळं लटांबर आमच्या घराकडे निघाले. मी आल्याची वर्दी अगोदरच मिळाल्याने दादा अंगण ओलांडून आले. भाऊ पाणईपुढं उभे राहिले, तर आई दारातून मला कौतुकानं न्याहाळीत होती. सगळा आनंदीआनंदच. सर्व माणसं पटांगणात, अंगणात उभी राहिलेली, कुणी बसलेली. तात्या सगळ्यांच्या मध्ये. दादांना मोठमोठ्यानं सांगताहेत.

'मी कालच म्हटलं होतं ना ... आज साहेब येतील म्हणून ...' दादा फक्त मान हलवायचे.

'बघ आक्का, माझं खोटंच वाटलं तुम्हाला.'

आई तरी काय सांगणार ? तिनंही तात्यांच्या सांगण्याला हसत संमती दिली. अजून कुणी बोलायला तोंड उघडलं नव्हतं, पण तात्या सगळं सांगत होते.

'भावजी, मीच अगोदर साहेबांना बघितलं... मला सायबांनी ओळखिलंच नाही.. पण मी तेव्हाच ओळखिलं त्यांना.'

तात्या लहान मुलासारखे सांगत होते. त्यांच्या सांगण्यात मोठेपणा तो कोणता होता ? तरी पण त्यांना

सांगितल्याशिवाय राहवत नव्हतं. पुन्हा पुन्हा हसून तेच तेच सांगायचे...

हातपाय धुवून मी जेवायला बसेपर्यन्त तात्यांनी वातावरण कसं बोलतं ठेवलं होतं... पुन्हा बाकीचे लोक उठून गेले. तेव्हा तात्या म्हणाले, 'जेवून घ्या साहेब. आता रजा संपेपर्यंत मला दुसरा उद्योग नाही...'

'बरं बरं...' मी हसतच त्यांना उत्तर दिलं.

तात्या उठून गेले. एक घास खाल्ला नाही तोच मी म्हटलं, 'दादा, तात्यांची तब्येत फारच खालावलीय!'

'वय झालंय आता दादा.'

पण तात्यांनी आता नीट स्वच्छ टापटीप राहू नये काय ?' मी त्यांच्या कपड्यांविषयी थोडी नापसंती दर्शवीत म्हटलं.

'कशाचं स्वच्छ आणि टापटीप ?... आता तात्यात काही चव राहिलेली नाही...' भाऊने मध्येच माझ्या प्रश्नाला अनपेक्षीत उत्तर दिलं. तोंडाकडे नेलेला हात मी तसाच खाली घेतला.

'कसं काय ?'...

'अरे, कशाचं काय अन्... कसं ? तात्या अगदी टाकून दिलेला माणूस झालेला आहे. त्याला कोण विचारतंय ? त्याला दिवस कसा जाईल याची सारखी काळजी लागलेली असते...' भाऊंनी वेडंवाकडे तोंड करून आपली प्रतिक्रिया नोंदविली.

'अरे रे... असं व्हायला नको होतं.' माझ्या तोंडून उद्‌गार निघाले. तात्यांविषयीच्या जतन करून ठेवलेल्या भावना एकदम थरारल्या. खूप दक्षता घेऊनही हातातले काचेचे भांडे निसटून खाली पडावे व त्याचे तुकडे व्हावेत असेच झाले आणि हताश, विवश मनाने ते तुकडे वेचता वेचता मागच्या साऱ्या आठवणी जुळून याव्यात... क्षणभर ती मूर्ती भासमान व्हावी तसंच तात्यांच्या बाबतीत झालं...

आमच्या बालपणीचा काळ. त्यावेळी कुणी तरी सांगितलेलं आणि आम्ही स्वतः पाहिलेलं... धूसर... अंधूक..

तो काळ सामाजिक क्रांतीचा होता. शेडूल्ड कास्ट फेडरेशनची चळवळ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली होती. अख्खा दलित समाज जागृत झालेला होता. संघटित होत होता... त्याच वणव्यातला एक एक पलिता खेड्यापाड्यांत पेटत होता. बाबासाहेबांचा संदेश पसरवीत होता. लोकांना जागृत करीत होता. त्यावेळी तात्या अठरा वर्षांचे होते. मिसरुड फुटलेला एक तरुण जुनी पाचवी सहावी – शिकलेला. आमच्या गावच्या लोकांना सांगत होता,

'गावकी सोडा, महारांनो, स्वाभिमानानं जगा, मुलामुलींना शाळेत घाला !'

वारा प्यालेल्या वासरागत खेड्यापाड्यात धावत होता. लोक गोळा करीत होता. बाबासाहेबांची 'हाक' सांगत होता.

'एक व्हा ! संघटित व्हा ! शिका आणि स्वाभिमानाने जगा ! कुणाचं गुलाम होऊ नका !'

तर कधी आपल्या पहाडी आवाजात सांगायचा,

जयभीमचा तू गडी
वेळवरती हरघडी
हक्कासाठी रणामध्ये घे उडी !
आली आली ही भीमाची रेल.

घाला हिला तेल ! सिग्नल दाबा

दिल्ली में भीम हमारा !

नाहीतर तेरखडेबावीच्या जलसात 'राधीचं' पात्र घेऊन म्हणायचे,

घरधनी सांगते तुम्हाला, माझ्या मुलाला शाळेत घाला !'

लोक तात्यांकडे 'आ' करून बघायचे. माना डोलावायचे आणि जोहाराने खाली गेलेल्या माना वर उठवायच्या. ताठपणा यायचा. तात्या त्यांच्या पाठीचा कणा होऊन जायचे. मृतमांस खायचं बंद केलं. गावकी सोडली. पोरं शाळेत जाऊ लागली. तात्यांनीच मला शाळेत घातलं. माझ्या थोरल्या भावाला. माझ्या बहिणींना. भीमनगरमधल्या सर्व मुलांना. आता जेवढे म्हणून शिकलेले व नोकरीला आहेत ती सर्व तात्यांची कलमं आहेत. तात्या जन्मलेल्या मुलाच्या नामकरणाला हजर राह्यचे. पाळणा म्हणायचे,

पहिल्या दिवशी आनंद थोर ।

बाळ जन्मला क्रांतीचा वीर

गुढ्या तोरणे उभारा घरोघर ।

जयभीम जयभीम जय ऽऽ.

मूल पाच वर्षांचं झालं की आपण होऊनच त्याला शाळेत घेऊन जायचे. नाव घालायचे. मुलाच्या बापाची त्यावेळी गरजही नसायची. एकाही पोराला त्यांनी गुरामागे पाठविले नाही. स्वतःची मुलं थोडंफार शिकली, पण दुसऱ्यांच्या मुलांना स्वतःची समजून खूप शिकविलं. आमच्यातल्या एका मुलाचा एस.एस.सी परीक्षेत पास झाल्याबद्दल स्वतःच्या खर्चाने सत्कार घडवून आणला. मला औरंगाबादला शिकायला जा म्हणून सांगणारे तात्याच. कॉलेजात कुठल्या तरी स्पर्धेत पहिलं बक्षिस मिळाल्याची बातमी. पेपरमध्ये छापून आल्यावर ती बातमी सगळ्या भीमनगरमध्ये वाचून दाखविणारे व बी. ए. पास झाल्यावर माझे पेढे वाटणारे तात्याच.

लग्नाला आलेल्या पोरींच्या वडिलांना तात्यांचा खूप आधार असे. नव्हे, ते तात्यांवर निर्धारित असत. मुलीचा बाप म्हणे, 'पंचफुला लग्नाला आलीय, तिला एकादं स्थळ बघा... तुमी जसे ठरवाल त्यात आमी राजी.' तात्या खळखळून हसत; 'अवं तुम्ही नका काळजी करू. बॅरिस्टर नवरा आणतो पोरीला. हुंडा नाही की फिंडा नाही. सोनगिरीत कदमाचा मुलगा खूप शिकलाय. आपल्या शब्दाबाहेर जाणार नाही. याच उन्हाळ्यात बार उडवून देऊ...' तात्या आत्मविश्वासपूर्वक बोलत. बोलल्याप्रमाणे सोनगिरीचे पाहुणे घेऊन तात्या हजर रहात. बसल्या बैठकीला लग्न जमे. अशी कित्येक लग्ने त्यांनीच जमविली. कुठं म्हणून बिघाड झालेला नाही. कुणाचा ओघळ झाला नाही. घरातलं नवरा–बायकोचं भांडणही तात्यांनीच मिटवावं. जयंती असो अगर कुठला उत्सव असो, तात्या म्हणतील तशी वर्गणी द्यावी. हिशेबसुध्दा विचारू नये. एवढं सगळं बिनबोभाट चालविणारे तात्या, आबालवृध्दांच्या प्रेमाचे तात्या, एवढे कसे बदलले ? मला काहीच समजेना... चक्रावून गेलो. काय घडलं असावं ? उत्तर काहीच सापडेना.

'तात्या दारू पितात ! आता त्यांची पुढारकी चालत नाही. कोणी त्यांच्याकडे येत नाही. कोणी त्यांना विचारीत नाही.' भाऊंनी पुन्हा तात्यांच्या चित्राला ओरबाडले. त्याची जखम मलाच झाली, ती भळभळा वाहू लागली.

खरंच काय चुकलं असेल तात्यांचं की त्यामुळे त्यांना हे दिवस आले ? वयोमानाने आता त्यांना जमतही नसेल हे कबूल ... पण तात्या असा कदापीही अविचार करणार नाहीत... पण जे झालं ते अवघ्या

आठ–दहा वर्षांच्या काळातच... मी कॉलेजला होतो त्यावेळी अधूनमधून कळायचं. रिपब्लिकन पक्षाच्या राजकारणाने वेगळा रंग घेतलेला होता. बाबासाहेबांच्या पश्चात खूप बदल झाला होता. पक्षाचं नेतृत्व सारखं बदलत होतं.

मध्यंतरी तात्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला उभे राहिल्याचे कळले होते. पक्ष एकसंघ होता तेव्हा आमदारकीला उभे रहावे म्हणून त्यांच्या अनेक चाहत्यांनी सांगितलं होतं. पण गरीब अज्ञानी जनतेचा नेता निदान थोडं तरी कायद्याचं ज्ञान असणारा असावा अशी पक्षनेत्यांची अट होती. म्हणून तात्यांना उभे राहता आले नाही. तात्यांना त्या गोष्टीचं विशेष वाईट वाटलं नाही. ते म्हणायचे, 'नाही तर नाही. आपल्याला 'वरचं' नाही जमायचं. खेड्यात कसं मोकळं मोकळं जमून जातंय. साधा सभासद म्हणूनच समाजाची जी काही सेवा करता येईल तेवढेच पुरे. अनुयायी म्हणून राहण्यात जो आनंद आहे तो वरिष्ठ नेता म्हणून राहण्यात नाही. आपल्या समाजात नेतेच खूप; पण स्वयंसेवक कमी.' तात्या अभिमानाने आपल्याकडे सेवकाची भूमिका घेत. म्हणून काही तात्यांनी पार्टीने उभा केलेल्या उमेदवाराशी कधी द्रोह केला नाही. त्याच्या प्रचारासाठी गावोगाव भटकले. सभा घेतल्या. पार्टीचा माणूस निवडून आणला. पण हे केव्हा ?जेव्हा पक्ष एकसंघ होता तेव्हा ! बाबांच्या पश्चात पक्ष फुटला. चार चुली वेगळ्या झाल्या. बारीकसारीक नेते विभागले गेले. तात्यांना अत्यंत वाईट वाटलं. निम्या–अर्ध्या प्रवासातच गाडा अडून पडला. त्यांना अंधारल्यासारखं झालं. एक गट दुसऱ्याला पाण्यात पाहू लागला. आपणच बाबासाहेबांचे खरे अनुयायी म्हणून दावा करायचे. आधीच मूठभर माणसं, पुन्हा त्यात विभाजन.

अशा वेळी तात्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला उभे राहिले. त्यांच्या विरोधी त्यांच्याच भावकीतला एकजण उभा राहिला होता. जेथे तात्यांनी एकजुटीनं झोपडं निर्माण केलं होतं तेथेच झोपड्याचे वासे ओढणारे निर्माण झाले होते. घरातल्या प्रत्येक माणसाचं तोंड वेगळ्या दिशेला झालं होतं. एकोपा बिघडला होता. युतीच्या राजकारणाने समाजाचा चेंदामेंदा केला होता. अखेर जे व्हायचं ते झालं होतं. तात्या निवडणुकीत पडले. त्यांच्या भावकीतला कालचा पोरगा निवडून आला. थोरामोठ्यांच्या बैठकीत बसू लागला. नव्या डावपेचांची खेळी खेळू लागला. त्याने स्वतःचं घर बांधलं. जमीन घेतली. जिल्ह्याच्या राजकारणात महत्त्वाच्या पदावर गेला. अनेक समित्या–उपसमित्यांवर सदस्य म्हणून काम करू लागला. तात्या आपले जसे होते तसेच राहिले. मागे पडले. लोकांची बाहुली फिरली. त्यांना कोणी विचारेनासे झाले. पुढारपण मागे पडलं. काळाने सर्व जुनी मूल्ये बाद ठरविली. परिस्थितीशी मिळतंजुळतं घेऊन जो पक्षीय धोरण बदलतो तो यशस्वी नेता होतो, हे तात्यांना ठाऊक नसावे ! राजकारणात कसं वागावं लागतंय ते त्यांना काय ठाऊक ? आपल्या बुध्दीच्या कुवतीप्रमाणे आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा सोयीनुसार अर्थ काढायचे तात्यांना कधी जमलंच नाही. म्हणून तर तात्या ढेपाळले. पतिव्रतेप्रमाणे निष्ठा ठेवून दारिद्र्यातच सुख मानीत राहिले. अगदी आजपर्यंत !

मी मेळ जमवू लागलो... सगळा त्यांच्या परिस्थितीकडे दोष होता. त्यांच्याकडे किती असेल कोण जाणे ?

तरीपण मला त्यांची कीव यायची. भाऊंनी किती जरी तिरस्काराने सांगितले, तरी मला तात्यांविषयी आकर्षण असायचं आणि तात्याही मजकडे आकर्षित झाले होते. मी आल्यापासून तात्या दररोज नेमाने घरी यायचे. चहाची वेळ असायची. तात्यांनी तेथेच राखुंडीने दात घासावेत आणि तांब्याभर पाण्यात तोंड खंगाळावे. कधी कधी जेवणाच्या वेळीही हजर रहात. आम्हा दोघांतील ह्या सलगीचा भाऊंनी वेगळाच अर्थ काढला होता. 'नव्या माणसाला असाच गोड बोलून चहापाणी आणि बिडीचा खर्च वचरेचर काढतो.''

कदाचित भाऊंच्या दृष्टीने ते खरेही असेल; पण मला त्याचे काहीच वाटले नाही. उलट तात्यांशी खूप बोलावे वाटायचं.

चहा, जेवण, पान–सुपारी अन् वरती बिडी घेतल्यावर ते खूष होते. मग त्यांच्या गप्पा रंगत. आपण काय काय केलं ते खुलवून सांगत. भूतकाळात शिरून आठवणीचे एक एक धागे जुळवीत. त्याचं खूप मोठं छान वस्त्र विणलेलं मला दिसायचं.

'तर काय झालं साहेब ? ...' ऐसपैस मांडी घालून मोठ्या आवाजात सांगू लागत.

'हं काय ?' मी तेवढ्याच उत्सुकतेने साथ देई.

'येडाईच्या जत्रेत आराधी पोतराज यायचे. ते सगळे आपल्याच खालच्या जातीचे असायचे. एकेवर्षी आम्ही त्यांचे केस कापले...' तात्या गडगडून हसत. पोतराजाचे केस कापणे त्यावेळी फार मोठी क्रांती समजली जात होती. ती तात्यांनी केली होती. त्याचा आनंद अजूनही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. 'दहिफळच्या महारमांगांना आबादीसाठी मी जागा मिळवून दिली. पहिल्यांदा त्या गावचा पाटील कुऱ्हाड घेऊन माझा काटा काढण्यासाठी धावून आला होता. पण तोच पाटील पुन्हा कब्जा बसायच्या दिवशी गुपचिप पाया पडत दोन हजार रुपये घे, पर कब्जा बसवू नको म्हणून सांगत आला... पर ह्या पठ्ठ्याने त्याचे पैसे फेकून दिले अन् आपल्या लोकांना जागा मिळवून दिलीच का नाही ?'

'होय, होय.' आम्ही त्यांच्या प्रश्नाला उत्तर द्यावं आणि पुढील प्रसंग ऐकून घ्यायची तयारी दर्शवावी.

चावडी कशी बांधली. वडगावचा सत्याग्रह कसा केला. पोलिसांच्या लाठ्या कशा खाल्ल्या. दादासाहेब गायकवाडाची सभा ह्या गावात कशी घेतली. ५१ बैलांची जोडी लावून त्यांची गावातून कशी मिरवणूक काढली. 'वीस' गावच्या लोकांना जेवण कसं दिलं... सारं सारं तात्या देहभान हरवून सांगायचे. सांगताना त्यांचा ऊर अभिमानाने भरून यायचा. क्षणभर त्याच चैतन्यमय वातावरणात आपण वावरतो की काय असा भास व्हायचा. ऐकणारे गुंग होऊन जात. देहभान हरपत.

तात्यांच्या सहवासात एक एक दिवस मोहरून जायचा. त्याचा सुगंध माझ्या मनात भरून जायचा. जे आपण प्रत्यक्ष पाहिलं नाही, अनुभवलं नाही त्या मुक्तिसंग्रामातले एक एक पान असं वाचताना भारावल्यासारखं व्हायचं. गावागावात वीज चमकून जायची. रजेचा एक एक दिवस कसा संपून जायचा ते समजायचं सुध्दा नाही. शेवटचे फक्त दोन दिवस राहिले होते. यापुढे दिवाळीशिवाय सुट्टी मिळणार नव्हती. नातेवाईक व पाहुण्यांच्या भेटी झाल्या होत्या. नोकरीच्या कामाचा ताण केव्हाच संपून गेला होता. घरच्या प्रेमात, भीमनगरमधल्या जुन्या मित्रांच्या व तात्यांच्या सहवासात कसं हलकं हलकं वाटत होतं. त्यांच्यापासून दूर जाऊच नये, खूप ऐकावं व अनुभवावं असं वाटायचं !

नेहमीप्रमाणे आज सकाळी तात्यांची चहासाठी वाट पाहिली. पोहेही केले होते. आज तात्यांकडून खूप ऐकून घेणार होतो. उद्या जायची गडबड होणार होती. त्यामुळे तात्यांशी दुसरं बोलता येणार नव्हतं. पण चहा व पोहे होऊन गेले तरी तात्या आलेच नाहीत. मला चुकल्याचुकल्यासारखे झाले. दादांनीही तात्यांची आठवण काढली. मग तसाच उठून मी त्यांच्या घराकडे गेलो. मला बघताच ते बाहेर आले.

''या, या सायब...' हसत हसत त्यांनी माझं स्वागत केलं.

'आज घरी आला नाहीत म्हटलं !' मी त्यांच्याकडे पहात खोट्या नाराजीनं म्हटलं.

'हं. हं. .. नाही आलो. सायब, रोजचे कसं यायचं ? म्हंजी...' खाली मान घालून तात्या पुटपुटले.

'म्हणजे, तात्या तुम्ही परकं समजता काय मला ?' मी.

'नाही नाही... सायब तसं नाही. पण आपलं...'

'पण काय ?'

तात्यांना पुढचे बोलता येईना. तसेच हसू लागले.

बरं ते जाऊ द्या... बसा ना खाली आधी... येईन बापडा संध्याकाळी जेवायला...' तात्यांनी चूक सावरली.

'हं... पुन्हा असं परकं समजू नका...' मी त्यांनी अंथरलेल्या पोत्यावर बसलो. तात्यांचं घर तसं मोठं नव्हतं. खुज्या भिंतीवर टाकलेलं छप्पर. तेही नीट नाही. थोडा अंधार. थोडा प्रकाश. त्यातच त्यांची उणीदुणी जर्मनी भांडीकुंडी, संसार सगळा उन्मळून पडलेला. भिंतीवर ठोकलेल्या खिळ्याला अगर पलाणीवर फाटक्या कपड्याशिवाय काहीच नाही. माझी नजर घरातून भिरभिरत होती.

आमच्या समाजातल्या एका नेत्याचं ते घर होतं. घर कसलं ? खुराडाच ! कुणालाही खरं वाटणार नाही की ह्या घराने पूर्वी राजवैभव उपभोगलं होतं. येथे पक्षाचे पुढारी सदोदित यायचे. बैठकी–निवडणुकीच्या कामाचा विचारविनिमय व्हायचा. जयंती उत्सव येथेच व्हायचे. 'जनता–प्रबुध्द भारत' वाचून दाखविले जात होते. येथेच लोकांनी भावकी सोडल्याची प्रतिज्ञा केली होती. बुध्द धर्माची दीक्षा घेण्याची शपथ घेतली होती. इतिहास घडला होता. त्या इतिहासाला ह्या घराच्या भिंती साक्षी आहेत व दारापुढचं लिंबाचं झाड साक्षी आहे. अरे, पण ते झाड कुठंय ? दिसत नाहीय..

तात्यांनी अडीनडीला विकून टाकलं असेल कदाचित !'

'अग लता, चहा तरी कर साहेबांना.' तात्यांनी माझ्या विचारांना धक्का दिला. घराकडे बघून मनात आलेले विचार तसेच भरकटले असते. ऐनवेळी तात्यांनी लताला हाक मारून माझी विचारशृंखला तोडली. मी भानावर आलो. पदराची सावरासावर व बांगड्यांचे किणकिणणे ऐकू आल्याने लताचं अस्तित्व जाणवलं. चुलीवर पातेलं ठेवल्याचं ऐकू आलं. एकूण तात्याची लता घरात आहे तर ! मी तिची साधी चौकशीही केली नाही. घराकडे बघून सगळं मागचं आठवतच गेलो. अंधारात बसलेल्या लताला पाहू शकलो नव्हतो.

लता तात्यांची मुलगी. त्यावेळी ती दोन वर्षांनी माझ्या मागे होती. सातवीतून शाळा बंद करून घरी बसली होती.

'काय लता, मला ओळखलं की नाही ?' मी.

'नाही कसं बरं ?' लतानं अंधारातून शब्द फेकले. चुलीतल्या जाळाने काही काळ तिचा चेहरा उजाळल्यासारखा व्हायचा. पुन्हा गपगार अंधार वाटायचा. मी सहज चौकशी करताच ती तोंड दाबून हसू लागली. चहाच्या उकळ्याबरोबर तिचे हास्य मला स्पष्ट ऐकू यायचं...

'साहेब !'

'काय ?' तात्यांनी मध्येच मला विचारलं. लताला अजून काही विचारणार होतो तर तात्यांनी मध्येच विचारून खंड पाडला.

'काय म्हणता तात्या ?' ... ते गंभीर होऊन बाहेर कुठं तरी बघत होते. माझ्या दुसऱ्या प्रश्नानं थोडे सावध झाले आणि केविलवाण्या स्वरात म्हटले, 'लताला एखादा शिकलेला नवरा बघाना ! पाच–सहा वर्षे झालीत शहाणी होऊन.'

अनपेक्षित प्रश्नानं मी भांबावलो. लताही हसायची गप्प झाली. गंभीर विषयाची सुरुवात झाल्याने तिला हसावंसं वाटलं नसेल. एक दीर्घ सुस्कारा टाकीत खाली मान घालून बसली. तात्या मला असले काही

दीनवाण्या चेहऱ्यानं सांगतील असं वाटलं नव्हतं. त्यातून त्यांचं काळीज किती पिळवटून गेलं होतं ते जाणवत होतं.

'तात्या'... मी कसातरी स्वतःला सावरीत म्हणालो.

...' अं. अं ... म्हणजे तुम्ही अजून स्थळ बघितलं नाही का ?'

... बघितली ना!' .. तात्यांनी सूर बदलला नव्हता.

'मग ?'

'हुंडा – नोकरी आणि वशिला लावणाऱ्याची मुलगी त्यांना हवीय.' माझ्याजवळ काय आहे ? हे पडकं घर अन् ...

तात्या अडखळले. गहिवरल्यामुळे बोलता येईना.

'बाद झालेला पुढारी... त्याचा वशिला अजिबात चालत नाही तो... असंच जणू त्यांना म्हणायचं होतं.

मी त्यांच्या असहाय्यतेने चक्रावलो. 'हे कसं झालं ? ... ज्यांनी पूर्ण आयुष्य समाजासाठी वेचलं, संसार, घर–दार, आशा–आकांक्षा, सारं होरपळून टाकलं... दुसऱ्याचे संसार सुखाचे व्हावेत म्हणून जेल, सत्याग्रह, लाठीकाठी झेलली त्या तात्यांच्या एका मुलीचे लग्न होणं अशक्य... ? ज्यानं अनेकांची लग्ने जमविली त्यांच्या एका मुलीचे लग्न जमू नये ?...' मनात विचारांची वावटळ उडाली. गरगरल्यासारखं होऊ लागलं. इतक्यात लताने चहाची कपबशी पुढे लोटली. बशीच्या आवाजाने शुध्दीवर आलो... लता पुरतं पुढे येऊ शकली नव्हती, त्यामुळे तिला पूर्ण पाहता आले नाही. जेवढी पाहिली त्यावरून मला एकदम रडू कोसळलं. 'लताला अंगावर झाकण्यासाठी धड लुगडंसुध्दा नव्हतं. ठिकठिकाणी गाठी मारलेल्या धडुत्यात ती लाज राखीत होती.' ... तात्यांच्या संसाराची परवड पाहता पाहता जागीच बर्फासारखं थंड होऊन गेलो. आणि तात्या मात्र बशीतला चहा फुर्रकन ओढून पीत होते. मुक्तिसंग्रामातल्या आठवणी सांगतानाच्या उल्हासित, प्रफुल्लित मनाने.

**स्वाध्याय –**

**अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :–**

१) तात्याचे सामाजिक कार्य लिहा.

२) तात्यांनी भूतकाळातील कोण–कोणत्या आठवणी सांगितल्या आहेस ?

३) तात्याच्या घरात कोण–कोणत्या घटना घडल्या ते सांगून दारिद्र्याचे वर्णन करा.

४) तात्याचा ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत पराभव का झाला ? बदलते राजकारण कसे होते ?

* * *

# ३. गळफास

**– आप्पासाहेब खोत**

**परिचय** : आप्पासाहेब यशवंत खोत (१९५५) १९८० नंतरचे बदलते ग्रामीण जीवनाचा शोध घेणारे व वास्तवतेचे भान ठेवून लेखन करणारे लेखक. 'गवनेर' 'महापूर' 'रानगंगा' इ. कथासंग्रह. 'पळसफूल' 'गावपांढर' 'घरपण' 'फेसाटी' इ. कादंबऱ्या. आदर्श शिक्षक पुरस्कार. ग. ल. ठोकळ इ. पुरस्काराने सन्मानित.

'माती आणि कागुद' या त्यांच्या कथासंग्रहातून ही कथा घेतलेली आहे. या कथेत वाईट विचारांच्या संगतीत राहिल्यामुळे व्यसनाधिनेच्या आहारी जाऊन कुटुंबाला कसा गळफास लागून कौटुंबिक जीवन कसे उध्वस्त होते याचे वास्तवचित्रण या कथेतून घडते.

''बापू ! या फार्मवर सह्या करा.'' पंडीत विलासकाकांना फार्म देत म्हणाला.

''कशापायी, सह्या पायजेत ते तरी कळुदे ?'' विलासकाकानं पंडीतला म्हटलं,

''तुमास्नी का वाचायला येत नाही ? वाचून बघा की'' मधल्या चौकटीत उभी असणारी अंजना म्हणाली.

विलासकाकांनी फार्म न्याहाळला आणि म्हणालं, ''आरं पंडीत, ह्यो राजमाता पतसंस्थेचा कर्जाचा फार्म हाय.''

''व्हय.''

''आरं, पर कर्ज काढून काय कर्णार ?''

''स्पेंडर गाडी घ्याची. भावकीत सगळ्यांच्या गाड्या हाईत. माझीच तेव्हढी न्हाई.'' त्यानं तक्रार केली.

''म्हनून रीन काढून सण कशाला करायचा. पत नसताना कर्ज काढूनी आणि आयपत नसताना इर्षा करुनी.''

''मग माझ्या लेकानं हौस करायची कवां ?'' अर्धवटासारखं अंजना बोलली.

ती त्याला फुस लावत होती. जावा–भावात तिचा पाणउतारा झालेला. ते काय तिच्या डोक्यातनं जात नव्हतं. ती पुढं म्हणाली, ''वाणी–तीनीचा, साता नवसाचा एकटा माझ्या ल्योक गाडी मागतुया आणि तुमी काय मान धरीनासा. त्यो काय घोडा मागतुया व्हय.''

''आगं आंजे, घोडा परवडला; पर ह्यो हात्ती मागतुया.''

तसा पंडीत चिडला, बोटं नाचवित म्हणाला, ''बापू उगच फाटं फोडू नका. सह्या कर्णार हाईसा का न्हाई ते पैलं सांगा ?''

आपल्या मुलाचं तिरकस बोलणं विलासकाकाला सहन झालं नाही. ते उसळून म्हणालं, ''न्हवं, न्हाय सह्या केल्या तर काय डोसक्यांत दगुड घालणार हाईस, ह्यासाठनं तुला खायला घालून दांडगा केला व्हय सुक्काळीच्या.''

''उगाच सकाळच्यापारी पोराला वाईट वंगाळ बुलू नका, हे असलं वागणं चांगलं न्हवं.'' अंजनानं मध्ये तोंड घातलं.

तसं काका तिला डापरुन तिच्या अंगावर जाण्यासाठी कॉटवरुन उठत म्हणालं, ''माझं वागणं चांगलं न्हाय काय ? तुझ्या या भोंगाळ वागण्यानंच त्येचा लाड झालाय. तू पैली घरात जा.'' विलासकाका तिच्या अंगावर गेला. तसा पंडीत आडवा झाला. ''बापू, आईच्या अंगावर जायाचं काम न्हाय.''

विलासकाकानी रागरंग ओळखला. दात खाऊन राग गिळला.

पंडीत पायात चपला घालत डोळं वटारुन म्हणाला, ''बापू, या फार्मवर गपगुमान सह्या करायच्या.

न्हायतर उद्या सकाळी मळ्यातल्या आंब्याला माझा गळफास तुमास्नी दिसल. मग तुमी पोलीस घेऊन पंचनामा करायलाच या.''

डाव्या हातातील सैल घड्याळाचा पट्टा व्यवस्थित करीत आणि उजव्या हातातील रंगीत दोरा गोंजारत तो घरातून बाहेर पडला.

''अंऽऽहूऽऽ!'' अंजनाचा अस्पष्ट हुंदका मधल्या सोप्यातून बाहेर पडला.

जड पायानं विलासकाका कॉटवर जाऊन बसलं. अजगरानं सर्वांग कवटाळून आवळावं तशी त्यांची अवस्था झाली. मनाच्या गाभाऱ्यात कालवाकालव झाली. आणि ... 'आई! काय झालं गं हे ?' त्यांचं मन त्यांच्याशीच बोलत राहिलं.

अशावेळी त्यांना प्रकर्षानं देवाघरी गेलेल्या आईची आठवण यायची.

'आई म्हणायची, बाळा, रीन पाणी काढून कुणब्याचा सौंसार वर येत न्हाई बुडत्याचा पाय खोलात जातो. माणसानं जमल ं तेच करावं आणि झेपल एव्हढंच वझ्झं उचलावं. माणसानं पतीनं जगावं. सोबल ते ल्यावं आणि पचल तेच खावावं. कष्टाबिगार आयतं मिळाल्यालं हिंगातुपाला पुरतं न्हाई. ज्या वाटनं येतं त्याच वाटनं ते जातं. माणसानं आपली पायरी सूडुनी. कुणाला उणं-उपरं बुलुनी. जे मिळतं ते वंदुन खावावं. गर्व करुनी. गर्वानं चौदा-चौकड्याचं रावणाचं राज गेलं. वाकडा शबुद कुणाला बुलुनी. त्येनं कैकांचं खून पडलं. रक्ताचं पाट वाहिलं. कैकाचं सौसारं धुळीला मिळालं. हातात ईल त्यात समाधानी ऱ्हावावं. पळत्याच्या पाठी लागुनी. अंधारातनं दिवा जपून न्यावा लागतो लेका. दिसमान वंगाळ याला लागल्यात. पाय सुदीन सांभाळून ऱ्हा.'

म्हातारीचा एक-एक शब्द विलासकाकांना कृष्णदेवानं अर्जुनाला सांगितलेल्या गीतेसारखा आठवत होता. 'आणि हे काय होऊन बसलं.' – काकानी आपलं डोकं गच्च दाबून धरलं.

'... देवा ! असं कसं हे दिस उलट आलं. गांव पुढाऱ्यानी गाव नासिवलं. भाव-भावकीनं तिडा टाकला. इस्तु पुरुन ठेवला. ह्या माया लेकरास्नी कवा कळायचं ? बरं प्वार येक आजून आल्लड हाय, निदान अंजीला तर कळुनी का ? तर तीच त्येला फुस लावती. नको तेव्हढा लाड करती. गेल्या वर्सापास्नं ल्योक मटका खेळतुया. हिनं डोळं झाकल्यात काय ? दुदाच बील वरच्यावर उडीवतुया. बरं, बोलाय गेलं की अंगावर धावून येतुया. आठ-धां हाजारांची वाट लावली. मी काय सांगायला गेलो की मलाच खुळ्यात काढत्यात. जरा ताणून धरलं की फास लावून घेतो म्हणतया. बरं, एकटाच हाय. वसाला धनी. म्हणून कुठवर गप बसायचं. तरी बरं; गेल्यासाली लेक तरी खात्या गवाणीला लागली. काळजी तरी किती करायची. काळजी करुन सुटाय सारकं हे गणीत हाय का.'

'गांवपुढाऱ्यांच्या पोरांसंगं एक दीस आड धाब्यावर जेवाय जातं. मग घरातलं आदान-पानी त्याला ग्वाड कसं लागल ? जीभंला चटक लागलीया ती कशी सुटल ? तशात ह्या निवडणुका, तर सां-सां म्हैन्याला हाईत. मग पुढाऱ्यास्नी अशी छ्योऽऽ म्हटल्यावं पळणारी पायजे आसत्यातच की. कुणाचा धाक न्हाई. कुणाच भ्या न्हाई. आमी रातध्याड ऊन्हां-पावसात शेतात मर-मर मरायचं. काळ्या मातीत माती व्हायचं, रगात आटवायचं आनि पोरानं गावभर उंडगं हिंडायचं.'

'शिकल म्हनून कालेजला घातला. पैसा आडका, कपडालत्ता काय, काय कमी पडू दिल न्हाई. खरं शिकला न्हाईच. दुसऱ्या वर्साला एकाला दोन वर्स नापास झाला. शिकायला चीत थारी नको.'

'बरं, बाप म्हनून म्या आनि काय करावं ? बरुबरीच्या पोरावं हात तरी कसा टाकायचा. खरं, तेबी केलं. एकदा चाबकानं फुडून काढला. लागलं लोळाय. दोन दिवस उठाय आलं न्हाई. म्हटलं आता तरी सुधरंल. त्येच त्येला कळून ईल. तर कुठलं आलंय. लंगडत लंगडत वडाजवळच्या पानपट्टीकडं गेलं.

गुटक्याच्या पुड्या घेऊन आलं. दिवसभर कोपऱ्यात थुकत बसलं. सारं घर घणाय लागलं.'

'मग मला झीट आली. पुन्ह्यांदा दोन लाथा घातल्या. दंगा–थोट झाला. मयाची आई. आजीन सारी गल्ली गोळा केली. फुकटचा तमाशा बघणाऱ्यांनी बरुबरीच्या पोराव हात टाकला म्हनून मलाच खुळ्यात काढलं. वाघासारका मी; मला या मायालेकरानी मांजार म्यॉवऽऽ करून टाकलं.'

'एवढ्यानं रामायण सपलं न्हाय. जातीनं तिसऱ्या दिवशी इशारी औशीद प्यालं. लागलं लोळाय. तोंडाला बचकएवढा फ्योस आला. आंजी हाणून बडवून घ्याला लागली. माझी तर पाचावर धारण बसली. शेजारच्या बब्याची जीपगाडी आणली आनि कोलापूरात सरकारी दवाखान्यात आडमीट केलं. आठ दिवस दवाखान्यात हुतं. पै–पाव्हण्यात मलाच कमीपणा दिला.'

'आठ दिवसानं घराकडं आणलं. रातभर समजावीत बसलो. चुकलो बाबा, बाप आसून तुझ पाय धरतो. पुन्हा आसं वागू नकोस. चांगला वाग. भाव–भावकीत कमीपणा देवू नकोस म्हटलं. माझ्या म्याच थोबाडीत मारून घेतल्या. खरं काय फरक पडला न्हाई. आठ पंध्रादी बरं वागलं. पुन्हा मागं तसं पुढं चालू. महिन्याभरातच गुण उधळलं. आण्णा कदमाच्या सुनलांच आगर–तगर बोल्लं. आर्थाचा बे आर्थ झाला. त्येंची सारी भावकी काठ्या–कुऱ्हाडी घेऊन मारायला आलीत. हाता–पाया पडलो. चुकलं म्हणूनन म्याच त्येचं पाय धरलं, तवा कुठं भानगड मिटली. न्हायतर माझ्या डोळ्यादेखत हात–न्हाय पाय काढला असता. व्हय, त्या माणसांनी तरी गप का बसावं. नांदत्या घरच्या सोन्यासारख्या पुरीवं ह्यो वारु हुयाला लागल्यावं कोण गप बसल, सांगा की. ती माणसच चांगली म्हणायची, न्हायतर त्या बिचारीच्या नान्र्याचं चाण्णं झाल आसतं. पोटचा ल्योक आसला म्हनून काय झालं. कुठवर सोसायचं आनि आता तरी फटपट घ्याला उठलाय. आनि ही बी कौसाली त्येला भरीला घालतीया. काय करायवचं या भोगाला. देवा, काय माझ्या पोटाला हीरा जलमाला घातलास. का कुण्या जलमाचा वाद्या पोटाला घातलास. एवढं म्या कुण्या जन्मी पाप केलतं. कुणाच्या वाळ्या पाचुळ्यावं पाय दिला न्हाई, का कुणाला वर नजर करून बोल्लो न्हाई. हत्तीच बळ अंगात आसताना मुंगी हून साकार खाल्ली. आनि आता हे कसल दिवस आणलंस.'

त्या रात्री विलासकाकाला झोप लागली नाही. सकाळी मळ्याकडं जाताना त्यानं मनावर दगड ठेवून फार्मवर सह्या केल्या आनि मळ्याची वाट धरली.

त्या दिवसापासून विलासकाका गांवाकडं आला नाही. सकाळीच न्याहरीच्या जेवणाबरोबर संध्याकाळचं जेवण यायचं. शीळं तुकडं खाऊन तो मळ्यात वस्तीला राहिला. मळ्यात शेडमधील मुक्या जनावरांबरोबर हितगूज करीत राहिला. या माणसांपेक्षा मुकी जनावरं त्याला शहाणी वाटू लागली.

तरीही ज्याला शहाणपण यायला हवं होतं त्याला शहाणपण आलं नाही; उलट विचारणारं कोणी नाही म्टल्यावर सगळ रान मोकळंच की. बसायला स्पेंडर होती. मग गांवातील फुकट खाऊ दोस्त गोळा होत गेलं. रोज नवं गांव आणि संध्याकाळी धाब्यावर जेवण. भानगडीखोर पोरांची गँगच तयार झाली. आई बापाला वेठीला धरून ही तरणी पोरं त्याचं रक्त आटवू लागली.

अशातच वर्ष सरलं. पतसंस्थेच्या कर्जाचं हप्तं थकलं. गांवदरीची दहा गुंठ्याची पट्टी गहाण ठेवून माय–लेकरांनी पंचवीस हजार काढलं. हप्तं भागवून उरलेल्या पैशान हातउसणं देणंकरी भागविल. महिन्याला शेकडा दहा रुपये व्याज. मुद्दलापेक्षा व्याजच जास्त झालेलं. त्या रुपयात फक्त व्याजच भागलं. तरीही त्याच्या वागण्यात फरक पडला नाही.

शेवटी त्याचं लग्न करावं म्हणून विलासकाकानं प्रयत्न केला. तर याच गुण सगळीकडं माहिती. आपल्या पोरीचा गळा कोण कशाला कापील. मग त्यांन अंजनाला सांगितलं तिच्या भावाची मुलगी सून म्हनून आणायची. विलासकाकांना एक वेडी आशा होती. जर आपल्या अंजनानं भाची सून म्हनून आणती तर बरं

होईल. लग्न झाल्यावर पोरगा संसारातून गुंतून राहील. माझं म्हणून सगळा भार उचलंल. आज नाही उद्या त्यालाच सगळं बघावं लागणार होतं. आता आपल्या म्हेवन्याचा काय निरोप येतो याची तो वाट पहात होता. असंच आठ दिवस निघून गेलं.

त्या दिवशी कसलीशी सुट्टी होती. भावकीतील शंकर मास्तर फेरी टाकावी म्हणून मळ्याकडं आलेलं. मास्तर मुद्दाम वाकडी वाट करून विलासकाकाकडं आलं. काकामधल्या पट्टीला बाभळीखाली बसलं होतं.

''ये शंकरऽऽ.'' काकानी त्याला बोलावलं.

''बसऽऽ.'' काका म्हणालं.

मास्तर येऊन बसलं. पाच–दहा मिनिटं इकटचं तिकडचं बोलून झालं. मग मास्तरानीच विषय काढला.

''काका असं मळा धरून का पडलायासा ठाऊक आहे मला. खरं एवढ्यानं प्रश्न सुटण्यासारखा राहिला नाही आता.'' शंकर मास्तरानं मुळ विषयाला हात घातला.

मास्तराच्या अचानक बोलण्यानं काकाचं काळीज लखकन् हाललं. आपल्या पोरानं आणखी काही गुण उधळून ठेवलंय का काय कुणास ठाऊक. त्याला भीतीनं घेरल्यासारखं झालं. काकानं लाख प्रश्नांच्या नजरेनं मास्तरांकडं पाहिलं.

मग मास्तर पुढं म्हणालं, ''पंडीतचं घोडं हाताबाहेर गेलंय. तो आता भिमराव चेअरमनच्या पोराबरोबर फिरत असतोय.

''मास्तर म्या हात टेकल्यात त्येच्यापुढं. त्येच्या आयनं त्याचा लाड केलाय म्हनून या फळाला आलंय.'' काकानं आपलं मन मोकळं करावं म्हणून म्हटलं.

''तुम्ही दोघांनी त्याला आवर घातला पाहिजे. काका चेअरमन साऱ्या गांवच्या माणसांचं दुधाचं फॅट कमी लावून मलई खातोय. त्याच्या पोराला काय कमी पडायचं नाही. चार पिढ्या बसून खातील एवढी माया गोळा केलीया त्यानं. त्याच्या पोरानं कसबी वागलं तर खपलं. खरं आपलं काय ?''

''खरं हाय तुझं, म्हनून अंजीला सांगीटल्या. तुझी भाची सून म्हनून आण. एकदा पायखोडा घातल्याव कुठ पळतुया.'' विलासकाकानं जो एक पर्याय होतो तो बोलून दाखविला.

''भोळा आहेस तू काका, तुझ्या म्हेवण्याला त्याचा प्रताप माहिती नाही असं म्हणतोस ? त्यानं आपल्या बहिणीला सांगितलंय, माझी पोरगी कसाबाला द्याला माझं काय डोकं फिरलं नाही. पुन्हा बहिण म्हणून माझ्या दारात सुध्दा येऊ नकोस. तुझ्या फाजील लाडानं प्वार वाया गेलं. एकपरी दाजी माझ्याकडं आलत तर ताब्यांबर पाणी तरी देईन, खरं तुला नाही.'' मास्तरानं उलघडा घेला.

विलासकाकानं डोकंच धरलं. बसल्या जागेवर त्याला कापर भरलं.

मास्तरच पुढं सांगू लागलं. ''रात्री वहिनी माझ्याकड आलेली. तिनंच मला सगळं सांगितलं. कायतरी तोड काढा म्हणून रडत होती.''

''आता कशाला रडतीया. तिच्या आयला मी......! तिनंच घरांच घरपण घालीवलं आणि आता रडून नाटक करतीया व्हय.''

विलासकाकांचा राग उफाळून आला.

''शांत हो काका. उगीच डोक्यात राख घालून घेऊ नकोस.'' मास्तर त्याला समजावित म्हणालं, ''काका तुझ्याच घरची अशी दशा झाली आहे असं नाही. सारं तामजाई खोरं हळूहळू या वाटेन जाऊ लागलंय. या निवडणुकीच्या प्रचारानं तरण्या पोरांच्या तोंडांना दारू आणि मटणाची चटक लागलीया. ती जाता जाईना. शिक्षण अर्धवट सोडून ही तरुण–पिढी वाया गेली. घरा–दारावर, जमिनीवर पतसंस्थांचं आणि खाजगी सावकाराचं कर्ज काढून चैन करु लागली. त्यांना आवर कोण घालणार ? साऱ्याच गोष्टी हाताबाहेर

गेल्यात.'' मास्तरांनी आजचं वास्तव थोडक्यात सांगितलं.

''खरं हाय तुझं. घरचं ह्या पोरास्नी ग्वाड लागंना. धाब्याव जेवाय जात्यात. मिळवायची आकल न्हाई, उधळाय पुढं. आई-बान कसं दिसं काढलं हे त्यास्नी कसं कळंल !'' विलासकाका जीव तोडून म्हणाला.

''तेव्हढ्यावर नाही थांबली ही पोरं. आता हायवेला डांसिंग बारला जायाला लागल्यात. चार आठ दिवसात हजारानं रुपये उडीवल्यात.'' मास्तर म्हणालं.

''मजीऽऽ!'' विलासकाका ऑऽऽ करून बघतच राहिला.

''खरं तेच सांगतोय. तुझा पंडीतही तेच करतोय. काका तू त्याच्या नांवावर जमीन करून चूक केलीस.''

''म्या कवा त्येच्या नांवावर जमिनीचं खातं केलंय.''

त्याच्या तोंडात राळ वाळायची वेळ आली. कडकलक्ष्मीचं 'हासुड' बसल्यासारखी त्याची अवस्था झाली. झरझरून अंगावर काटं येऊ लागलं. त्याला बोलता येईना. त्याची जीभ जड झाली.

मास्तर पुढं बोलतच राहिलं. ''मग बघ, त्यानं तुझी खोटी सही करून, तलाठ्यावर चार पैसे देवून, त्याचं हात ओलं करून जमीन आपल्या नावावर करून घेतली, आणि राजमाता पतसंस्थेचं एक लाख कर्ज काढलंय.''

''काय सांगतुयास ?'' असं म्हणण्यासाठी त्यानं तोंड उघडलं पण मुखातून शब्द बाहेर आलंच नाहीत.

''होय. काका खरं तेच सांगतोय. तेव्हढं रुपये त्यानं उधळलं असणार म्हणून तो परवापासून मला माळावरच्या आण्णासंगं फिरतांना दिसतोय. त्यानं म्हणं त्याला दहाच्या व्याजानं तीस हजार रुपये दिल्यात.''

''आर देवा ! काय ह्यो गळफास माझ्या गळ्याला.''

– आणि तो मुकाच झाला. मास्तर सांगत होतं. पण त्याचं आता लक्ष नव्हतं. आता ऐकण्यासारखं आणखी काय राहिलंच नव्हतं.

''बर येतो काका. उशीर होतोय. सांभाळ बाबा आणि काहीतरी मार्ग काढून या गोष्टीला आवर घाल.'' मास्तर उठून गांववाटंच्या रोखांन चालू लागलं.

बसल्या जागी विलासकाकाचं सार शरीर जड झालं. मस्तकात लाख विंचवाच्या वेदना ठणकां घालू लागल्या. मस्तक आणि डोळ्यांची बुबळं तापल्या तव्यासारखी झाली. अंगार ओकू लागली.

''आता कसं हुयाचं ?'' म्हणून काकानं कपाळाला हात लावला. त्यांच्याच हात त्यांना दहा मणाच्या ओझ्यासारखा वाटू लागला. हळूहळू सारं शरीर बधीर होत आहे असंच त्यांना वाटू लागलं.

कितीतरी उशीर विलासकाका तिथं बसून होतं. तिन्हीसांज व्हायची वेळ झाली. शिवारातील माणसं घराच्या ओढीनं गांव-वाट चालू लागली. दुभत्या जनावरांनी गोठ्याच्या ओढीनं पानंद जवळ केली. राना-रानात गेलेली रानपाखरं घरट्याकडं परतू लागली. येतां येतां अंधार दाटून आला.

दुसरा दिवस उजाडला. सारा गांव जागा झाला. माणसं आपापल्या व्यापात गुंतली.

शनिवार असल्यानं शंकरमास्तर सकाळी लवकर शाळेला गेलेलं. साडे-अकरा वाजता घरी आल्यावर विलासकाकाला लकवा मारल्याचं त्यांना कळलं. सकाळी नऊ वाचता बबनच्या ट्रॅक्सनं विलासकाकाला कोल्हापूरला सरकारी दवाखान्यात आडमिट केलं होतं.

दुपारच्या एस्.टी.न शंकर मास्तर कोल्हापूरला दवाखान्यात गेलं. काकाला कॉटवर टाकलं होतं. बाजूला चिमणीसारखं तोंड करून अंजना बसली होती. रडून रडून तिचं डोळं आणि तोंड सुमारल्याच्या स्पष्ट खुणा चेहऱ्यावर दिसत होत्या.

शंकर मास्तर विलासकाकाच्या कॉट शेजारी गेलं. डावा डोळा तिरळा झालेला. तोंड वाकड झालेलं. जीभ लुळी पडलेली. डावा हात आणि डावा पाय कॉटच्या बाहेर लुळा होऊन पडलेला.

''काकाऽऽ!'' शंकर मास्तरांनी काकांना हाक मारली.

तिरळा डोळा अधिकच तिरळा झाला. उजव्या डोळ्यानं त्यानी मास्तरकडं पाहिलं.

खळकन् गालावर अश्रू ओघळलं. काकांनी बोलायचा प्रयत्न केला पण त्यांना बोलता आलं नाही. फक्त त्यांनी उजव्या हाताचं डमरु वाजविल आणि आभाळाकडं बोट केलं.

मास्तराना त्याची केविलवाणी धडपड पाहावेना. त्यांना आपलं अश्रू लपविता आलं नाही. काकाच्या मस्तकावर थोपटून जड पायानी ते व्हरांड्यात आलं. मागून रडत-रडत पदराचा बोळा तोंडात घालून अंजना आली.

''पंडीत कुठाय ?''

''काल-सकाळी-बिन सांगता घरातनं गेलाय त्येचा आजून पत्त्या न्हाई.'' तिनं डोळं पुसत म्हटलं.

मास्तरानी पुढं काही विचारलं नाही. तिच्या हातात दोन हजार देत म्हणालं, ''हे औषध पाण्याला ठेवून घे. मी डॉक्टरांना भेटलोय. नॉर्मल अॅटक आहे म्हणालं. औषधं आणि व्यायामानं चार-सहा महिन्यात काठी घेऊन हिंडेल-फिरेल म्हणालं.'' आणि एक दीर्घ उसासा घेऊन मास्तर म्हणालं, ''खर अधूच.''

तसा अंजनाचा अस्पष्ट हुंदका बाहेर पडला.

''काळजी घे. परवा सोमवारी शाळा सुटल्यावर येऊन जाईन.'' दवाखान्याच्या पायऱ्या उतरत उतरत मास्तर म्हणालं.

मुक्कामाच्या एस.टी.नं मास्तर गावाकडं यायला निघालं. एस.टी.त खूपच गर्दी होती. गोंगाट वाढला होता. मास्तर मात्र बेचैन होतं. त्यांच्या शेजारच्या सीटवरचा माणूस वर्तमानपत्र वाचत होता. मास्तरनीही सकाळची शाळा असल्यानं पेपर वाचला नव्हता. त्यानी शेजाऱ्याकडून पेपर मागून घेतला. बातम्यांच्यावर नजर फिरवत-फिरवत त्यांनी मधलं पान उलघडलं आणि एका बातमीनं त्यांचं लक्ष वेधलं. बातमी अशी होती. ''डांसिंग बारमध्ये मद्यधुंद अवस्थेत हैदोस घालणाऱ्या तरुणांना पोलीसांनी पकडलं.''

सविस्तर बातमीत पंडीत विलास कदम हे नाव होतं. शंकर मास्तराना आपलं डोकं जड होत आहे असं वाटू लागलं. तोच दुसऱ्या बातमीवर त्यांच लक्ष गेलं. बातमी अशी होती. ''नॅशनल हायवेला आणखी नऊ डांसिंग बारना परवानगी देण्यात येणार.''

-आणि मास्तरानी गच्च डोळंच झाकून घेतलं. तरी त्यांच्या डोळ्यासमोर खाजगी सावकाराकडून जमिनी गहाण टाकून डांसिंग बारमध्ये मद्यधुंद नाचणारी तामजाई खोऱ्यातील तरुण पिढी दिसत होती आणि दोष नसताना गळफास लागून भोग भोगणारा विलासकाकाही.

**स्वाध्याय -**

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :-**

१) विलासकाकांना आईची आठवण का झाली ? आईने काय सांगितले होते ?

२) अंजनाच्या भावाने आपल्या मुलीने लग्न पंडिताबरोबर करण्यास का नकार दिला ?

३) पंडिताला कोण कोणत्या वाईट सवयी लागल्या होत्या ? त्याचा परिणाम काय झाला ?

४) विलासकाकाच दुःख तुमच्या शब्दात लिहा.

* * *

# व्याकरण विभाग

# (१) 'निबंध लेखन'

निबंध (नि + बंध) या शब्दाचा अर्थ 'बांधणे, गुंफणे, जुळविणे' असा आहे. एखाद्या विषयावर निबंध लिहिताना जी–जी विचारपुष्पे सुचतील ती प्रथम जमा करावीत. त्यातील आवश्यक आणि सुयोग्य मुद्यांची मांडणी सुंदर शब्दातून गुंफावी. त्यावेळी 'संचय, निवड, गुंफण' असा क्रम लक्षात ठेवावा. योग्य त्याठिकाणी म्हणी, वाक्प्रचार, सुभाषित, सुविचार यांचा चपखलपणे वापर करावा.

निबंधाचे स्थूलमानाने पाच प्रकार मानले जातात.

**१) वर्णनात्मक निबंध :** दैनंदिन जीवनात आपण पाहिलेल्या व्यक्तीचे, प्रसंगाचे, दृश्याचे किंवा वस्तूचे शब्दात केलेले चित्रण म्हणजे वर्णनात्मक निबंध होय.

१) एक रम्य पहाट. २) माझा आवडता साहित्यिक. ३) भारतीय शेतकरी.

**मुद्दे :** भारतीय शेतकरी : १) भारत कृषी प्रधान देश – शेतकरी अन्नदाता – शेतकऱ्यांचे अपुरे शिक्षण – त्यामुळे शेती व्यवसायात निर्माण झालेला अडथळा – सरकारचे शेतीविषयक धोरण – आधुनिक तंत्राचे शेतीत अवलंबन – कृषी बाजार व्यवस्था – निसर्गाची अनियंत्रित परिस्थिती – शेतकरी समस्यांना कोणी–कोणी वाचा फोडली.

**२) कथनात्मक निबंध :** एखादी घटना सुसंगतवार क्रमबध्दपणे निवेदन अथवा कथन करून सांगणे याला 'कथनात्मक अथवा निवेदनात्मक निबंध' म्हणतात.

१) मी पाहिलेला अपघात. २) आमच्या गावची जत्रा. ३) आईच्या आठवणी.

**मुद्दे : आईच्या आठवणी :** आई ही पहिली गुरु – आईचे वर्णन – आईचा स्वभाव – आईचे काम – आईचे घरातील स्थान आणि महत्व – संस्कृती निर्मीती, संवर्धनकर्ती – मुलांच्यावरील योग्य संस्कार होण्यासाठी धडपडणारी – महान दैवत.

**३) चिंतनात्मक निबंध :** वैचारीक आणि चर्चात्मक निबंधाला चिंतनात्मक निबंध म्हणतात. यात दोन्ही बाजूचे म्हणजे विधायक आणि विध्वंसक मुद्यांचे विवेचन केले जाते.

१) दूरचित्रवाणी शाप की वरदान. २) प्रदूषण – एक समस्या. ३) भ्रष्टाचाराचा भस्मासूर

४) अंधश्रध्दा – सामाजिक समस्या. ५) हुंडा एक सामाजिक समस्या.

**मुद्दे : दूरचित्रवाणी शाप की वरदान :** दूरदर्शनाचा शोध – दूरदर्शनाचे कार्यक्रम – दूरदर्शनामुळे होणारे मनोरंजन, माहिती, ज्ञान, बातमी – दूरदर्शनमुळे लोकांच्या वेळेचा होणारा अपव्यव, दोष, समज – सरकारचे त्यावर नियंत्रण नसल्याने होणाऱ्या समस्या – जीवनात आवश्यक तेवढाच वापर होणे गरजेचे – दूरदर्शनमुळे मुलांच्यावर आणि तरुण पिढीवर होणारा परिणाम – फायदा – तोटा.

२) हुंडा एक सामाजिक समस्या – भारतीय संस्कृतीला लागलेला कलंक – हुंडा वरपक्षाची मागणी – स्त्रीयांच्यावर होणारा अन्याय – हुंडाबंदीविषयीचे कायदे आणि अमंलबजावणी – सामाजिक संस्थांचे प्रयत्न – युवक – युवतींची जागृती आणि आचरण – वधु पक्षाच्या आई वडिलांची होणारी कुचंबणा.

**४) कल्पनात्मक निबंध :** आपल्या जीवनात एखाद्या व्यक्तीची, वस्तूची, अधिकाराची कितपत आवश्यकता आहे याचे कल्पनेने रेखाटलेले काल्पनिक चित्रण म्हणजे कल्पनात्मक निबंध होय.

१) वर्तमानपत्रे बंद पडली तर.... २) मी चंद्रावर गेलो तर .... ३) झाडे नसती तर .... ४) सुर्य उगवला नाही तर ....

**मुद्दे : सूर्य उगवला नाही तर** : निसर्ग–सृष्टीची हालचाल थांबेल – झाडे – वनस्पती उगवणार नाहीत – अंधाराचे साम्राज्य – मानवी जीवन व पशु–पक्षी जीवन विस्कळीत होईल – सूर्याचा निरंतर फिरण्याचे फायदे – विश्रांतीची गरज – चैतन्याचा स्त्रोत – सौर उर्जा.

**५) चरित्रात्मक किंवा आत्मचरित्रात्मक निबंध** : व्यक्तीचित्रणामध्ये त्या व्यक्तीचे व्यक्तीमत्त्वाचे विविध पैलू दाखविले जातात आणि आत्मचरित्रामध्ये स्वतःच्या अनुभवाचे कथन – समर्थन करीत जीवनाविषयी सांगितले जाते.

१) आदर्श समाजसुधारक ज्योतीबा फुले. २) संविधानशिल्पी डॉ. आंबेडकर ३) माझे शिक्षण

मुद्दे : आदर्श समाजसुधारक ज्योतीबा फुले : ज्योतीबा फुलेंचा जन्म, बालपण – शिक्षणावरील आसक्ती – वाचन – सामाजिक कार्ये – जीवनात आलेली संकटे आणि त्यातून काढलेला मार्ग – जीवनातील आदर्शमय दोन प्रसंग अथवा घटना – समाजसुधारणा केल्यामुळे त्यांचे स्त्रीजीवनावरील आजचे परिणाम.

# (२) 'विभक्ती'

वाक्यात जे शब्द येतात ते त्यांच्या मूळ स्वरूपात जसेच्या तसे सामान्यतः येत नाहीत. वाक्यात वापरतांना त्यांच्या स्वरूपात बदल करावा लागतो. उदाहरणार्थ – 'शेजारी मधू रस्ता कुत्रा काठी मार' असे शब्द एकापुढे एक ठेवल्याने काहीच बोध होत नाही. या शब्दसमूहाला वाक्य म्हणता येत नाही. ते वाक्य होण्यासाठी शेजारच्या मधूने रस्त्यात कुत्र्याला काठीने मारले' अशा स्वरूपात ते प्रत्ययासह शब्द ठेवावयास हवेत. वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरूपात जो बदल किंवा विकार होतो त्याला व्याकरणात 'विभक्ती' असे म्हणतात. विभक्तीची व्याख्या अशी :

**नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना 'विभक्ती' असे म्हणात.**

नामांचा क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध आठ प्रकारचा असतो; म्हणून विभक्तीचे एकंदर आठ प्रकार मानले जातात. ते असे : (१) प्रथमा, (२) द्वितीया, (३) तृतीया, (४) चतुर्थी, (५) पंचमी, (६) षष्ठी, (७) सप्तमी व (८) संबोधन. यांतील पहिल्या सातांना संस्कृतातील नावे दिली आहे. आठव्या संबंधाच्या वेळी हाक मारले जाते; म्हणून त्याला 'अष्टमी' असे न म्हणता 'संबोधन' असे नाव दिले आहे. (संबोधन = हाक मारणे, बोलावणे.)

**विभक्तीचे कोष्टक**

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| **विभक्ती** | **प्रत्यय** | **प्रत्यय** |
| प्रथमा | प्रत्यय नाहीत | प्रत्यय नाहीत |
| द्वितीया | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| तृतीया | ने, ए, शी | नी, शी, ई, ही |
| चतुर्थी | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| पंचमी | ऊन, हून | ऊन, हून |
| षष्ठी | चा, ची, चे | चा, ची, चे |
| सप्तमी | त, ई, आ | त, ई, आ |
| संबोधन | – | नो |

खालील अधोरेखीत शब्दांच्या विभक्ती ओळखा :

उदा. : १) नागू गवळी अंगाने चांगला गुटगुटीत होता.

२) मुलांच्या मनात आई–वडीलाविषयी प्रेम असते.

३) गीतांजली आदर्श ग्रंथ आहे.

४) भालकीहून मी कालच आलो.

५) देशभक्तानों ! मातृभूमीचे रक्षण करा.

## (३) 'आवेदनपत्रासंबंधात खालील गोष्टी ध्यानात घ्या'

दैनंदिन जीवनात अर्जाला अत्यंत महत्व आहे. पदवी घेतल्यानंतर नोकरीसाठी आवेदनपत्र करावे लागते. ते आवेदनपत्र लिहीताना ठराविक सुचनेचे पालन व ठराविक पध्दतीने केले तरच आपले आवेदनपत्र योग्य ठरते. या आवेदन करणाऱ्या अर्जदाराला माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील सुचना दिलेल्या आहेत. त्या विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वाचावे तसेच आवेदन पत्राचा नमुना दिलेला आहे. त्या नमुन्याप्रमाणे विद्यार्थ्यानी आवेदन पत्र लिहावे.

आवेदन पत्रासंबंधात खालील गोष्टी ध्यानात घ्या.

१) अर्ज म्हणजेच आजच्या प्रशासकीय भाषेत आवेदन पत्र.

२) अर्जदाराने आपला पत्ता व दिनांक कागदाच्या वरील बाजूस आपल्या उजवीकडे लिहावा.

३) आवेदनपत्र ज्यांच्याकडे द्यावयाचे आहे त्यांचे पदनाम व त्यांचा पत्ता उजव्या बाजूला स्पष्ट लिहावा.

४) पत्राचा विषय स्पष्टपणे निर्दिष्ट करावा.

५) 'महोदय' या आदरार्थी संबोधनाने पत्राची सुरुवात करावी.

६) जाहिरातीचा उल्लेख करावा.

७) वय आणि अर्हता (शैक्षणिक पात्रता) यासंबंधीची माहिती नीट लिहावी.

८) अनुभव, त्यासंबंधीचे प्रमाण पत्र यांची माहिती सादर केली आहे. असे नोंदवावे आणि प्रमाणपत्रांची नकलपत्र जोडावे.

९) नियुक्ती झाल्यास प्रमाणिकपणे काम करण्याचे अभिवचन द्यावे.

१०) दाखला जोडल्याचा उल्लेख खाली द्यावा.

# ‘नोकरीबाबत आवेदनपत्र नमुना’

महात्मा जोतीराव फुले शैक्षणिक संस्था बिदर या संस्थेत मराठी शिक्षक पदासाठी अर्ज करा.

**श्री. अरविंद तुकाराम देसाई**
मु.पो. कोगनोळी, ता. चिकोडी
जि. बेळगांव, कर्नाटक
दि. ३०-१२-२०१३

प्रति,

**अध्यक्ष,**
**महात्मा जोतीराव फुले शैक्षणिक संस्था,**
बिदर

**विषय :** मराठी शिक्षक पदाबाबत.

**संदर्भ :** दै. सकाळ, दिनांक २७-१२-२०१३ ची जाहिरात.

महोदय,

वरील संदर्भीय जाहिरात व विषय यास अनुसरून अर्ज करीत आहे. माझी वैयक्तिक व शैक्षणिक माहिती खालील प्रमाणे आहे.

**माझी वैयक्तिक माहिती :**

नाव : श्री. अरविंद तुकाराम देसाई
पता : मु. पो. कोगनोळी, ता. चिकोडी, जि. बेळगांव.
जन्म तारीख : २५-०४-१९९०
जात : हिंदू मराठा

| **शैक्षणिक माहिती :** | **विषय** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १) बी.ए. | मराठी | ६०% |
| २) बी.एड्. | मराठी, भुगोल | ६५% |
| ३) एम.ए. | मराठी | ६०% |

**अनुभव :** मला एक वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आहे.

जर मला आपल्या संस्थेत नोकरी करण्याची संधी मिळाली तर मी प्रामाणिक पणे कार्य करीन. तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतिपर्वक विचार करावा ही विनंती.

आपला,
अ.ब.क.

(**टीप :** उत्तर पत्रिकेत अर्ज लिहीत असताना स्वतःच्या नावाचा उल्लेख करू नये.)

आपल्या दैनंदिन जीवनात समाजात अनेक प्रकारच्या समस्या आहेत. या समस्या सोडण्यासाठी त्या विभागाकडे अर्ज करावा लागतो. अशा अर्जामुळे आपल्या समाजातील समस्या सुटू शकतात. त्यासाठी तक्रार विषयक अर्जाचा एक नमुना दिलेला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या समाजातील तक्रारी करत असताना अशा पध्दतीने तक्रारी अर्ज करावा.

## तक्रार अर्ज नमुना दोन

आम्बेसांगवी गावातील नळाला नियमित पाणी सोडण्यासाटी ग्रामपंचायत अध्यक्षांना अर्ज करा.

समस्त गावातील गावकरी
मु.पो. आम्बेसांगवी ता. भालकी,
जि. बिदर.
ता. ०५-१२-२०१३

प्रति,
अध्यक्ष,
ग्रामपंचायत कार्यालय,
ता. भालकी, जि. बिदर.

**विषय/प्रकरण :** नियमित पाणी पुरवठा करणेबाबत.

महोदय,

सदरील विषय प्रकरणी आपल्याकडे तक्रार करण्यात येते. नळांना पाणी पुरवठा नियमित होत नाही. पाणी सोडण्याची वेळ ठीक सकाळी ८ वाजता आहे. पण अलिकडे पाणी सोडण्याची निश्चित अशी वेळ राहिलेली नाही. गेली १० दिवस पाणी वेळी व अवेळी नळाला येते. पण त्या वेळी गावातील स्त्रिया आणि पुरुष मंडळी शेतात कामाला गेलेले असतात. त्यामुळे त्यांना पाणी भरता येत नाही. त्यांना पाण्यासाठी परत सायंकाळी गावापासून ४ कि.मी. अंतरावर असलेल्या विहीरीतून पाणी आणावे लागते. त्यामुळे स्त्रियांना कारण नसताना कष्ट करावे लागत आहे. तरी पाणी सोडण्याची जी स्थिती आहे. त्यावेळेत नळाला पाणी सोडावे व सहकार्य करावे ही नम्र विनंती.

अर्जदार
गावकरी मंडळी
१) --------
२) --------
३) --------
४) --------

# (४) वाक्प्रचार

**वाक्प्रचार :** पुढील वाक्ये वाचा :

१) घर घेणाऱ्याचे निश्चित ठरताच आजच मी रामभाऊंना **सुपारी दिली.**

२) गेली चार वर्षे तो एस.एस.सी. ची **वारी करीत आहे.**

३) आज घरात साखर **औषधालादेखील नाही.**

४) अलीकडे आपली गाठ पडणे हा **कपिलाषष्ठीचाच योग.**

वरील वाक्यांतील काही शब्द जाड ठशांत छापलेले आहेत. त्यांच्या अर्थाकडे जरा सूक्ष्म नजरेने पाहा : त्यांचा शब्दशः जो अर्थ (= वाच्यार्थ) आहे. तो आपण या वाक्यांत घेत नाही आपल्या बोलण्याच्या प्रचारात या शब्दसमूहांना एक वेगळाच अर्थ प्राप्त झालेला आहे.

कसा तो पाहा :

पहिल्या वाक्यांतील रामभाऊंना मी 'सुपारी दिली' याचा अर्थ सुपारी ही वस्तू त्यांना खाण्यासाठी दिली असा आपण येथे करत नाही, तर रामभाऊंशी मी 'करार केला' असा करतो. एखादी गोष्ट ठरविताना पुष्कळ घासाघीस होते, चर्चा होते व शेवटी काही निश्चित झाले हे सुचविण्यासाठी सुपारी देण्याची पध्दत आहे. वाजंत्री, गोंधळी, आचारी यांच्याशी काही ठरून करार झाला याचे प्रतीक (= खूण, चिन्ह) म्हणून सुपारी देण्याची प्रथा आहे. यावरून सुपारी देणे = सौदा ठरणे, करार करणे असा अर्थ त्याला प्राप्त झाला.

दुसऱ्या वाक्यात 'वारी करत आहे' असा शब्दप्रयोग आहे. हा शब्दप्रयोग आपण केव्हा करतो ? दरवर्षी किंवा प्रत्येक एकादशीला पंढरीस नेमाने जाऊन येणाऱ्या व्यक्तीस आपण 'वारकरी' म्हणतो. वारी करणे = नेमाने जाऊन येणे, फेरी मारणे. पण दरवर्षी परीक्षेस बसून नापास होणाऱ्यास 'वारकरी' असे उपहासाने म्हटले जाते. येथे वारी करणे = परत परत नापास होणे असा अर्थ घ्यावयास हवा.

तिसऱ्या वाक्यातील 'साखर औषधालादेखील नाही' याचा अर्थ औषध घेतल्यानंतर त्याचा कडूपणा घालविण्यासाठी खावयाला साखर नाही असा आपण घेत नाही. औषधासाठी एखादी वस्तू फारच थोडी लागते. तितक्या प्रमाणातदेखील एखादा पदार्थ नसला, तर हा शब्दप्रयोग करतात. एखाद्या गोष्टीचा आत्यंतिक अभाव हा याचा अर्थ.

चौथ्या वाक्यात 'कपिलाषष्ठीचा योग' असा शब्दप्रयोग आहे. ज्योतिषशास्त्राच्या मते कपिलाषष्ठी हा विलक्षण योगायोगाचा दिवस मानला जातो. भाद्रपद महिना, कृष्णपक्षातील षष्ठी ही तिथी, मंगळवार, रोहिणी दिवसनक्षत्र व महानक्षत्र हस्त इतक्या गोष्टी जमून आल्या म्हणजे तिला 'कपिलाषष्ठी' असे म्हणतात. असा योग क्वचित म्हणजे सुमारे साठ येतो असे म्हणतात. त्यावरून 'फारच दुर्मिळ, पुष्कळ काळाने येणारी संधी किंवा अपूर्व घटना असा याला अर्थ प्राप्त झाला आहे.

यावरून असे आढळून येईल, की भाषेत असे काही शब्द वा शब्दसमूह येतात की त्यांचा शब्दशः अर्थ घेऊन चालत नाही. रूढीने किंवा परंपरेने त्यांना त्यांच्या मूळ अर्थापेक्षा वेगळाच अर्थ प्राप्त झालेला असतो व तोच भाषेत रूढ होऊन बसतो. अशा रीतीने, शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला 'वाक्प्रचार' असे म्हणतात. यालाच कोणी 'वाक्संप्रदाय' असेही म्हणतात.

# वाक्प्रचार व त्याचा अर्थ

| | | |
|---|---|---|
| १) | **गयावया करणे** | – केविलवाणी विनंती करणे. |
| २) | **अंगाचा तिळपापड होणे** | – अतिशय संतापणे. |
| ३) | **पगडा बसवणे** | – छाप प्रभाव पाडणे. |
| ४) | **मूग गिळणे** | – अपमान सहन करून गप्प राहणे. |
| ५) | **कस्पटासमान लेखणे** | – क्षुल्लक, कमी दर्जाचे समजणे. |
| ६) | **नामानिराळा राहणे** | – अलिप्त राहणे. |
| ७) | **दत्त म्हणून उभा रहाणे** | – अचानक येणे. |
| ८) | **चारी मुंड्या चीत होणे** | – संपूर्ण पराभव होणे. |
| ९) | **रामराम ठोकणे** | – निरोप घेणे. |
| १०) | **आकाशपाताळ एक करणे** | – फार आरडा ओरडा करणे. |
| ११) | **निभाव लागणे** | – टिकाव लागणे. |
| १२) | **उमाळा येणे** | – तीव्र इच्छा होणे. |
| १३) | **वर्ज्य करणे** | – टाकणे. |
| १४) | **काडीमोड करणे** | – संबंध तोडणे. |
| १५) | **कां कू करणे** | – एखादी गोष्ट करण्यास तयार नसणे. |
| १६) | **आभाळ फाटणे** | – मोठे संकट येणे. |
| १७) | **इडापिडा टाळणे** | – संकट जाणे. |
| १८) | **परिपाठ ठेवणे** | – सवय ठेवणे. |
| १९) | **ब्रह्मांड कोसळणे** | – मोठे संकट येणे. |
| २०) | **कागाळी करणे** | – तक्रार करणे. |
| २१) | **खांदा देणे** | – मदत करणे. |
| २२) | **न्यूनगंड वाटणे** | – कमीपणा वाटणे. |
| २३) | **जीव मुठीत घेणे** | – घाबरणे. |
| २४) | **पदर पसरणे** | – याचना करणे. |
| २५) | **पाणउतारा करणे** | – अपमान करणे. |
| २६) | **वाली नसणे** | – रक्षणकर्ता नसणे. |
| २७) | **हिरमुसले होणे** | – नाराज होणे. |
| २८) | **पांग फेडणे** | – इच्छा पूर्ण करणे. |
| २९) | **डोके सुन्न होणे** | – काही न सुचणे. |
| ३०) | **धिंडवडे निघणे** | – फजिती होणे. |
| ३१) | **आटापीटा करणे** | – कष्ट करणे. |
| ३२) | **माया पाताळ होणे** | – प्रेम कमी होणे. |
| ३३) | **वाऱ्यावर सोडणे** | – काही न विचारणे. |
| ३४) | **हातपाय गाळणे** | – धीर सोडणे. |
| ३५) | **पोटात आग पडणे** | – भूक लागणे. |
| ३६) | **पाणी पाजणे** | – पराभव करणे. |
| ३७) | **सुगावा लागणे** | – अंदाज येणे. |
| ३८) | **डोक्यावर घेणे** | – कौतुक करणे. |
| ३९) | **हातावर तुरी देणे** | – फसविणे. |
| ४०) | **बेगमी करणे** | – साठा करणे. |
| ४१) | **सोन्याचा धूर निघणे** | – चांगली परिस्थिती येणे. |
| ४२) | **अकलेचा खंदक** | – मूर्ख मनुष्य. |
| ४३) | **उंटावरचा शहाणा** | – मूर्खपणाचा सल्ला देणारा. |
| ४४) | **श्री गणेशा करणे** | – प्रारंभ करणे. |
| ४५) | **कळीचा नारद** | – भांडणे लावणारा. |
| ४६) | **काना डोळा करणे** | – लक्ष न देणे. |
| ४७) | **जीव टांगणीला लागणे** | – चिंताग्रस्त होणे. |
| ४८) | **जीवाचे रान करणे** | – खूप कष्ट करणे. |
| ४९) | **त्रेधा उडणे** | – फजिती होणे. |
| ५०) | **तिलांजली देणे** | – त्याग करणे. |
| ५१) | **धाबे दणाणणे** | – खूप भीती वाटणे. |
| ५२) | **नाकी नऊ येणे** | – बेजार होणे. |
| ५३) | **डोळे उघडणे** | – पश्चाताप होणे. |
| ५४) | **पारा चढणे** | – खूप रागावणे. |

## (५) समूहदर्शक शब्द (शब्दसमूहाबद्दल एक शब्द वापरणे)

**आधी जन्मलेला –** अग्रज

**मागून जन्मलेला –** अनुज

**पूर्वी कधी न पाहिले/ऐकले असे –** अपूर्व

**ज्यास कोणीही शत्रू नाही असा –** अजातशत्रू

**तिथी वार न ठरवता आलेला –** अतिथी/आगंतूक

**थोडक्यात समाधान मानणारा –** अल्पसंतुष्ट

**अनेक गोष्टीत एकाच वेळी लक्ष देणारा –** अष्टावधानी

**पायापासून डोक्यापर्यंत –** अपाद मस्तक

**देव आहेसे मानणारा –** आस्तिक

**अगदी पूर्वीपासून राहणारे –** आदिवासी

**उदयाला येत असलला –** उदयोन्मुख

**श्रम न करता खाणारा –** ऐतोबा/ऐतखाऊ

**लहानग्यांना झोपवण्यासाठीचे गाणे –** अंगाईगीत

**राष्ट्राराष्ट्रातील –** आंतरराष्ट्रीय

**धान्यादी साठविण्याची बंदिस्त जागा –** गोदाम/कोठार/वखार

**केलेले उपकार जाणणारा –** कृतज्ञ

**केलेले उपकार न जाणणारा –** कृतघ्न

**कर्तव्याकडे पाठ फिरविणारा –** कर्तव्यपराङ्मुख

**इच्छिलेली वस्तू देणार झाड –** कल्पवृक्ष

**इच्छिलेली वस्तू देणारी गाय –** कामधेनू

**कवितेची रचना करणारी –** कवयित्री

**आकाशात गमन करणारा –** खग

**मूर्ती जिथे असते तो देवालयातील भाग –** गाभारा

**सैन्याची चक्राकार केलेली रचना –** चक्रव्यूह

**जाणून घेण्याची इच्छा असणारा –** जिज्ञासू

**चार रस्ते एकत्र येतात ती जागा –** चव्हाटा चौक

**जिवाला जीव देणारा –** जिवलग

**नाणी पाडण्याची जागा –** टाकसाळ

**शेतकऱ्यांना मिळणारे सरकारी कर्ज –** तगाई

**किल्ल्याच्या भोवतीची भिंत –** तट

**तीन रस्ते एकवटतात ती जागा –** तिठा

**खूप दानधर्म करणारा –** दानशूर

**दररोज प्रसिध्द होणारे –** दैनिक

**अस्वलाचा खेळ करणारा –** दरवेशी

**तोंडातोंडी चालत आलेली गोष्ट –** दंतकथा

**तिन्ही बाजूंनी पाणी असलेला प्रदेश –** द्वीपकल्प

**दोन नद्यांमधील जागा –** दुआब/दोआब

**दैवावर भरवंसा ठेवून राहणारा –** दैववादी

**उंचारून पडणारा पाणलोट –** धबधबा

**एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे –** धर्मान्तर

**देव नाहीसे मानणारा –** नास्तिक

**कुणाचाही आधार नसलेला –** निराधार

**घरादारा व देशास पारखा झालेला –** निर्वासित

**पायाच्या नखापासून शेंडीपर्यंत –** नखशिखान्त

**नाटकात भूमिका करणारा पुरुष –** नट

**एकमेकांवर अवलंबून असणारे –** परस्परावलंबी

**पुरामुळे नुकसान झालेले लोक –** पूरग्रस्त

**पंधरवड्याने प्रसिध्द होणारे –** पाक्षिक

**मोफत पाणी मिळण्याची सोय –** पाणपोई

**गावातील एकत्र पाणी भरण्याची जागा –** पाणवठा

**तिथी, वार, नक्षत्र, योग, करणाऱ्यांची पुस्तिका –** पंचाग

**शत्रूला सामील झालेला –** घरभेदी

**डोंगर पोखरून आरपार केलाला रस्ता –** बोगदा

**निरपेक्ष कामाबद्दल दिलेले सन्मानाचे धन –** मानधन

**मोजके असे बोलणारा –** मितभाषी

**लग्न झालेल्या मुलीच्या आईबापाचे घर –** माहेर

**दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा –** मनकवडा

**अचूक गुणकारी असणारे –** रामबाण

**लिहिण्याची होतोटी –** लेखनशैली

**भाषण करण्याची जागा –** व्यासपीठ

**भाषण करण्याची कला –** वक्तृत्व

**दुपारच्या जेवणानंतरची अल्प झोप –** वामकुक्षी

**पती मरण पावला आहे अशी स्त्री –** विधवा

**ज्याची पत्नी मरण पावली आहे असा पुरुष –** विधुर

**दगडावर केलेले कोरीव काम –** शिल्प

**दगडावर कोरलेले लेख –** शिलालेख

**शंकराची उपासना करणारा –** शैव

**दोन नद्या एकत्र मिळण्याची जागा –** संगम

**स्वतःशी केलेले भाषण –** स्वगत

**स्वतःच्याच फायद्याचे पाहणारा –** अप्पलपोटा

**समाजात समता नांदावी असे म्हणणारा –** साम्यवादी

**नाटकाच्या प्रारंभीचे स्तवन गीत –** नांदी

**दुःखामुळे सोडलेला दीर्घ श्वास –** सुस्कारा

**देशासाठी प्राणार्पण केलेला –** हुतात्मा

**शत्रूकडील बातमी काढून आणणारा –** हेर/खबऱ्या

**हृदयाला भिडणारे –** हृदयस्पर्शी

**जेथे आकाश जमिनीला टेकल्यासारखे दिसते ती जागा –** क्षितिज

# (६) म्हणी अनुभवाच्या खाणी

(मनुष्याला येणारा अनुभव एखाद्या छोट्या वाक्यात मांडून दाखविलेला असतो. लोक अशी वाक्ये नेहमी व्यवहारात बोलताना वापरतात. लोकांच्या नेहमी म्हणण्यात येणारी म्हणून त्याला 'म्हण' असे म्हणतात. सर्वांच्या बोलण्यात येणारे चिमुकले, चटकदार, बोधप्रद व सर्वसामान्य वचन म्हणजे 'म्हण'. अनेकांना येणारा अनुभव एकजण आपल्या शहाणपणाने छोट्या सिध्दांत स्वरूप सुत्रमय वाक्यात मांडून दाखवितो. सर्वांकडून त्याला मान्यता मिळते आणि ती म्हण लोकरूढीत येते. म्हणून 'तोंडचे वाङमय किंवा अनुभवाच्या खाणी असेही म्हणतात. नमुन्यादाखल काही निवडक म्हणी त्यातून व्यक्त होणाऱ्या विचारासह खाली दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांचा अवश्य अभ्यास करून त्यांचा वापर करावा.)

१) अग अग म्हशी मला कुठं नेशी – मनात इच्छा असताना वरवर नकार दर्शविणे.
२) अंथरूण पाहून पाय पसरावे – स्वतःची कुवत पाहूनच खर्च करावा.
३) अति शहाणा त्याचा बैल रिकामा – जास्त शहाणपणाने नुकसान करून घेणारा माणूस.
४) आधी पोटोबा मग विठोबा – प्रथम स्वार्थ, मग परमार्थ.
५) आपलेच दात आपलेच ओठ – चूक करणारे आपले व शिक्षा देणारेही आपलेच.
६) आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते – मेहनत एकाची, फळ दुसऱ्याला.
७) आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास – आधीच काम करण्याची इच्छा नसणे त्यातच काहीतरी निमित्त काढणे.
८) इकडे आड, तिकडे विहीर – दोन्ही बाजूंना सारखीच अडचण.
९) उथळ पाण्याला खळखळाट फार – अल्पज्ञान्यांची बडबड.
१०) उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग – अति उतावळेपणा करणे.
११) एक ना धड भाराभर चिंध्या – सर्व गोष्टी एकदम करणे चांगले नाही.
१२) ऐकावे जनाचे करावे मनाचे – इतरांचा सल्ला घेतला तरी मनाला पटेल तेच करावे.
१३) कानामागून येणे तिखट होणे – थोड्याच दिवसात वरचढ होणे.
१४) कर नाही त्याला डर नाही – जो वाईट करीत नाही त्याला भिण्याचे कारण नाही.
१५) करायला गेला गणपती झाला मारुती – एक करायला जावे तर भलतेच होणे.
१६) कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही – दुसऱ्याच्या वाईट चिंतनाने कार्य हानी होत नाही.
१७) कावळ्याला बसायला व फांदी मोडायला एकच गाठ – तात्कालीक हलक्या कारणासही महत्त्व येणे.
१८) कामापुरता मामा – गरजेपुरते गोड बोलणे.
१९) काखेत कळसा गावाला वळसा – जवळच असलेली वस्तू सापडत नाही म्हणून जगभर शोधणे.
२०) कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच – दुर्जन आपला हेका सोडत नाही.
२१) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ – स्वजनाचा स्वजन घातकी.
२२) कोल्हा काकडीला राजी – क्षुद्र माणसे लहान वस्तूनेही खूष होतात.
२३) कोल्ह्याला द्राक्षे आंबट – प्रयत्नाने साध्य न झालेली गोष्ट वाईट.
२४) कोळसा उगाळावा तितका काळाच – वाईट गोष्ट वाईटच असणे.
२५) खाण तशी माती – बीजासारखेच अंकुर येणार.

२६) गर्जेल तो पडेल काय – केवळ बडबडणाऱ्यांच्या हातून कार्य घडत नाही.
२७) गरज सरो वैद्य मरो – काम होताच मदत करणाराविषयी आनास्था बाळगणे.
२८) गाढवाला गुळाची चव काय ? – मुर्खाला चांगल्या गोष्टी कळत नाहीत.
२९) गर्वाचे घर खाली – गर्विष्ठ माणसाला शेवटी अपमानितच व्हावे लागते.
३०) गड आला पण सिंह गेला – मोठ्या फायद्यासाठी लहानाचा तोटा.
३१) गोगलगाय पोटात पाय – वरून गरीब, आतून कारस्थानी.
३२) घरोघरी मातीच्या चुली – सर्वत्र एकच परिस्थिती.
३३) घर फिरले की वासे फिरू लागतात – वाईट स्थिती आली की सर्वच वाईट होणे.
३४) चकाकते ते सोने नसते – सर्वच आकर्षणे चांगली नसतात.
३५) चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे – प्रत्येकालाच अधिकाराची संधी येणे.
३६) चोराच्या मनात चांदणे – दुष्कृत्य करणाऱ्याच्या मनात ते सारखे डाचत असते.
३७) चोरावर मोर – एकापेक्षा दुसरा वरचढ.
३८) ज्याचे करावे बरे तो म्हणतो माझेच खरे – कायद्याची गोष्ट सांगितली तरी ती न मानणे.
३९) जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे – अनुभवाशिवाय खरे कळत नाही.
४०) जेवीन तर तूपाशी नाहीतर उपाशी – अट्टहासी वृत्ती.
४१) ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी – उपकारकर्त्याचा उदोउदो करणे.
४२) झाकली मूठ सव्वा लाखाची – आपले गुण व अवगुण झाकून ठेवावे, उघड करू नयेत.
४३) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही – कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाही.
४४) ठकास महाठक – एकापेक्षा दुसरा वरचढ.
४५) डोंगर पोखरून उंदीर काढणे – कष्ट खूप आणि फळ अल्प.
४६) ताकाला जाऊन भांडे लपविणे – मनातील हेतू प्रकट करण्यास आढेवेढे घेणे.
४७) तळे राखील तो पाणी चाखील – रक्षणकर्त्यानेच लाभ उठविणे.
४८) तोंड दाबून बुक्यांचा मार – प्रतिकार न करता मार सहन करणे.
४९) थेंबे थेंबे तळे साचे – थोडे थोडे करून पुष्कळ करणे.
५०) दगडापेक्षा वीट मऊ – दोन संकटापैकी एक सुसह्य होणे.
५१) दुरून डोंगर साजरे – वरवरच्या गोष्टी सुंदर वाटणे.
५२) दिव्याखाली अंधार – चांगल्याच्या जागी वाईट गुण असणे.
५३) दुष्काळात तेरावा महिना – संकटात अधिक संकटाची भर पडणे.
५४) धरले तर चावते सोडले तर पळते – सर्व बाजूंनी तोटा असणे.
५५) नाकापेक्षा मोती जड – मालकापेक्षा नोकर वरचढ.
५६) नाचता येईना अंगण वाकडे – करता काहीच येत नाही, पण दोष दाखविता येतो.
५७) नावडतीचे मीठ आळणी – नको असलेल्या चांगल्यातही दोष दिसणे.
५८) न कर्त्याचा वार शनिवार – काही न करता नुसत्या सबबी सांगणे.

५९) पळसाला पाने तीनच – सर्वत्र सारखी परिस्थिती असणे.
६०) पेरावे तसे उगवते – जसे बीज तसा अंकुर.
६१) पुढच्यास ठेच मागचा शहाणा – एकाच्या अनुभवावरून दुसऱ्याने शिकणे.
६२) बळी तो कान पिळी – समर्थाने दुबळ्यास छळणे.
६३) बैल गेला नि झोपा केला – वेळ निघून गेल्यावर संरक्षणाची तरतूद करणे.
६४) बोलाचीच कढी बोलाचाच भात – कृतीच न करता केवळ बडबड.
६५) भीक नको पण कुत्रा आवर – मदत नको पण संकट टाळ.
६६) भुकेला कोंडा निजेला धोंडा – वाईट परिस्थितीत हलक्या वस्तूही सुखद ठरतात.
६७) मुलाचे पाय पाळण्यात दिसतात – थोर व्यक्तीचे गुण लहानपणीच दिसून येतात.
६८) मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधावी ? –धोक्याचे काम कोणीच करीत नाही.
६९) यथा राजा तथा प्रजा – मालक तसा नोकर.
७०) रोज मरे त्याला कोण रडे – नेहमीच संकटे आली की त्यांची भिती वाटत नाही.
७१) रात्र थोडी सोंगे फार – कमी वेळात फार कामे करणे.
७२) लहान तोंडी मोठा घास – ऐपत नसताना मोठे धाडस करणे.
७३) लेकी बोले सुने लागे – एकीला बोलण्याचे सोंग, पण खरे बोलणे दुसऱ्यालाच.
७४) वासरात लंगडी गाय शहाणी – अज्ञानी लोकांत एखादाच अल्पज्ञानी महाज्ञानी ठरतो.
७५) शितावरून भाताची परिक्षा – अल्प गोष्टीवरून सर्वांची परिक्षा करणे.
७६) शेरास सव्वाशेर – एकापेक्षा एक वरचढ.
७७) साखर खाणार त्याला देव देणार – ज्याचे नशीब चांगले त्याला सर्वच सुख मिळते.
७८) सुंभ जळतो पण पीळ जळत नाही – पैसा, अधिकार गेला तरी अभिमान, ताठा जात नाही.
७९) हजीर तो वजीर – जो हजर असेल त्याला फायदा मिळतो.
८०) हातच्या कांकणाला आरसा कशाला – प्रत्यक्ष गोष्टीला पुरावा नको.

सूचना : परीक्षेत म्हणीचा अर्थ विचारला जाणार नाही. मुलांच्या माहितीसाठी अर्थ दिला आहे. म्हण पूर्ण करा असा प्रश्न विचारण्यात येईल.

**प्रश्न** : (खालील कंसातील योग्य शब्द निवडून म्हणी पूर्ण करा)

उदा. : १) कामापुरता ..................
२) एक ना धड ................
३) हजीर तो ..................
४) बळी तो ..................
५) मुलाचे पाय ................
(पाळण्यात दिसतात, वजीर, कान पिळी, भाराभर चिंध्या, मामा)

# ७. उतारा (आकलन)

लेखन कौशल्याशी संबंधित असलेल्या आणि विद्यार्थ्यांची आकलन क्षमता विकसित करणारा हा प्रकार आहे. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या गद्य उताऱ्याचे आलकन पडताळून पाहण्यासाठी 'उताऱ्यावरील प्रश्नांची ुत्तरे लिहिण्यास सांगितले जाते यालाच उताऱ्याचे आकलन असे म्हणतात.

विद्यार्थ्यांनी दिलेला उतारा काळजीपूर्वक वाचावा. मध्यवर्ती आशय नीट समजून घ्यावा. प्रश्नाचा अर्थ लक्षात घेवून उत्तरे आपल्या भाषेत समर्पक लिहावीत. यावरून भाषेचे कौशल्य, शब्दाचा वापर, वाक्याची मांडणी व नेमके उत्तर यातून दिलेल्या उताऱ्याचे विद्यार्थ्यास किती आकलन झाले आहे हे त्यावरून कळते.

**उदा. : १) उतारा वाचून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते. त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो. त्याच्या नाजूक पाकळ्या आणि सुरेख रंग डोळ्यांना सुखावतात. इवल्याशा फांदीवर वाऱ्याच्या लहरीनी डुलणारे ते फूल त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे. पण त्यामुळे त्याचे दिवसभरातील अस्तित्व आणि जाणाऱ्या–येणाऱ्याला त्याने दिलेला आनंद या गोष्टी खोट्या ठरत नाहीत. आपणही आपले हे छोटेसे जीवन त्या फुलासारखेच सुंदर करू शकतो. या नाशवंत जीवनाला त्याच्या अस्तित्व कालापुरता का होईना, पण काही अर्थ प्राप्त करून देऊ शकतो. तसे करण्यातच या जीवनांचे काही सार्थक आहे. या जीवनाचा प्रवास करीत असताना निकट राहून सोबत करणारी आसपास वावरत धीर पुरवणारी, आपल्यापेक्षा चार पावले पुढे चालत राहून प्रेरणा देणारी अशी निरनिराळ्या कोटीतली माणसे आपल्याला भेटतात त्यांच्यापैकी कांहीच्या सहवासात निरामय आनंदाचे क्षण लाभतात या साऱ्या विषयी कृतज्ञतेचा भाव ठेवणे हे जीवनातील एक कर्तव्य ठरते.

१) बागेतील फुल कोणती प्रेरणा देते ?

२) जीवनात कोणकोणती माणसे भेटतात ?

३) नाशवंत जीवनाला फुलाच्या अस्तित्वाचा अर्थ कसा प्राप्त होतो ?

४) थोराविषयी कृतज्ञता का दाखवावी ?

५) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

# परिशिष्ट

# परिशिष्ट १

# पदवीपूर्व शिक्षण मंडळ

कर्नाटक राज्य

## (पी.यु.सी. द्वितीय वर्षाच्या पाठ्यपुस्तक अभ्यासक्रमाचा आकृतिबंध)

द्वितीय वर्षासाठी पदवीपूर्व शिक्षण मंडळाने खालील अभ्यासक्रमाचा आकृतिबंध स्विकारलेला आहे.

**१. सूक्ष्म वाचनासाठी वेचे :-**

अ) गद्य – सुमारे (१० ते १२ पाठ)

ब) पद्य – सुमारे (१० ते १२ कविता)

प्राचीन वाङमय आणि अर्वाचीन वाङमय यांचे परस्परांशी प्रमाणे १:४ असावे. २ किंवा ३ पाठ प्राचीन आणि अव्वल इंग्रजीच्या कालांतील असावेत. ३ किंवा ४ कविता प्राचीन कालखंडातील असाव्यात.

**अ) गद्य विभागामध्ये खालील वाङमय प्रकारांचे समावेश असावा.**

१) महानुभाव वाङमय २) निबंध ३) चरित्र व आत्मचरित्रात्मक लेखन ४) व्यक्तिचित्र ५) प्रवासवर्णन ६) प्रासंगिक ७) अनुवाद ८) कादंबरी ९) संशोधन १०) दलित साहित्य ११) ऐतिहासिक पत्रलेखन १२) वैचारिक लेख १३) आत्मकथन १४) मुलाखत १५) नाटक १६) ललितलेख १७) संवादात्मक लेखन.

**आ) पद्यामध्ये खालील प्रकारांचा समावेश असावा.**

१) संतवाङमय २) पंडितीवाङमय ३) शाहिरी वाङमय ४) निसर्ग कविता ५) प्रेमकविता ६) दलित कविता ७) व्यक्तिचित्रणात्मक कविता ८) स्त्री संवेदनात्मक कविता ९) ग्रामीण कविता (या पाठांचे व कवितांचे स्वरूप पदवीपूर्व शिक्षण मंडळाने ठरवून दिलेल्या विविध उद्दिष्टांशी सुसंसगत असावे) विविध गद्य व पद्य प्रकारांची ओळखही या वेच्यांमधून व्हावी.

**२) स्थूल वाचनासाठी वेचे :**

निवडक कथा : १) ग्रामीण कथा २) दलित कथा ३) सामाजिक कथा.

३) व्याकरण व व्यावहारिक ज्ञान यात खालील विषयांचा समावेश आहे.

निबंध, विभक्ती, अर्जलेखन, वाक्प्रचार, समूहदर्शक शब्द, म्हणी.

| प्रश्न पत्रिकेतील गुणविभाजन | | | परिशिष्ट २ |
|---|---|---|---|
| अ.नं. | विवरण | गुण | एकूण गुण |
| प्र. १ला | **निबंध (तीन पैकी एक)** | १० | १० |
| प्र. २रा | **गद्य (सूक्ष्म अभ्यास)** | | २५ |
| | अ) एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा. (सहापैकी पाच) | ०५ | |
| | ब) सविस्तर उत्तरे लिहा. (दोन पैकी एक) | ०६ | |
| | क) टिपा लिहा (तीन पैकी दोन) | ०८ | |
| | ड) संदर्भासह स्पष्ट करा (तीन पैकी दोन) | ०६ | |
| प्र. ३रा | **पद्य (सूक्ष्म अभ्यास)** | | २५ |
| | अ) एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा. (सहापैकी पाच) | ०५ | |
| | ब) सविस्तर उत्तरे लिहा. (दोन पैकी एक) | ०६ | |
| | क) टिपा लिहा (तीन पैकी दोन) | ०८ | |
| | ड) संदर्भासह स्पष्ट करा. (तीन पैकी दोन) | ०६ | |
| प्र. ४था | **स्थूल अभ्यास (अपठित)**<br>तीन प्रश्नांपैकी दोहोंची उत्तरे लिहा. | १० | १० |
| प्र. ५वा | **व्याकरण** | | २५ |
| | आवेदन पत्र | ५ | |
| | विभक्ती | ५ | |
| | वाक्प्रचार | ५ | |
| | म्हणी | ५ | |
| | शब्द समूह | ५ | |
| प्र. ६वा | **आकलन (उतारा)** | ५ | ५ |
| | | | १०० |

## अध्यापकाच्या माहितीसाठी

**साहित्य मंथन भाग – २ या पाठ्यपुस्तकाच्या आधारावर नमुना प्रश्नपत्रिका देण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिका तयार करताना उद्दिष्ठानुसार गुण विभागणी, ब्ल्यूप्रिंट व प्रश्नपत्रिका देण्यात आली आहे. प्रश्नपत्रिकेच्या नमुन्यानुसारच प्रश्नपत्रिका तयार करावी. प्रश्नसंख्येत बदल करू नये. पाठ्यपुस्तक व कृती पुस्तिकेतील व्याकरणातील प्रश्न विचारावेत. त्यासाठी सर्व व्याकरणाचा भाग जोडलेला आहे. नियोजीत अभ्यासक्रमातीलच विचारावे तरी अध्यापकांनी सहकार्य करावे.**

## परिशिष्ट ३

## उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी - ३

### I. उद्दिष्ठानुसार :

| अ.नं. | उद्दिष्ट | शेकडा प्रमाण % | प्रश्नपत्रिकेतील गुणांची विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | ज्ञान Knowledge | ३५% | ३५ |
| ०२ | आकलन Comprehension | ३५ | ३५ |
| ०३ | उपयोजन Expression | १५% | १५ |
| ०४ | कौशल्य Appreciation | १५% | १५ |
| | एकूण | १००% | १००% |

### I. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप :

| अ.नं. | प्रश्नांचे स्वरूप | शेकडा प्रमाण | गुणांची विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | वस्तुनिष्ठ | ३५% | ३५ |
| ०२. | लघुत्तरी | २८% | २८ |
| ०३. | दिर्घोत्तरी | ३७% | ३७ |
| | एकूण | १००% | १००% |

### II. काठिण्य आधारित प्रश्न :

| अ.नं. | प्रश्नांची काठिण्यता | शेकडा प्रमाण | विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | सोपे प्रश्न | ३०% | ३० |
| ०२ | मध्यम प्रश्न | ४०% | ४० |
| ०३ | कठिण प्रश्न | ३०% | ३० |
| | एकूण | १००% | १०० |

Sub. : MARATHI (07)
II Year PUC

# साहित्य मंथन भाग २ परिशिष्ट ३ (अ)

## (नील नकाशा) BLUE PRINT OF QUESTION PAPER

| पाठ क्र. | | एकूण तास | ज्ञान | | | आकलन | | | उपयोजन | | | कौशल्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | |
| १. | श्री. गोविंद प्रभूंच्या लिळा. | ०४ | १ | (३) | | | | | | | | | | | |
| २. | मराठियाची तो इज्जत वाचणार नाही. | ०३ | | | | | ४ | | | | | | | | |
| ३. | वीरराणी कित्तुर चन्नम्मा | ०४ | | | | | | ६ | | | | | | | |
| ४. | शिक्षण हाच आमचा तरणोपाय | ०५ | | | | | ४ | | | | | | | | |
| ५. | माझं आयुष्य | ०५ | १ | | | | | | | | | | | | |
| ६. | श्री तुकारामाची त्रिशत सांवत्सरिक पुण्यतिथी | ०५ | १ | | | | | | | | | | | | |
| ७. | सतीचे शस्त्र | ०५ | १ | ३ | | | | | | | | | | | |
| ८. | प्रदूषणावर उपाय नाही का ? | ०४ | | | | | (४) | | | | | | | | |
| ९. | आजीचे भाष्य | ०३ | १ | | | | | | | | | | | | |
| १०. | हृदयसंवाद | ०४ | | | | | | | | | | | | | |
| ११. | जीवनाची सायंकाळी | ०४ | (१) | ३ | | | | | | | | | | | |
| १२. | ही मुले .... त्यांचे हे वय | ०५ | | | | | | (६) | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | ५/६ | ६/९ | | | ८/१२ | ६/१२ | | | | | | | २५/३९ |
| १. | पसायदान | ०३ | १ | | | | | | | | | | | | |
| २. | बसवेश्वरांचे वचनामृत | ०३ | | | | | | (६) | | | | | | | |
| ३. | संतवाणी | ०४ | | | | | | | | | | | | | |
| | अ) किती हे सुख मानिती संसाराचे | | | | | | | | | | | | | | |
| | ब) घेता नाम विठोबाचे | | | (३) | | | | | | | | | | | |
| | क) सत्वर पाव गे मला | | १ | | | | ४ | | | | | | | | |
| ४. | तू थोर दया सिंधू | ०३ | | | | | | ६ | | | | | | | |
| ५. | सुंदर हिरवे माळ | ०२ | | | | | | | | | | | | | |
| ६. | गोफ | ०३ | | ३ | | | | | | | | | | | |
| ७. | रात्र आहे वैऱ्याची | ०३ | १ | | | | | | | | | | | | |
| ८. | विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर | ०३ | | | | | | | | | | | | | |
| ९. | आई | ०३ | १ | | | | | | | | | | | | |
| १०. | सखी | ०३ | १ | ३ | | | | | | | | | | | |
| ११. | निष्ठा | ०३ | (१) | | | | ४ | | | | | | | | |
| १२. | जीव माझा गुतलाय | ०३ | | | | | (४) | | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | ५/६ | ६/९ | | | ८/१२ | ६/१२ | | | | | | | २५/३९ |
| १. | पाझर | ०६ | | | | | | ५ | | | | | | | |
| २. | होरपळ | ०६ | | | | | | ५ | | | | | | | |
| ३. | गळफास | ०६ | | | | | | (५) | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | | | | | | १०/१५ | | | | | | | १०/१५ |
| १. | निबंध | ०५ | | | | | | | | | | | | (१०)(१०)१० | |
| २. | विभक्ती | ०१ | ११११९ | | | | | | | | | | | | |
| ३. | अर्ज लेखन | ०२ | | | | | | | | | | | | ५ | |
| ४. | वाक्प्रचार | ०२ | | | | | | | ११११९ | | | | | | |
| ५. | समूहदर्शक शब्द | ०१ | | | | | | | ११११९ | | | | | | |
| ६. | म्हणी | ०२ | | | | | | | ११११९ | | | | | | |
| ७. | उतारा वाचन (आकलन) | ०२ | | | | ११११९ | | | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | ५ | | | ५ | | | १५ | | | | | १५/३५ | ४०/६० |
| | | | | | | | | | | | | प्रश्नपत्रिकेतील मूळ गुण = | | | १०० |
| | **एकूण तास** | १२० | | | | | | | | | | प्रश्नपत्रिकेतील एकूण गुण = | | | १५३ |

**टीप : (   ) कंसातील गुण प्रश्नपत्रिकेतीलच असून ते पर्यायी आहेत.**

# नमुना प्रश्नपत्रिका

परिशिष्ट ३ (ब)

**REVISED SYLLABUS P.U.C. SECOND YEAR - 2014**

| | | |
|---|---|---|
| **Code No. 07**<br>**Total No. of Questions 6** | **विषय : मराठी** | **Max. Marks : 100**<br>**Time : 3.15 Hours** |

**सूचना :** १) हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे.
२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
३) व्याकरणाचे सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

**प्र. १ ला. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **१ × १० = १०**

१) भारतीय शेतकरी.
२) निसर्ग – मानवाचा मित्र
३) अंधश्रध्दा – सामाजिक शाप.

**प्र. २ रा. अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **१ × ५ = ०५**

४) बालकाला पांघरूण कोणी घातले ?
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तीन गुरूंची नावे कोणती ?
६) फाल्गुन वद्य द्वितीयेस कोणाची पुण्यतिथी असते ?
७) आजी मौन का झाली ?
८) आप्पासाहेब बेलवलकरांच्या मुलीचे नाव काय आहे ?
९) सईने कोणावर राग व्यक्त केला ?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **१ × ६ = ०६**

१०) वीरराणी कित्तुर चन्नम्माने कलेक्टर थॅकरे यांच्याशी केलेल्या लढाईचे वर्णन करा.
११) 'ही मुले – त्यांचे हे वय' या लेखात मुलांच्या जीवनात कुटुंबाचे महत्त्व या विषयी माहिती लिहा.

**(क) संदर्भासह स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** **२ × ३ = ०६**

१२) ''आवो मेली जाय : काह्या रूसतासि''
१३) ''अप्पा मी चुकले. मला क्षमा करा, अप्पा तुमच्या लाडक्या लेकराला क्षमा करा.''
१४) ''अरं तुमचं तुमी बगा, आमा गरिबाला त्यात का वडता ?''

**(ड) टीपा लिहा (कोणत्याही दोन)** **२ × ४ = ०८**

१५) ब्रिटीशांचा झिरपणीचा सिध्दांत.
१६) शिवाजी महाराजांचे स्वभाव गुण.
१७) पर्यावरणात झाडाचे महत्व लिहा.

**प्रश्न ३ रा. (अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **१ × ५ = ५**

१८) पसायदान कोणासाठी मागितले आहे ?
१९) संसाराच्या जाचाला कोण कंटाळले आहे ?
२०) शाहिराने जनतेला कोणते आव्हान केले आहे ?
२१) घरातल्या घरात गजबजलेले गांव कोणते ?
२२) रानात जायचा कोणाचा नियम चुकत नाही ?
२३) सहसा बायका काय विसरत नाहीत ?

**(ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा.** **१ × ६ = ०६**

२४) बसवेश्वरांनी देव ही संकल्पना कशी स्पष्ट केली आहे ?
२५) 'सुंदर हिरवे माळ' या कवितेचा भावार्थ लिहा.

**(क) संदर्भासह स्पष्ट करा (कोणतेही दोन)** **२ × ३ = ०६**

२६) वाल्हा कोळी ब्रह्महत्यारी । नामे तारिला निर्धारी ।।
२७) थांब, उलघडू, गोफ कठिण हा शान्त बुध्दीने सखे असा
की न तुटावा पदर एकही धागा धागा नीट तसा.
२८) तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थाचा क्रम चुकला.
यात माझा काय दोष हे मला सांगशील का ?

**(ड) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** **२ × ४ = ०८**

२९) हंस पक्षी व नलराजा संवाद.
३०) निष्ठा कवितेतील शेतकऱ्यांचे इमान.
३१) जीव माझा गुतलाय यातील बाळीचे सासर.

**प्र. ४ था खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.** **२ × ५ = १०**

३२) गोंदा पाटलानं बाबलला कसा न्याय मिळवून दिला ते लिहा.
३३) 'होरपळ' कथेतील तात्याचे सामाजिक कार्य लिहा.
३४) अंजनाच्या भावाने आपल्या मुलीचे लग्न पंडिताबरोबर करण्यास का नाकारले ते लिहा.

**प्र. ५ वा (अ) खालील विषयावर आवेदन पत्र लिहा.** **१ × ५ = ५**

३५) बँकेतील लिपीक पदासाठी अर्ज लिहा.

**(ब) अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा.** **५ × १ = ०५**

३६) नागू गवळी <u>अंगाने</u> चांगला गुटगुटीत होता.
३७) <u>मुलांच्या</u> मनात आई–वडिलांविषयी प्रेम असते.
३८) <u>गीतांजली</u> आदर्श ग्रंथ आहे.
३९) <u>बेंगलोरहून</u> मी कालच आलो.
४०) <u>देशभक्तांनो !</u> मातृभूमीचे रक्षण करा.

**(क) खालील वाक्प्रचारांच्या योग्य जोड्या जुळवा.** **५ × १ = ०५**

४१) रामराम ठोकणे अ) मोठे संकट येणे.
४२) डोळेझाक करणे ब) इच्छा पूर्ण करणे.
४३) ब्रम्हांड कोसळणे क) अंदाज येणे.
४४) सुगावा लागणे ड) दुर्लक्ष करणे.
४५) पांग फेडणे इ) निरोप घेणे.

**(ड) खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.** **५ × १ = ०५**

४६) अतिशहाणा त्याचा ...............
४७) कामापुरता ...............
४८) झाकली मुठ ..............
४९) काखेत कळसा ..............
५०) खाण तशी ..............

(माती, मामा, गावाला वळसा, बैल रिकामा, सव्वा लाखाची)

**(इ) खालील अ गटातील शब्द समूहाला ब गटातील योग्य शब्द निवडून जोड्या जुळवा.** **५×१=०५**

| | अ | ब |
|---|---|---|
| ५१) | बालापासून वृध्दापर्यंत | जीवलग |
| ५२) | कवितेची रचना करणारी | ऐतखाऊ |
| ५३) | इच्छिलेली वस्तू देणारी गाय | आबालवृध्द |
| ५४) | जीवाला जीव देणारा | कामधेनू |
| ५५) | श्रम न करता खाणारा | कवयित्री |

**प्र. ६ वा खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **५×१=०५**

वर्तमानपत्र हे जसे जिज्ञासा भागवते तसेच ते ती वाढवतेही. मतप्रसाराचे आणि ज्ञानदानाचे अमोघ साधन म्हणून वर्तमानपत्राची जी महती गातात ती याच कारणामुळे. ज्ञानदानाच्या साधनांत वर्तमानपत्राप्रमाणेच ग्रंथाचीही गणना आहे, पण हा ग्रंथ सुशिक्षित व्यक्तीच्या हातातच बहुधा पडतो, उलट वर्तमानपत्राचा प्रसार सर्व दर्जाच्या लोकांत असल्यामुळे त्यातले ज्ञान समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत झिरपत जाते. शिवाय ग्रंथ हा जसा विचारांच्या तसाच किंमतीच्या दृष्टीनेही बहुमोल असल्यामुळे सामान्य माणसाला तो वाचणे, तसेच विकत घेणेही बहुधा अशक्य असते. उलट वर्तमानपत्राची किंमत थोडी, त्यात समाविष्ट झालेल्या ज्ञानाला साजेल इतकीच असते, त्यामुळे वर्तमानपत्र वाचण्याची तलफ भागवणे जड जात नाही. अर्थात ग्रंथापेक्षा वर्तमानपत्राचा प्रसार शतपट अधिक असतो. पण ज्ञानादानाच्या दृष्टीने जरी वर्तमानपत्राची उपयुक्तता अधिक वाटली तरी त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रात त्याचा दर्जा ग्रंथाहून अधिक ठरत नाही. कार्लाईलने वर्तमानपत्री वाङ्मयाला ‘गुडघाभर पाणी’ म्हटले आहे. ते खोटे नव्हे.

**प्रश्न :**

५६) वर्तमानपत्राची महती कोणत्या दोन कारणामुळे वाढली आहे ?
५७) ज्ञानदानाच्या साधनात वर्तमानपत्राप्रमाणे कोणाची गणना केली जाते ?
५८) ग्रंथापेक्षा कशाचा प्रसार शतपट अधिक असतो ?
५९) वर्तमानपत्राचा दर्जा कशाहून अधिक ठरत नाही ?
६०) कार्लाईलने वर्तमानपत्री वाङ्मयाला काय म्हटले आहे ?

# परिशिष्ट ४
# उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

## I. उद्दिष्ठानुसार :

| अ.नं. | उद्दिष्ट | शेकडा प्रमाण % | प्रश्नपत्रिकेतील गुणांची विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | ज्ञान Knowledge | ३५% | ३५ |
| ०२ | आकलन Comprehension | ३५ | ३५ |
| ०३ | उपयोजन Expression | १५% | १५ |
| ०४ | कौशल्य Appreciation | १५% | १५ |
| | एकूण | १००% | १००% |

## I. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप :

| अ.नं. | प्रश्नांचे स्वरूप | शेकडा प्रमाण | गुणांची विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | वस्तुनिष्ठ | ३५% | ३५ |
| ०२. | लघुत्तरी | २८% | २८ |
| ०३. | दिर्घोत्तरी | ३७% | ३७ |
| | एकूण | १००% | १००% |

## II. काठिण्य आधारित प्रश्न :

| अ.नं. | प्रश्नांची काठिण्यता | शेकडा प्रमाण | विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | सोपे प्रश्न | ३०% | ३० |
| ०२ | मध्यम प्रश्न | ४०% | ४० |
| ०३ | कठिण प्रश्न | ३०% | ३० |
| | एकूण | १००% | १०० |

Sub. : MARATHI 07
II Year PUC

# साहित्य मंथन भाग २ - नमुना II परिशिष्ट ४ (अ)

## (नील नकाशा) BLUE PRINT OF QUESTION PAPER

| पाठ क्र. | | एकूण तास | ज्ञान | | | आकलन | | | उपयोजन | | | कौशल्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | |
| १. | श्री. गोविंद प्रभूंच्या लिळा. | ०४ | १ | | | | | | | | | | | | |
| २. | मराठियाची तो इज्जत वाचणार नाही. | ०३ | १ | (३) | | | | | | | | | | | |
| ३. | वीरराणी कित्तुर चन्नम्मा | ०४ | | | | | ४ | | | | | | | | |
| ४. | शिक्षण हाच आमचा तरणोपाय | ०५ | १ | | | | | | | | | | | | |
| ५. | माझं आयुष्य | ०५ | | | | | | ६ | | | | | | | |
| ६. | श्री तुकारामाची त्रिशत सांवत्सरिक पुण्यतिथी | ०५ | | | | | (४) | | | | | | | | |
| ७. | सतीचे शस्त्र | ०५ | १ | | | | | | | | | | | | |
| ८. | प्रदूषणावर उपाय नाही का ? | ०४ | | | | | | (६) | | | | | | | |
| ९. | आजीचे भाष्य | ०३ | (१) | ३ | | | | | | | | | | | |
| १०. | हृदयसंवाद | ०४ | | | | | ४ | | | | | | | | |
| ११. | जीवनाची सायंकाळ | ०४ | | ३ | | | | | | | | | | | |
| १२. | ही मुले .... त्यांचे हे वय | ०५ | १ | | | | | | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | **५/६** | **६/९** | | | **८/१२** | **६/१२** | | | | | | | **२५/३९** |
| १. | पसायदान | ०३ | | ३ | | | | | | | | | | | |
| २. | बसवेश्वरांचे वचनामृत | ०३ | १ | | | | | | | | | | | | |
| ३. | संतवाणी | ०४ | १ | | | | | | | | | | | | |
| | अ) किती हे सुख मानिती संसाराचे | | | | | | | | | | | | | | |
| | ब) घेता नाम विठोबाचे | | | | | | ४ | | | | | | | | |
| | क) सत्वर पाव गे मला | | | | | | | | | | | | | | |
| ४. | तू थोर दया सिंधू | ०३ | १ | | | | | | | | | | | | |
| ५. | सुंदर हिरवे माळ | ०२ | १ | | | | | | | | | | | | |
| ६. | गोफ | ०३ | | | | | ४ | | | | | | | | |
| ७. | रात्र आहे वैऱ्याची | ०३ | | (३) | | | | | | | | | | | |
| ८. | विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर | ०३ | १ | | | | (४) | | | | | | | | |
| ९. | आई | ०३ | | | | | | ६ | | | | | | | |
| १०. | सखी | ०३ | | ३ | | | | | | | | | | | |
| ११. | निष्ठा | ०३ | | | | | | (६) | | | | | | | |
| १२. | जीव माझा गुतलाय | ०३ | (१) | | | | | | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | **५/६** | **६/९** | | | **८/१२** | **६/१२** | | | | | | | **२५/३९** |
| १. | पाझर | ०६ | | | | | | (५) | | | | | | | |
| २. | होरपळ | ०६ | | | | | | ५ | | | | | | | |
| ३. | गळफास | ०६ | | | | | | ५ | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | | | | | | **१०/१५** | | | | | | | **१०/१५** |
| १. | निबंध | ०५ | | | | | | | | | | | | (१०)(१०)१० | |
| २. | विभक्ती | ०१ | ११११११ | | | | | | | | | | | | |
| ३. | अर्ज लेखन | ०२ | | | | | | | | | | | | ५ | |
| ४. | वाक्प्रचार | ०२ | | | | | | | १११११ | | | | | | |
| ५. | समूहदर्शक शब्द | ०१ | | | | | | | १११११ | | | | | | |
| ६. | म्हणी | ०२ | | | | | | | १११११ | | | | | | |
| ७. | उतारा वाचन (आकलन) | ०२ | | | | १११११ | | | | | | | | | |
| | **सोडवावयाचे /दिलेले** | | **५** | | | **५** | | | **१५** | | | | | **१५/३५** | **४०/६०** |
| | | | | | | | | | | | | प्रश्नपत्रिकेतील मूळ गुण = | | | **१००** |
| | **एकूण तास** | **१२०** | | | | | | | | | | प्रश्नपत्रिकेतील एकूण गुण = | | | **१५३** |

**टीप : ( ) कंसातील गुण प्रश्नपत्रिकेतीलच असून ते पर्यायी आहेत.**

## नमुना प्रश्नपत्रिका परिशिष्ट ४ (ब)

**REVISED SYLLABUS P.U.C. SECOND YEAR - 2014**

**Code No. 07**
**Total No. of Questions 6**
**विषय : मराठी**
**Max. Marks : 100**
**Time : 3.15 Hours**

**सूचना :** १) हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे.
२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
३) व्याकरणाचे सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

**प्र. १ ला. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **१×१०=१०**

१) शिक्षणाचे महत्त्व.
२) पर्यावरण व मानवी जीवन.
३) स्त्रिभ्रुण हत्या हा मानवतेला शाप.

**प्र. २ रा. अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **१×५=०५**

४) गोसावी व म्हातारीची भेट कोठे झाली ?
५) लष्कराच्या छावणीचा तळ कोणत्या गावी उभारण्यात आला होता ?
६) ''शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे'' हे ब्रिद वाक्य कोणाचे आहे ?
७) सईच्या पतीचे नाव काय ?
८) नातवाने आजीला कोणत्या झाडाची उपमा दिली आहे ?
९) आई वडिलांचे खरे कर्तव्य काय असते ?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **१×६=०६**

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील स्वभाव गुण लिहा ?
११) लेखकाच्या मते प्रदुषणावर कोणकोणते उपाय करता येतील ?

**(क) संदर्भासह स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** **२×३=०६**

१२) ''कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेहि जाऊ लागतील''.
१३) ''देऊळही शाश्वत नाही, देवही शाश्वत नाही.''
१४) 'नले मी – मी चोरी केली असा संशय आला तुला'.

**(ड) टिपा लिहा (कोणत्याही दोन)** **२×४=०८**

१५) इंग्रजानी राणी चन्नम्मांचा केलेला पराभव.
१६) तुकारामांनी सांगितलेली शिकवण.
१७) गं. बा. सरदारांचे अस्पृश्यता विषयी विचार.

**प्रश्न ३ रा. (अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **१×५=५**

१८) अर्थ रेषा अर्थहीन केव्हा होते ?
१९) मानवाने सुख कशात मानले आहे ?
२०) हंसपक्षी कोणाच्या हातात सापडतो ?
२१) चहुकडे सुंदर व कसले माळ पसरले आहे ?
२२) कवी कोणत्या शतकाच्या शेवटच्या टोकावर उभा आहे असे म्हटले आहे ?
२३) राम–सीतेची उपमा कोणाला दिली आहे ?

**(ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा.** **१×६=०६**

२४) आईचे अस्तित्व कवीने कसे दाखवून दिले आहे ?
२५) निष्ठा या कवितेचा भावार्थ लिहा.

**(क) संदर्भासह स्पष्ट करा (कोणतेही दोन)** **२×३=०६**

२६) दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।
२७) विजयध्वजा गगनांत डोलता तळमळुनी तडफडे
पिसाळले सूर्याजी तेही संधी शोधण्याकडे
२८) अगं, लहानपणी आम्हाला चहालासुध्दा दूध मिळत नव्हतं,
तिथं कुठलं दही आणि कुठलं ताक ?

**(ड) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** **२×४=०८**

२९) 'घेता नाम विठोबाचे' या अभंगाचा भावार्थ.
३०) 'गोफ' या कवितेतील विरह.
३१) एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील रक्ताचे मोल.

**प्र. ४ था खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.** **२×५=१०**

३२) गावातील पोरांनी बाबलला का मारले ? त्याचा परिणाम काय झाला ?
३३) तात्यानी भूतकाळातील कोणकोणत्या आठवणी सांगितल्या आहेत ?
३४) विलासकाकांना आईची आठवण का झाली ? आईने काय सांगितले होते ?

**प्र. ५ वा (अ) खालील विषयावर आवेदन पत्र लिहा.** **१×५=०५**

३५) गावातील रस्ता दुरुस्ती संदर्भात ग्रामपंचायत अध्यक्षांना तक्रार अर्ज लिहा.

**(ब) अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा.** **५×१=०५**

३६) <u>जंगलात</u> त्यांनी राहूट्या ठोकल्या.
३७) दुर्देवाने हा <u>तोफांचा</u> ध्वनी शेवटचा ठरला.
३८) राणी कित्तूर <u>चन्नम्माला</u> एक पुत्र होता.
३९) <u>मुलांनो</u> ! अभ्यासात लक्ष घाला.
४०) <u>ताईने</u> भावाला ओवाळले.

**(क) खालील वाक्प्रचारांच्या योग्य जोड्या जुळवा.** **५×१=०५**

| | |
|---|---|
| ४१) निभाव लागणे | अ) एखादी गोष्ट करण्यास तयार नसणे. |
| ४२) उमाळा येणे | ब) टाकणे. |
| ४३) वर्ज्य करणे | क) संबंध तोडणे. |
| ४४) काडीमोड करणे | ड) तीव्र इच्छा होणे. |
| ४५) का कू करणे | इ) टिकाव लागणे. |

**(ड) खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.** **५×१=०५**

४६) कामापुरता ...............
४७) काखेत कळसा ...............
४८) कुत्र्याचे शेपूट .............
४९) कर नाही त्याला .............
५०) ऐकावे जनाचे .............
(करावे मनाचे, मामा, डर नाही, गावाला वळसा, वाकडे ते वाकडेच)

**(इ) खालील अ गटातील शब्द समूहाला ब गटातील योग्य शब्द निवडून जोड्या जुळवा.** **५×१=०५**

| **अ** | **ब** |
|---|---|
| ५१) तीन रस्ते एकवटतात ती जागा | हुतात्मा |
| ५२) खूप दानधर्म करणारा | शिलालेख |
| ५३) किल्ल्याच्या भोवतीची भिंत | तिठा |
| ५४) दगडावर कोरलेले लेख | तट |
| ५५) देशासाठी प्राणार्पण केलेला | दानशूर |

**प्र. ६ वा खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **५×१=०५**

अगदी पहिल्याप्रथम परमेश्वराची मूर्ती म्हणजे आई ! 'मातृदेवो भव !' जन्मताच मुलाला आईशिवाय दुसरे कोण दिसते ? वत्सलतेच्या रूपाने ती परमेश्वराचीच मूर्ती तेथे उभी असते. ह्या मातेची व्याप्ती आपण वाढवू व 'वंदे मातरम्' म्हणून राष्ट्रमातेची व पुढे भूमातेची, पृथ्वीची पूजा करू. परंतु आरंभी उंच उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहिली ती मातेची. आईच्या पूजेने मोक्ष मिळणे अशक्य नाही. आईची पूजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. म्हातारपणी आपल्या उपयोगी पडेल असा हिशोब करून का ती आपल्या मुलाची सेवा करत असते ? छे छे ! तिने त्या मुलाला जन्म दिला. तिला वेदना झाल्या. त्या वेदना तिला त्या मुलाचे वेड लावतात. त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाही. ती माऊली म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ती. उत्कृष्टांतील उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे ही मातृपूजा आहे. ईश्वराला आई या नावानेच हाक मारावयाची. आई ह्या शब्दाहून आणखी उच्च शब्द आहे कोठे ? आई हे पहिले ठळक अक्षर. तेथे ईश्वर पाहावयास शिका.

**प्रश्न :**

५६) परमेश्वराची मूर्ती कोणास म्हटले आहे ?
५७) मातेची व्याप्ती वाढवून काय केले पाहिजे ?
५८) मोक्ष कशामुळे मिळेल ?
५९) माऊली म्हणजे कशाची मूर्ती ?
६०) ईश्वराला कोणत्या नावाने हाक मारावी ?

# संदर्भ-सुची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | व्यक्ती आणि वल्ली | – | पु. ल. देशपांडे |
| २) | पांढरे केस हिरवी मने | – | वि. द. घाटे |
| ३) | उपेक्षितांचे अंतरंग | – | श्री. म. माटे |
| ४) | मृदगंध | – | इंदिरा संत |
| ५) | पैस | – | दुर्गा भागवत |
| ६) | असंही | – | प्रिया तेंडुलकर |
| ७) | हृदयंगम | – | मधु मंगेश कर्णिक |
| ८) | मनातले घर | – | शांता शेळके |
| ९) | बसवण्णांची समग्र वचने | – | शालिनी दोडमनी |
| १०) | वचन | – | बसव समिती, बेंगलोर |
| ११) | महामानव बसवण्णा | – | शालिनी दोडमनी |
| १२) | आपले पर्यावरण | – | अरूण जोशी |
| १३) | सुगम मराठी व्याकरण लेखन | – | कै. मो. रा. वाळंबे |
| १४) | सुबोध मराठी व्याकरण लेखन | – | चंद्रहास जोशी |
| १५) | पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार | – | श. वि. ओतुरकर |
| १६) | मराठ्यांच्या इतिहासाची साधने | – | सं. वि. का. राजवाडे |
| १७) | मुसलमानी रियासत | – | गो. स. सरदेसाई |
| १८) | मुक्कज्जी (डॉ. शिवराम कारंथ) | – | मीना वांगीकर (मराठी अनुवाद) |
| १९) | ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन | – | प्र. न. जोशी |
| २०) | संत ज्ञानेश्वर | – | गो. नी. दांडेकर |
| २१) | राजर्षी शाहू छत्रपती शिक्षणविषयक (विचार व कार्य) | – | प्रा. रा. तु. भगत |
| २२) | राजा शिव छत्रपती पूर्वार्ध–उत्तरार्ध | – | बाबासाहेब पुरंदरे |
| २३) | पसायदान (ज्ञानदेवांचे मागणे) | – | देगुलकर धुंडामहाराज |
| २४) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | – | धनंजय कीर |
| २५) | शाहूच्या आठवणी | – | प्रा. नानासाहेब साळुंखे |
| २६) | सुबोध भाषाशास्त्र | – | प्र. न. जोशी. |
| २७) | प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास | – | ल. रा. नसिराबादकर |



# राष्ट्रगीत

जन-गण-मन-अधिनायक, जय हे
भारत-भाग्य-विधाता.
पंजाब-सिंधु-गुजरात-मराठा-
द्राविड-उत्कल-वंग
विंध्य-हिमाचल-यमुना-गंगा
उच्छल-जलधि-तरंग.
तव शुभ नामे जागे,
तव शुभ आशिष मागे,
गाहे तव जय-गाथा.
जन-गण-मंगल-दायक जय हे
भारत-भाग्य-विधाता.
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे.

– रविंद्रनाथ टागोर